
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २८३ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू म्हणजे विशिष्ट धर्म न होता, ही जीवनपद्धती आहे. त्याला राजकीय आणि सामाजिक एकतेत रूपांतरित करणे हेच संघाचे कार्य आहे.
**- मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## आज पोळा





# चंद्रभागेने ओलांडली इशारा पातळी; गोपाळपूरच्या जून्या पूलावर पाणी

- संतपेठ परिसरातील सखल भागात पाणी शिरणार!
- नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२१ ऑगस्ट -**

उजनी धरणातून सोडण्यात येत असलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे येथील चंद्रभागेने रौद्ररुपधारण केलेले आहे. चंद्रभागा नदीने इशारा पातळी ओलांडल्याने शहरातील सखलभागात पाणी शिरलेले आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाकडून सुमारे दीडशे कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

उजनी धरणातून बुधवारी (ता.२०) सोडण्यात आलेले पाणी गुरुवारी (२१) सायंकाळ पर्यंत येथे पोहचण्याचा अंदाज आहे. हे पाणी येथे पोहचल्याने चंद्रभागेच्या पाणी पातळीत कमालीची वाढ होणार असून शहरातील संतपेठ परिसरातील सखलभागात सायंकाळच्या वेळी पाणी शिरण्याची शक्यता असल्याने दुपार पासूनच तेथील नागरिकांना नगरपालिका प्रशासनाकडून सतर्कता बाळगण्याच्या सुचना देण्यात आल्या.





दरम्यान उजनीतून भीमा नदी मध्ये केल्या जाणाऱ्या विसर्गात गुरुवारी (ता.२१) सकाळी दहा वाजल्या पासून वाढ करण्यात आली आहे. सकाळी दहाच्या सुमारास उजनीतून १ लाख ४० हजार क्युसेक इतका विसर्ग भीमा नदीत केला जात होता. उजनी धरणात येणाऱ्या पाण्याची आवक ही १ लाख ७७ हजार क्युसेक इतकी आहे. वरच्या धरणातून सोडण्यात आलेले पाणी या बरोबरच घाटमाथ्यावर पडत असलेल्या पावसामुळे इंद्रायणी नदी मार्फत येणारे पाणी यामुळे उजनीधरणात येणारी पाण्याची आवक वाढत आहे. उजनी धरणात गुरुवारी सकाळी १०३ टक्के इतके भरले असल्यामुळे धरणात आता केवळ सात टक्के इतकीच पाणी साठवण क्षमता शिल्लक आहे. त्यामुळेच धरणातून १ लाख ४० हजार क्युसेकने पाणी भीमा नदीपात्रात सोडण्यात आलेले आहे. दरम्यान दुसरीकडे वीर धरणातून सुरु असलेला पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आलेला असून सध्या १५ हजार क्युसेक इतका विसर्ग ठेवण्यात आलेला आहे. पुणे बंडगार्डनचा विसर्ग ६२ हजार ५७५ क्युसेक इतका आहे. (उर्वरित वृत्त पान २ वर)

### ठळक घटना
- उजनीच्या विसर्गामुळे चंद्रभागेने धारण केले रौद्ररुप
- चंद्रभागा वाहते आहे इशारा पातळीवरुन
- संतपेठेतील सखलभागात पाणी शिरण्याची शक्यता
- प्रशासनाकडून आत्तापर्यंत १५० कुटुंबांचे स्थलांतर
- शहराच्या सखल भागातील दीड हजार नागरिकांच्या स्थलांतराची प्रशासनाकडून तयारी

## महत्त्वाचे

### रुद्रप्रयागमध्ये भूस्खलन, बद्रीनाथ-गंगोत्री महामार्ग बंद

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथे भूस्खलन झाल्यामुळे बद्रीनाथ महामार्ग बंद करण्यात आला आहे. धारासु पुराण ठाणे आणि सोनागढजवळ गंगोत्री महामार्ग बंद आहे. नारदचट्टीजवळ यमुनात्री महामार्गदेखील बंद आहे. कुथनौरमध्ये वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. इतर ठिकाणी ढिगारा हटवण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, बुधवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर गुजरातच्या किनारी जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली.

### वेल्हे तालुक्याचे नवे नाव राजगड

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांची प्रथम राजधानी, राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नामकरण राज्य सरकारने 'राजगड' असे केले आहे. याबाबतचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी जाहीर केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री बावनकुळे यांनी नामकरणाचा निर्णय घेतल्याचे सांगून निर्णयाची माहिती दिली.

# सामान्य नागरिकांना मिळणार दिलासा

## जीएसटीच्या ५ आणि १८ टक्क्यांच्या टप्प्यांना मंत्रिगटाची मान्यता

**नवी दिल्ली, २१ ऑगस्ट**




वस्तू व सेवा दर अर्थात् जीएसटीचे दर तर्कसंगत करण्यासाठी गुरुवारी झालेल्या मंत्रिगटाच्या बैठकीत केंद्र सरकारच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. या प्रस्तावानुसार आता जीएसटीचे ५ आणि १८ टक्क्यांचे दोन टप्पे असतील. १२ आणि २८ टक्क्यांचे टप्पे हटवले जाणार आहेत.

बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय मंत्रिगटाने ५, १२, १८ आणि २८ टक्क्यांच्या चार टप्प्यांतील जीएसटी दर बदलून दोन टप्प्यांतील दर स्वीकारण्याच्या योजनेला मंजुरी दिली. यातील ५ टक्के कर चांगल्या वस्तू व सेवांसाठी राहणार आहे, तर १८ टक्क्यांचा दर मानक वस्तूंवर राहील. तंबाखूसारख्या उत्पादनांवर ४० टक्क्यांचा उच्च दर राहणार आहे. म्हणजेच आता १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा हटवला जाऊ शकतो.

आलिशान वाहनांवर ४० टक्के दराने कर आकारणी केली जावी. पहिले ही आकारणी ५० टक्क्यांपेक्षा जास्त होती. उत्तरप्रदेशचे अर्थमंत्री सुरेश कुमार खन्ना, राजस्थानचे आरोग्य मंत्री गजेंद्रसिंह, पश्चिम बंगालच्या अर्थमंत्री चंद्रिमा भट्टाचार्य, कर्नाटकचे अर्थमंत्री कृष्ण बायरे गौडा आणि केरळचे अर्थमंत्री के. एन. बालगोपाल यांचा समावेश या मंत्रिगटात आहे.

या टप्प्यांना जीएसटी परिषदेची मंजुरी मिळाल्यास १२ टक्क्यांच्या टप्प्यातील ९९ टक्के वस्तू ५ टक्क्यांच्या टप्प्यात येतील. २८ टक्क्यांच्या टप्प्यातील ९० टक्के वस्तूंचा समावेश १८ टक्क्यांच्या टप्प्यात केला जाईल. यामुळे वस्तूंच्या किमती कमी होतील. या बदलामुळे जीएसटी सुटसुटीत होईल आणि नियमांचे पालन करणाऱ्यांची संख्या वाढेल, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. (वृत्तसंस्था)

### अंतिम निर्णय नाही

**जीएसटीचे टप्पे कमी करायचे हा अंतिम निर्णय नाही. ती केवळ जीएसटी परिषदेला करण्यात आलेली शिफारस आहे. आगामी बैठकीत जीएसटी परिषद या शिफारसीवर विचार करेल, अशी अपेक्षा आहे.**

### विम्यावरील सवलतीमुळे ९,७०० कोटींचा बोजा

आरोग्य आणि जीवन विम्यावरील जीएसटीत सवलत देण्याच्या केंद्राच्या प्रस्तावाचे विश्लेषण मंत्रिगटाने केले. यामुळे वर्षाला जवळपास ९,७०० कोटी रुपयांचा बोजा पडू शकतो. बहुतांश राज्यांनी या योजनेला पाठिंबा दिला आहे. मात्र, याचा फायदा थेट विमाधारकाला व्हावा, अशी मागणी केली आहे.

# सोलापूर-मुंबई विमानसेवा सप्टेंबरअखेर सुरु होणार

**सोलापूर ते मुंबई विमानसेवा सुरू करण्यास डीजीसीए यांच्याकडून स्टार एअरला परवानगी; जिल्हाधिकारी आशीर्वाद यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सोलापूरचे सर्वसामान्य नागरिक, उद्योजक, व्यापारी आणि लोकप्रतिनिधी यांची दीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवेची मागणी माहे सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण होत आहे. डीजीसीए कडून स्टार एअरला सोलापूर ते मुंबई विमान सेवा सुरू करण्याची परवानगी मिळालेली आहे.

तसेच महाराष्ट्र एअरपोर्ट ऑथॉरिटी यांच्याशीही स्टार एअर चा करार झालेला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. महाराष्ट्र एअरपोर्ट ऑथॉरिटीचा स्टार एअर शी करार झाल्याने सोलापूर ते मुंबई विमान सेवा लवकरच सुरू होत आहे. स्टार एअर लवकरच तिकीट विक्रीला सुरुवात करून साधारणतः सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत सोलापूरहून मुंबईला पहिले प्रवासी विमानाचे उड्डाण होईल. ही विमान सेवा सुरू झाल्यास सोलापूरचा औद्योगिक, व्यापारी, पर्यटन व शैक्षणिक विकास होण्यास मोठा प्रमाणावर चालना मिळणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने नुकताच मंत्रिमंडळ बैठकीमध्ये उडान योजनेअंतर्गत १४ कोटीची व्हायाबिलिटी गॅप फडिंग तरतूद करुन सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवा सुरु करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.




# ऑनलाईन मनी गेमच्या बंदीचा मार्ग मोकळा

## विधेयकाला राज्यसभेचीही मंजुरी

**नवी दिल्ली, २१ ऑगस्ट**

लोकसभेनंतर राज्यसभेतही ऑनलाईन गेमिंगविरोधी विधेयकाला राज्यसभेतही मंजुरी मिळाली आहे. विरोधकांच्या प्रचंड गोंधळात चर्चे शिवाय हे विधेयक पारित करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक्स तसेच माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत हे विधेयक मांडले. ई स्पोर्टस आणि ऑनलाईन सोशल गेमिंगला प्रोत्साहन देणे आणि सर्व प्रकारच्या ऑनलाईन मनी गेम्सला प्रतिबंधित करण्यासाठी सरकारने हे विधेयक आणले आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यामुळे आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे स्वाक्षरीसाठी पाठवले जाणार आहे, त्यानंतर त्यांचे कायद्यात रुपांतर होणार आहे. राज्यसभेत गदारोळ सुरु असल्यामुळे या विधेयकावर चर्चा होऊ शकली नाही. त्यानंतर विरोधी पक्षांनी सूचवलेल्या दुरुस्त्या फेटाळून लावत हे विधेयक सभागृहाने आवाजी म तदानाने पारित केले. या विधेयकात ऑनलाईन मनी गेम्ससंदर्भातील जाहिराती प्रतिबंधित करण्याची तसेच अशा गेम्सला बँका आणि अन्य वित्तीय संस्थांनी आर्थिक मदत करण्यापासून रोखण्याची तरतूद आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या खेळाला गेमिंग डिसऑर्डर घोषित केले आहे, याकडे लक्ष वेधत वैष्णव म्हणाले की, लोकांच्या मानसिक आरोग्याचा मुद्दा झाला आहे. अनेकांनी आत्महत्या केल्यामुळे कुटुंबे उदध्वस्त झाली.

# सरकारी नोकरदारांना पाच दिवसआधीच पगार

## गणेशोत्सवासाठी शासनाचा निर्णय ● मंगळवारी जमा होणार रक्कम



**मुंबई, २१ ऑगस्ट**

शासकीय कर्मचाऱ्यांचा १ तारखेला होणारा पगार या महिन्यात पाच दिवसाआधीच म्हणजे २६ ऑगस्ट रोजी करण्याचा निर्णय गुरुवारी राज्य सरकारने घेतला. गणेशोत्सवामुळे सरकारने राज्यातील शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्ती वेतनधारक यांना खूशखबर दिली.

गणेशोत्सवाच्या काळात शासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी ऑगस्ट महिन्याचा पगार २६ ऑगस्ट रोजीच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे सरकारी नोकरदारांचा गणेशोत्सावाचा आनंद द्विगुणीत झाला. गुरुवारी शासन निर्णय काढून १ सप्टेंबर रोजी होणारे कर्मचारी व अधिकाऱ्यांचे पगार पाच दिवसआधीच करण्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा परिषद, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, अकृषि विद्यापीठे, कृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालयांचे अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत वेतनधारक आणि कुटुंब निवृत वेतन धारक यांनाही हा निर्णय लागू राहणार आहे. गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी मिळणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### रात्री १२ वाजेपर्यंत देखावे दाखवण्यास परवानगी

गणेशोत्सव काळात गणेश मंडळांना रात्री बारा वाजेपर्यंत देखावे दाखवण्यासाठी शेवटचे पाच दिवस परवानगी राहणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी कराड येथे दिली आहे. याबाबतचा आदेश लवकरच मुख्यमंत्री जाहीर करणार असल्याचे ते म्हणाले.

# पाकिस्तानशी द्विपक्षीय क्रीडा संबंध नाहीच : क्रीडा मंत्रालय

- आशिया चषकासाठी क्रिकेट संघाला रोखणार नाही

**नवी दिल्ली, २१ ऑगस्ट**

भारत आणि पाकिस्तान कोणत्याही द्विपक्षीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार नाहीत, असे क्रीडा मंत्रालयाने गुरूवारी स्पष्ट केले. परंतु भारतीय क्रिकेट संघाला पुढील महिन्यात आशिया चषक स्पर्धे त खेळण्यापासून रोखले जाणार नसल्याचे सांगितले. क्रीडा मंत्रालयाने भारताच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांबाबत नवीन धोरण जाहीर केले, यात पाकिस्तानवर भर देण्यात आला आहे. ते तात्काळ लागू होईल, असे सूत्रांनी सांगितले. पाकिस्तानची वर्तणूक आणि व्यवहारावर भारताचे क्रीडा धोरण अवलंबून आहे. बहुपक्षीय क्रीडा स्पर्धांमध्ये दोन्ही देशांचा सामना होऊ शकतो पण कोणत्याही परिस्थितीत द्विपक्षीय क्रीडा स्पर्धा होणार नाहीत. अर्थात भारत पाकिस्तानात खेळण्यासाठी जाणार नाही आणि भारतात येण्याची परवानगी पाकिस्तानला दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. तथापि, बहुपक्षीय स्पर्धांवर परिणाम होणार नाही.

# राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई, २१ ऑगस्ट**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या 'वर्षा' या अधिकृत निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध शक्यता वर्तवल्या जात आहेत. मुंबईला भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा झाल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पहिल्यांदाच संयुक्तपणे बेस्ट पतपेढीची निवडणूक लढवली.



या निवडणुकीत त्यांचा मानहानिकारक पराभव झाला. त्या पृष्ठभूमीवर राज ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. राज्यातील काही शहरांमध्ये झोपडपट्टी पुनर्विकास होत आहे. त्यामुळे काही परिसरांमध्ये कित्येक पटीने लोकसंख्या वाढली आहे.

परिणामी, रहिवासी पार्किंगच्या समस्येला तोंड देत असून, कित्येक वाहने रस्त्यांवर आली आहेत आणि त्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत, असे राज ठाकरे यांनी यावेळी पत्रकारांसोबत चर्चा करताना सांगितले.

देवेंद्र फडणवीसांना एक सादरीकरण देण्यात आले. यावेळी मुंबईचे पोलिस आयुक्त आणि पोलिस वाहतूक विभागाचे उपायुक्तही उपस्थित होते.

MGM UNIVERSITY
Shaping Futures Through Holistic Learning



ADMISSION OPEN 2025-26
- NEP-2020 Aligned Program Structure
- Global Tie-ups
- World Class Infrastructure

Join UG, PG & Diploma Programs :
- Engineering & Technology
- Computer Science & IT
- Bioscience & Technology
- Management & Commerce
- Basic & Applied Science
- Hotel Management & Culinary Arts
- Interdisciplinary Studies
- Gandhian Studies
- Social Sciences
- Journalism & Mass Communication
- Photography
- Legal Studies & Research
- Design & Fine Arts
- Performing Arts
- Film Arts
- Indian & Foreign Languages
- Music & Theatre
- Pharmaceutical Sciences
- Education, Sports, Physical Education & Yog Science

Scan To Apply
90676 12000 | 0240 6481111 | www.mgmu.ac.in
MGM University, N-6, Cidco, Chh. Sambhajinagar - 431003, Maharashtra.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### ईडीने जप्त केलेली रोकड माजी आयुक्त पवार यांची नाही : वकिलाचा दावा

**मुंबई दि. २१ ऑगस्ट-**

वसई-विरार शहर महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावरील कारवाई सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ईडीया तपास यंत्रणेने ठराविक पुरावे गोळा करून केली आहे.पवार यांच्या निवासस्थानातून एक कोटी ३३ लाख रुपयाची जी रोकड जप्त केली आहे, ती विकासक जनार्दन पवार यांच्याशी संबंधित आहे,असा दावा पवार यांचे वकील ॲड.डॉ.उज्वलकुमार चव्हाण यांनी केला आहे. मनी लाँड्रिंग प्रकरणी गेल्या महिन्यात निवृत्तीच्या दुसऱ्यादिवशी ईडीने पवार यांच्या घरी छापा टाकला होता. तर आठ दिवसापूर्वी त्यांना अटक केली आहे. याबाबत पवार यांच्याशी संबंधित कंपन्यातून आर्थिक व्यवहार झाले हे चुकीचे आहेत.जो ईडीने जो मुद्देमाल दाखवला आहे,तो पवार यांच्याशी संबंधित नाही यातील दुसरा आरोपी वाय.एस रेड्डी यांचे संबंधित आहे. या संपूर्ण प्रकरणाचा योग्य,निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने तपास व्हावा,अशी मागणी ड. चव्हाण यांनी केली आहे, वसई विरार शहर महापालिका हद्दीतील ४१ अनाधिकृत इमारतीच्या बांधकाम ाच्या आरोपाखाली माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांना ईडीने अटक केली. २००९ ते १० या कालावधीत या इमारतीचे बांधकाम झाले आहे.त्या काळात पवार हे या ठिकाणी महापालिका आयुक्त म्हणून नव्हते. पोलीस दप्तरी २५ विकासकावर गुन्हा दाखल आहे. दरम्यान,२० ऑगस्ट २०२५ रोजी न्यायालयात झालेल्या सुनावणीवेळी ईडीने न्यायालयाकडे कोणत्याही कस्टडीची मागणी केलेली नाही. उलट;आम्ही या प्रकरणाचा तपास पूर्ण व्हावा, असा युक्तिवाद केला असल्याचा दावा त्यांनी केला आहे..

### चंद्रभागेने ओलांडली इशारा पातळी...

**पान १ वरून...**

निरानरसिंहपूर अर्थात संगम येथून भीमा नदी १ लाख ७८ हजार क्युसेकने वाहते आहे.तर पंढरपूर मध्ये चंद्रभागा नदी मध्ये सध्या १ लाख २० हजार क्युसेकचा विसर्ग मिसळतो आहे. त्यामुळे पंढरपूरात चंद्रभागा नदीने रौद्ररुप धारण केलेले आहे. पंढरपूरात व्यासनारायण झोपडपट्टी, अंबिका झोपडपट्टी आदी सखल भागात पाणी आलेले आहे. त्यामुळे या भागातील सुमारे दीडशे कुटुंबांना बुधवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास सुरक्षीत ठिकाणी स्थलांतरीत केलेले आहे. येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून कॉटेज हॉस्पिटल समोरील रायगड वारकरी भवन येथे स्थलांतरीत करण्यात आलेल्या नागरिकांची चहा, नाश्ता तसेच जेवणाची व्यवस्था केली जात आहे. या बरोबरच गोपाळपूर येथील जुन्या दगडी पूलावर देखील पाणी आलेले आहे. त्यामुळे पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक पुर्णपणे बंद केलेली आहे. शहरातील चंद्रभागा नदीवरील प्रत्येक घाटांवर बॅरेकेटींक करुन त्या ठिकाणी पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आलेले आहे. पालिका प्रशासनाकडून वारंवार ध्वनीक्षेपकावरुन भाविकांनी तसेच शहरातील नागरिकांनी चंद्रभागा नदीपात्राकडे जावु नये असे आवाहन केले जात आहे. येथील संतपेठ परिसरातील सखल भागात ज्यावेळी पाणी शिरण्यास सुरुवात होईल त्या अगोदर त्या भागातील झोपडपट्टी तसेच परिसरातील नागरिकांना सुरक्षीतस्थळी हलविण्यासाठी पालिकेची यंत्रणा संतपेठ भागात सज्ज करण्यात आलेली आहे. दरम्यान पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी गुरुवारी दुपारी प्रत्यक्ष फिरुन पूरपरिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थलांतरीत केलेल्या कुटुंबाशी देखील संवाद साधुन त्यांना देण्यात येत असलेल्या सोयीसुविधांची पाहणी केली. यावेळी आमदार आवताडे यांनी स्थलांतरीत करण्यात आलेल्या नागरिकांच्या सर्व प्रकारच्या सोयीसुविधांकडे जातीने लक्ष घालण्याच्या सूचना येथील प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे आणि पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांना दिल्या आहेत.

**नदीपात्रालगतच्या अतिक्रमणामुळे प्रशासनाची वाढली डोकदुखी**

यंदाच्या हंगामात या अगोदर तीनवेळा पूरसदृश्य स्थिती निर्माण झालेली होती. यंदातर चक्क पूर येवून बुधवार पासून व्यासनारायण, अंबिका झोपडपट्टी परिसरात पाणी शिरलेले आहे. या बरोबरच गुरुवारी सायंकाळ पर्यंत संतपेठेतील सखलभागात देखील पाणी शिरण्याचा अंदाज प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आलेले आहे. दरम्यान येथील व्यासनारायण तसेच अंबिका झोपडपट्टी भागात अगदी नदीपात्रात तसेच नदीपात्रालगत अनेक नागरिकांनी आपली घरे वसविली आहेत. त्यामुळे उजनी धरणातून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग केल्यानंतर प्रत्येक वेळी येथील नागरिकांना सुरक्षीत स्थळी हलविण्याची प्रक्रिया नगरपालिका प्रशासनाला पार पाडावी लागते आहे. पूरस्थिती हाताळताना नदीपात्रातील केलेल्या अतिक्रमणामुळे येथील पालिका, महसूल आणि पोलिस प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नाहक त्रास होतो आहे. फ्लडएरिया अर्थात पूररेषेत करण्यात आलेली अतिक्रमणे ही प्रशासनाची डोकेदुखी बनली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालून चंद्रभागेचे पात्र मोकळे करावे**

प्रत्येक वेळी उजनी धरणातून पाणी सोडल्या नंतर येथील नदीपात्रातील अतिक्रमण करुन व्यासनारायण, अंबिका आदी सखल भागात झोपड्या वसविलेल्या नागरिकांवर जरब बसविण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्यामुळे सोलापूरचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या प्रकरणी तातडीने लक्ष घालून फ्लडऐरिया विशेषत: अगदी चंद्रभागा पात्रात किंवा पात्रालगत वसविण्यात आलेल्या अतिक्रमणांवर जेसीबी चालवून चंद्रभागेला मोकळा श्वास घेऊ देणे गरेजेचे बनले आहे.

**या धरणातून सोडण्यात आले पाणी**

घोड धरणातून ( २० हजार क्युसेक),चासकमान प्रकल्पातून (४ हजार ५७० क्युसेक ), वडीवळे प्रकल्पातून ( ५ हजार २१६ क्युसेक) आंद्रा प्रकल्पातून (३ हजार ५१६क्युसेक ),पवना प्रकल्पातून (३ हजार ४६० क्युसेक ), मुळशी धरणातून (११ हजार ३०० क्युसेक) तर खडकवासला प्रकल्पातून ( ३९ हजार १३८ क्युसेक ) त्यामुळे उजनी धरणातील पाण्याची आवक वाढलेली दिसत आहे.

**उजनीची सायंकाळी साडेपाचची स्थिती**

उजनी धरणातून गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजल्या पासून भीमा नदी मध्ये १ लाख ५० हजार क्युसेकने पाणी सोडले जात आहे. उजनीत येणाऱ्या पाण्याची आवक ही १ लाख ६५ हजार क्युसेकच्या आसपास आहे. त्यामुळे उजनीतून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग भीमा नदीमध्ये केला जात आहे. संगम येथे दुपारी चारच्या सुमारास १ लाख ९५ हजार क्युसेकने भीमा नदी वाहत होती. तर पंढरपूरात चंद्रभागा नदीपात्रात सध्या १ लाख ४० हजार क्युसेक इतका आहे. उजनी धरण १०५.४७ टक्के इतके भरलेले आहे. त्यामुळे वरुन येणाऱ्या पाण्याला सामावुन घेण्याची उजनी धरणाची क्षमता फार कमी राहिलेली दिसत आहे. त्यामुळे उजनी धरणातून केल्या जाणाऱ्या विसर्गात वाढ होताना दिसत आहे.



# कॉर्पोरेट कंपन्यांनी दुर्गम व मागास जिल्ह्यांमध्ये काम करावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ ऑगस्ट -**

कॉर्पोरेट व खासगी संस्थांनी आपले सामाजिक उत्तरदायित्वाचे काम करताना शहरी भागावर लक्ष केंद्रीत न करता दुर्गम आणि विकासाच्या दृष्टीने मागास जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक व सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम राबविण्यावर भर द्यावा., महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तनाच्या नव्या टप्प्यात सर्वांनी एकत्र येत व्यापक आणि परिणामकारक परिवर्तन घडवून आणूयात, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनच्या पाचव्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सिद्धिविनायक देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर, मुख्य सचिव राजेश कुमार, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, व्हीएसटीएफचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीणसिंह परदेशी, टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा, जेएसडब्ल्यू ग्रुपच्या संगीता जिंदाल, आयडीबीआयचे व्यवस्थापकीय संचालक राकेश शर्मा, जीआयसी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रामास्वामी नारायणन, यांच्यासह गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य उपस्थित होते. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते एसटीएल लिमिटेडने तयार केलेल्या जलसंधारण कामाच्या अहवालाचे प्रकाशन तसेच लातूर येथील रावसाहेब पाटील शेतकरी उत्पादक कंपनीच्या वेअर हाऊसचे ई अनावरण करण्यात आले.



दर्जा व्यवस्थापनासंदर्भात क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया आणि व्हिएसटीएफ यांच्यात तसेच 'हरित छत्रपती संभाजी नगर उपक्रम' राबविण्यासंदर्भात एसटीएल, व्हिएसटीएफ व छत्रपती संभाजी नगर महापालिका, सामाजिक वनीकरण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, व्हीएसटीएफच्या पहिल्या टप्प्यात अनेक गावांम ध्ये राबविलेल्या योजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून त्याच्या मूल्यमापनाचे परिणाम उत्साहवर्धक आहे. या टप्प्यात काही त्रुटी राहिल्या असल्या तरी त्या सुधारून दुसऱ्या टप्पा अधिक प्रभावीपणे राबवून तो यशस्वी करू. ग्राम परिवर्तन उपक्रमाची अंमलबजावणी करताना व्हीएसटीएफचे फेलोज गावातून बाहेर पडल्यावर तेथील परिवर्तनाचा वेग मंदावल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या पुढील काळात गावातच उपलब्ध मनुष्यबळावर आधारित संस्थात्मक संरचना उभी करणे गरजेचे आहे. गावांमध्ये योजनांची अंम लबजावणी करताना प्रत्येक गावाची गरज ओळखून योजनांमध्ये बदल केल्यास परिवर्तनाची गती वाढेल.

यावेळी टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा म्हणाले की, महाराष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी टाटा ग्रुप व टाटा ट्रस्ट नेहमीच राज्य शासनाला सहकार्य करेल. टाटा ग्रुपने सामाजिक उत्तर दायित्व निधीसाठी २० ते २५ टक्के वाटा ठेवला आहे. यामधून विदर्भ व इतर मागास भागातील सामाजिक, आर्थिक विकास क्षेत्रात काम करत आहे. याबरोबरच ग्रामविकास, जलसंधारण आदी क्षेत्रातही टाटा ग्रुप काम करत असून यासंदर्भात विविध शासकीय संस्थांबरोबर सामंजस्य करार केला आहे. त्याशिवाय मुख्यमंत्री वैद्यकीय मदत निधीसाठीही टाटा ग्रुप सहकार्य करत आहे. तसेच चंद्रपूर येथील कॅन्सर रुग्णालयासाठी निधी देत असून अमरावती व सोलापूरमधील शासकीय रुग्णालयालाही मदत करण्यात येत आहे.

जिंदाल ग्रुपच्या संगीता जिंदाल यांनी सांगितले की, जिंदाल समूहासाठी महाराष्ट्र हे राज्य म हत्त्वाचे असल्याने राज्याच्या विकासासाठी नेहम ीच पुढाकार घेत आहोत. जिंदाल समूहाच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील ५० गावांमध्ये परिवर्तनासाठी काम करणार आहे. त्याचबरोबर अलिबाग, चंद्रपूर जिल्ह्यासारख्या ठिकाणीही सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून कामे हाती घेणार आहे.

# रिक्षात अवैध गॅस भरताना पंढरपुरात दोघांना अटक

## शहर पोलीसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ ऑगस्ट-**

पंढरपूर शहर अवैधरीत्या रिक्षामध्ये गॅस भरुन तो विक्री करीत असताना शहर पोलीसांनी कारवाई करत दोघांना अटक केली. तर गॅस टाकी, गॅस भरण्याचा कॉम्प्रेसर, वजनकाटा, एक रिक्षा असा ७६ हजार ६८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी अवैध गॅस भरणारी करणारी टोळी पकडण्यांसाठी पंढरपूर शहरातील गाडगे महाराज चौक ते विस्थापीत नगर कडे जाणा-या रोड लगत असलेल्या पत्राशेडमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पंढरपूर येथील पोलीस पथक पाठवून सदर पथकाचेव्दारे छापा कारवाई केली. या ठिकाणी यातील आरोपी गणेश पोपट लिंगे रा. माळी वस्ती, टाकळी रोड, पंढरपूर व निलेश कृष्णा राजुरकर रा.हनुमान नगर, टाकळी रोड, पंढरपूर हे अवैधरीत्या गॅस रिक्षा म ध्ये भरताना मिळून आले. त्यांच्या ताब्यातून घरगुती वापरासाठी लागणा-या गॅस टाकी, गॅस भरण्यााच कॉम्प्रेसर, वजनकाटा, एक रिक्षा असा ७६ हजार ६८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात जिवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.ही कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, सहा. पोलीस अधिक्षक पंढरपूर उपविभाग प्रशांत डगळे यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पिसाळ, पोलीस उपनिरीक्षक घुगरकर, पोह निलेश रोंगे, पोना विनोद शिंदे, पोकॉ राहुल लोंढे, पोकॉ शिवशंकर हुलजंती यांनी केलेली आहे.

# सासरच्या जाचास कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**माढा तालुक्यातील दहिवलीतील घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२१ ऑगस्ट-**

माढा तालुक्यातील दहिवली येथे सासरच्या मंडळीकडून होणाऱ्या असह्य शारीरिक व मानसिक त्रासास कंटाळून विवाहीतेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. काजल नारायण मिस्किन (वय-३०) रा.दहिवली असे मयत विवाहितेचे नाव असून पती नारायण विलास मिस्किन, सासू शोभा विलास मिस्किन, सासरा विलास रामचंद्र मिस्किन यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.



काजलचा भाऊ लक्ष्मण दिगंबर वागज (वय -२४) रा. बावी ता.म ाढा,जि.सोलापूर याने फिर्याद दिली आहे. काजल हिचा २०१९ मध्ये मौजे दहिवली ता.माढा येथील नारायण विलास मिस्किन याच्यासोबत विवाह झाला. एक वर्ष व्यवस्थित नांदविले. त्यानंतर सन २०21 पासून तिचा नवरा नारायण मिस्कीन, सासरे विलास मिस्किन, सासू शोभा मिस्कीन हे काम करत नाही, ट्रॅक्टर घेण्यासाठी पैसे आणत नाही म्हणून त्रास देत होते. परिस्थिती गरीब असल्याने आमच्याकडून त्यांना पैसे देणे होत नव्हते. यामुळे वरील सर्वजण बहिणीस सतत मारहाण करीत असत. तिचा शारीरिक व मानसिक छळ करीत होते. असे फिर्यादीत म्हटले आहे. आत्महत्या की हत्या याबाबत संभ्रम असल्याने शवविच्छेदनासाठी काजलचा मृतदेह सोलापूरला पाठवण्याची मागणी म ाहेरच्या लोकांनी केली. त्यानुसार मृतदेह सोलापूरला पाठवला मात्र त्याचा अहवाल अद्याप आलेला नसल्याने संभ्रम कायम आहे.

# विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**

एइएसएल लिमिटेडचा अँथे २०२५ आज भारतभरातील विद्यार्थ्यांसाठी संधीचं प्रतीक बनला आहे.मागील १६ वर्षापासून आम्ही हुशार आणि गुणी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करता यावा,यासाठी आम्ही मदत करीत आलो आहोत,त्यांची आर्थिक पार्श्वभूमी किंवा स्थान कुठलेही असो.'आकाश' मध्ये, प्रत्येक विद्यार्थ्यांम ध्ये समस्यांचं समाधान शोधण्याची क्षमता आहे. त्याचा महत्वाचा टप्पा म्हणून राष्ट्रीय स्तरावरील 'अँथे २०२५' ला सामोरे जाताना विद्यार्थ्यांसाठी एक संधी असल्याचे आकाशचे असि.डायरेक्टर दीपक सिक्रोरिया यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. शैक्षणिक क्षेत्रातील अत्यंत प्रतीक्षित असलेल्या 'अँथे २०२५ चा मूळ उद्देश इयत्ता ०५ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जाण्यास आणि खऱ्या अर्थाने त्यांना येणाऱ्या सम स्यांचं निरसन होण्यासाठी सक्षम करणे हा आहे.



इयत्ता ०५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी रूपये २५० कोटींपर्यंत शिष्यवृत्ती (१०० टक्के पर्यंत) आणि रुपये २.५ कोटींचं रोख पारितोषिक जाहीर करण्यात आलं आहे. एइएसएल ने 'आकाश इन्व्हिक्टस एस टेस्ट' लॉन्च केला शिष्यवृत्ती आणि आकाश इन्व्हिक्टस मध्ये प्रवेशासाठी सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.अँथे परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही स्वरूपात ०४ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान होणार असल्याचं असि. डायरेक्टर दीपक सिक्रोरिया यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस अकॅडमी हेड मेडिकल सुनील राऊत,असिस्टंट डायरेक्टर दीपक सिकोरिया,एरिया बिझनेस हेड इम्रान खान,अकॅडमी हेड फाउंडेशन विवेक सेंगरव शाखाप्रमुख राहुल बोद्दूल उपस्थित होते.

## उपराष्ट्रपती पदाची निवडणुक; आयोगातर्फे निरीक्षकांची नियुक्ती

**मुंबई, दि .२१ ऑगस्ट -**

भारतीय संविधानातील कलम ३२४ अंतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून भारताच्या निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपती निवडणूकीसाठी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. येत्या ७ सप्टेंबरला ही निवडणूक होणार असून त्याचदिवशी मतमोजणी होणार आहे. निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून सुशीलकुमार लोहानी, आयएएस अतिरिक्त सचिव, पंचायती राज मंत्रालय आणि डी. आनंदन,, अतिरिक्त सचिव, वित्त मंत्रालय (व्यय विभाग) यांची नियुक्ती केली आहे.याशिवाय, नितीनकुमार शिवदास खाडे, आयएएस (आसाम-मेघालय ), संयुक्त सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय (भूमी संसाधन विभाग) यांना राखीव यादीत स्थान देण्यात आले आहे.उपराष्ट्रपती निवडणुकीचे संपूर्ण आयोजन पारदर्शक आणि सुरळीत पार पडावे, यासाठी निवडणूक आयोगाकडून हे उपाय करण्यात आले असल्याचे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



## सांगोला विद्यामंदिरचे रांगोळी स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ ऑगस्ट -**

सांगोला नगरपरिषदेच्या वतीने हर घर तिरंगा घर घर तिरंगा - २०२५ या उपक्रम ांतर्गत घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले. यामध्ये इ.१० वी ब मधील अनुश्री महेश खुळपे प्रथम, इ.९ वी क मधील तेजश्री लक्ष्मण रणदिवे द्वितीय, ब मधील रुचिता संजयकुमार कदम तृतीय तर इ.१० वी ब मधील मनीष मनोजकुमार पाटील उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. वरील स्पर्धेच्या नियोजनासाठी उत्सव विभाग प्रमुख नरेंद्र होनराव यांचे सहाय्य लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक अमोल उकळे, समाधान शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म ल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके यांच्यासह प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंताम णी देशपांडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरुटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## कुसमोड ग्रा.पं.ची ग्रामसभा खेळीमेळीत

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि २१ आगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा आज सरपंच शहाजी लेंगरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी विविध विकासकामे, रोजगार हमी योजनेअंतर्गत येणाऱ्या सलग फळबाग लागवड, बांधावरील लागवड यासह कृषी खात्याच्या विविध योजनांची यावेळी कृषी सहहयाक देशमुख यांनी माहिती दिली. यावेळी ग्रामविकास अधिकारी आतार यांनी विविध विकास कामे व इतर विषयावर सविस्तर माहिती दिली. यावेळी गावातील विविध अडी अडचणी व इतर विषयावर चर्चा झाली तसेच प्रधानमंत्री आवास योजना याचा आढावा घेण्यात आला ,अहील्यादेवी सिंचन विहीर योजना, गाय- गोठा यासह इतर शासकीय योजना यावर सखोल चर्चा यावेळी करणयात आली ,रोजगार हमी योजनेअंतर्गत घरकुल व इतर बिलांसंबधी सविस्तर चर्चा यावेळी करणयात आली. . या ग्रामसभेस उपसरपंच रेखा पालखे ,माजी सरपंच तुषार लवटे ,माजी सरपंच महावीर धायगुडे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब धायगुडे, माजी सरपंच सिताराम धायगुडे, सतिश व्होनमाने, पोपट कचरे ,माजी उपसरपंच व पत्रकार संजय पाटील, मारुती वाघ ,अनिल धायगुडे, शहाजी वाघ ,विकास वाघ ,जगदीश गायकवाड, नितीन लेंगरे, अज्ञान धायगुडे, ग्राम रोजगार सेवक अशोक राजगे सुभाष जाधव ,अण्णा कचरे ,मनोहर लवटे,पोलीस पाटील विकास सरगर, उमाजी बोडरे ,देवानंद चव्हाण, विशाल बोडरे ,लक्ष्मण देवकते,यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कोल्हापूरसाठी हायकोर्ट एक्सप्रेस सुरू करा



## अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ ऑगस्ट -**

कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचचे उदघाटन नुकतेच संपन्न झाले. सोलापूर जिल्ह्यातील सर्वच पक्षकार व विधीज्ञासाठी वेगवान प्रवासाची गरज लक्षात घेता सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने सोलापुरातून पहाटे ५ वाजता सोलापूर-कोल्हापूर-सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेस सुरू करण्यात यावी अशी मागणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



कोल्हापूर येथील सर्किट बेंचमध्ये किमान दररोज १५०० वकील, पक्षकार जिल्ह्यातून ये-जा करतील असा अंदाज आहे. न्यायालयीन कामकाज असल्याने पहाटे सत्रात ही रेल्वे सोलापुरातून कोल्हापूर एक्सप्रेस सुरू करण्यात यावी व धाराशिव-कोल्हापूर-धाराशिव रेल्वे सुरू करण्यात यावी. या दोन्ही रेल्वेस मोहोळ, माढा, कुर्डूवाडी, मोडनिंब, पंढरपूर, सांगोला, ढालगाव, कवठेम हांकाळ, सलगरे या ठिकाणी थांबे मंजूर करावेत. या भागातील नागरिकांची सोय होणार आहे. उच्च न्यायालयीन कामकाजापूर्वी सकाळी दहाच्या सुमारास कोल्हापुर येथे पोहोचावी व सायंकाळी परतीच्या प्रवासाकरता सहा वाजता याच मार्गाने हे थांबे घेऊन ही रेल्वे सुरू करावी व त्यास हायकोर्ट एक्सप्रेस नाव देण्यात यावे. पुढील कार्यवाहीस्तव आपल्या स्तरावरून विशेष बाब म्हणून या रेल्वे करता आदेश निर्गमित करावेत अशी मागणी रेल्वेमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील वकील बार असोसिएशनचे या मागणीचे ठराव व पत्र देण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती जनरल मॅनेजर, मध्य रेल्वे मुंबई ,खा.धैर्यशील मोहिते-पाटील, खा.प्रणितीताई शिंदे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर यांनाही देण्यात आले आहेत.

सर्किट बेंचच्या कामासाठी सोलापूरहुन नव्या इंटरसिटी एक्सप्रेस गाडी सुरू करावी अशी मागणी शहीद अशोक कामटे सामाजिक संघटनेसह जिल्ह्यातील सर्व विधीज्ञ संघटनांनी केली आहे, पाठपुरावा सुरू आहे. अपेक्षित यश मिळेल.

**- ॲड.बाबाराजे जाधव, अध्यक्ष, सोलापूर विधीज्ञ महासंघ.**

सर्किट बेंचचे कामकाज स.९.३० वा.सुरू होऊन ते सायं.४.३० वा. समाप्त होणार असल्याने या वेळेपूर्वी व नंतर सोलापूर-कोल्हापूर-सोलापूर इंटरसिटी सुरू करावी या मागणीचा पाठपुरावा अक्कलकोट, सोलापूर, बार्शी, माढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, करमाळा विधीज्ञ असोसिएशनसह कामटे संघटना करीत आहे याबाबत रेल्वे प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे

**-निलकंठ शिंदे, अध्यक्ष, अशोक कामटे संघटना, सांगोला.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सीपी, एसपी अन् मंडळांची भूमिका निर्णायक!

## डॉल्बी : नागरिकांचा जीव धोक्यात तर लोकप्रतिनिधी, अधिकारी, मंडळांचे पदाधिकारी यांची संवेदनशीलता पणाला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

जीवघेणा डॉल्बी भस्मासूर ठरणार असून एकेदिवशी या कर्णकर्कश्य डॉल्बीचा आघात आपल्यावर अथवा आपल्याच कुटुंब अथवा नात्यातील किंवा आप्तेष्टांवर झाल्यानंतरच आपले डोळे उघडणार असतील तर यापेक्षा दुसरी शोकांतिका असू शकत नाही. डॉल्बीसाठी कायद्याने मर्यादा घालून दिली असली तरी आवाजाच्या मर्यादेचे सर्रासपणे उल्लंघन होते हे कोणीही नाकारू शकणार नाही. देवी-देवता आणि महापुरुषांच्या सण, जयंती उत्सवात वाजविल्या जाणाऱ्या जीवघेण्या डॉल्बी राक्षसाला वेळीच थोपवले नाही तर आपण नवीन पिढीला काय शिकवतो आहे याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आहे. डॉल्बीबाबतच्या कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांच्यासह त्यांच्या संपूर्ण टिमची तर आहेच, पण सामाजिक कार्यात झोकून देणाऱ्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची देखील आहे. नागरिकांचा जीव धोक्यात असल्याने डॉल्बीविरोधात लोकांचा आवाज उठत आहे. तर लोकप्रतिनिधी, अधिकारी व मंडळ पदाधिकाऱ्यांची संवेदनशीलता पणाला लागली आहे.

विविध सण, उत्सव आणि महापुरुषांच्या जयंत्या या मोठ्या थाटामाटात साजऱ्या झाल्याच पाहिजेत, याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारणच नाही. हे सारे करत असताना समाजाच्या भावना देखील जपणे तितकेच महत्वाचे आहे. कारण एखाद्या गोष्टीची समाजमान्यता कमी होत चालल्यास ते योग्य होणार नाही. मिरवणुका निघाल्या पाहिजेत पण मिरवणुकांमध्ये पारंपारिक वाद्य वाजवणे देखील समाजमनाचा मान राखण्यासाठी गरजेचे आहे. वर्षभरात निघणाऱ्या प्रत्येक मिरवणुकांमध्ये सहभागी होणाऱ्या विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी पुढाकार घेवून जीवघेण्या डॉल्बीला विरोध करणे काळाची गरज बनले आहे. कारण मिरवणुकांमध्ये सहभागी आपल्याच जीवाभावाच्या कार्यकर्त्यांचा बळी जर डॉल्बीमुळे जाणार असेल तर मग अशा जीवघेण्या आनंदाचा स्वीकार मंडळांचे पदाधिकारी कसे करतील.

आपण ज्या महापुरुषांची जयंती मोठ्या थाटात साजरी करतो, त्या महापुरुषांची शिकवण आचरणात आणण्याची वेळ आज प्रकर्षाने जाणवत आहे. सामाजिक कार्यात सरसावणाऱ्या विविध मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना समाजभान तर आहेच पण ते संवेदनशील देखील आहेत. डॉल्बी नव्हते त्यापूर्वी मिरवणुका निघत नव्हत्या का? तर नक्कीच निघत होत्या. आजही काही मंडळे पारंपारिक वाद्यांचा वापर करून आनंदात मिरवणुका काढतात आणि मिरवणुकांचा आनंद लुटतात. पूर्वी मिरवणुका पाहण्यासाठी रस्त्यांच्या दुतर्फा अबालवृध्दांची गर्दी होत होती. आता देखील गर्दी होते, पण त्या गर्दीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. कारण मिरवणुकीत वाजविल्या जाणाऱ्या जीवघेण्या डॉल्बीचा आवाज अनेकांना असह्य होतो. लहान मुले, वयोवृध्दांना या कर्णकर्कश्य आवाजाची भिती वाटते. परंतु सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आजारी माणसे, दवाखान्यातील उपचार घेणारे रुग्ण यांच्यावर या घातक आवाजाचा काय परिणाम होत असेल याचा देखील प्रत्येकानेच विचार करण्याची वेळ आलेली आहे. मिरवणुकीच्या मार्गावर असलेल्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांनी कुठे जायचे आणि आवाज कसा सहन करायचा हा मोठा गहन प्रश्न आहे. मिरवणूक मार्गावर राहणाऱ्या वयोवध्द, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांना या असह्य आवाजाचा किती त्रास होत असेल याबाबत कधीतील आपल्याच घरातील गृहिणींसह सदस्यांना विचारून मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी याबाबत आत्मपरीक्षण करणे आज काळाची गरज आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

मिरवणुका काढण्याबाबत अथवा आवाजाची मर्यादा पाळून डॉल्बी वाजविण्याबाबत कोणाचा आक्षेप नाही. परंतु एकदा का मिरवणुकीचा जल्लोष सुरु झाला अन् आवाजाच्या जोशात नृत्य सुरु झाले की मग बेभान नाचण्याच्या नादात आवाज वाढल्याचे कोणालाही भान रहात नाही. मात्र ज्यांना हृदयरोगाचा त्रास आहे, अशांना मात्र या कर्णकर्कश्य आवाजाचा मोठा धोका असतो. नुकत्याच पार पडलेल्या मिरवणुकीमध्ये एका युवकाला डॉल्बीच्या आवाजाने जीव गमवावा लागल्याची दुर्घटना ताजी आहे. एखाद्या मोठ्या समुहाला एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचे गांभीर्य तितकेसे नसेलही परंतु ज्या आई-वडिलांना आपला मुलगा गमवावा लागतो त्यांच्या हे दुःख डोंगराएवढे असते. डॉल्बीच्या आवाजाने बळी घेतलेल्या तरुणाचे जर का लग्न झाले असेल तर त्याची पत्नी, मुले यांच्यावर दुःखासह संकटाचा डोंगर कोसळतो, याची कल्पना देखील करवत नाही. ज्या कुटुंबातील व्यक्ती दगावते, त्या कुटुंबालाच त्या घटनेचे गांभीर्य कळते. कायद्याचे रक्षण करणे हे पोलिस खात्याचे कर्तव्यच आहे, पण कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी तूमच्या-आमच्यासह सर्वांचीच आहे. पोलिस खात्याने देखील डॉब्लीच्या भस्मासूराला वेळीच रोखणे काळाची गरज आहे. पोलिसांनी याबाबत निर्णायक भूमिका घेण्यासाठी राज्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांनी पोलिसांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहणे गरजेचे आहे. तर लोकप्रतिनिधींना समाजमान्यता असते आणि त्यांचे लोकदेखील ऐकतात. डॉल्बीबाबत लोकप्रतिनिधींनी समाजजागृती केल्यास नक्कीच मंडळांचे पदाधिकारी व युवा कार्यकर्ते देखील डॉल्बीच्या दुष्परिणामांना ओळखून सकारात्मक प्रतिसाद देतील यात शंका नाही.



शहरी भागात पोलिस आयुक्तांनी तर ग्रामीण भागात पोलीस अधीक्षकांनी डॉल्बीबाबतच्या कायद्याचे रक्षण प्रकर्षाने करण्याची वेळ आली आहे. कारण जनतेचा आवाज हा देवाचा आवाज असतो, असे म्हंटले जाते. डॉल्बीच्या त्रासाबाबत आता जनतेतून उठावाला सुरुवात झाली आहे. सहनशील जनता, समंजस्य समाज जोपर्यंत शांत असतो तोपर्यंत सर्वकाही आलबेल असते, पण एखादी गोष्ट जनतेने मनावर घेतली तर देवदेखील जनतेच्या आवाजाला साथ देतो. राज्यकर्ते, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, पोलिस अधिकारी यांच्यासह वर्षभर साजऱ्या होणाऱ्या जयंती मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी संवेदनशीलता दाखविण्याची योग्य वेळ हीच आहे.

### विना डॉल्बी मिरवणुकांना बक्षिसे

वर्षभर मिरवणुकांचा माहोल असणारे शहर म्हणून सोलापूरची ओळख आहे. मिरवणुकांमध्ये वाजविल्या जाणाऱ्या जीवघेण्या डॉल्बीची घातकता आता सर्वांनाच लक्षात येत आहे. लोकप्रतिनिधी आणि पोलिस खात्यासह समाजातील दानशूरांनी आता विना डॉल्बी मिरवणुका काढणाऱ्या मंडळांना मोठी बक्षिसे, पारितोषिकं ठेवून त्यांना प्रोत्साहन देण्याची आज गरज आहे. पारंपारित वाद्यांसह मिरवणुका काढणारी मंडळे आणि समाजिक संदेश देवून समाजभान जपणाऱ्या मंडळांवर बक्षिसांची बरसात करण्याची गरज आहे. सोलापुरातील सर्व महामंडळे आणि मंडळांनी देखील कार्यकर्त्यांचे मतपरिवर्तन करून डॉल्बीमुक्त मिरवुणका अथवा आवाजाबाबत कायद्याची मर्यादा पालनाबाबत पुढाकार घेतला पाहिजे.



**सोलापूर : येथील गुंडला मूर्तिकारांनी घडवलेल्या १५ फूटी गजराजावरील गणरायाची मूर्ती तेलंगना राज्यातील तांडूर येथे उत्सवासाठी निघाली आहे.**

# १२५ किलोपेक्षा जास्त गांजा जप्त

### बार्शी तालुका पोलिसांची कारवाई; दोन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ ऑगस्ट**

बार्शी तालुका पोलीस स्टेशनच्या पथकाने उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांच्या नेतृत्वाखाली लाखो रुपये किमतीचा गांजा जप्त करून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, इतर काही आरोपी फरार झाले आहेत. ही कारवाई बार्शी-आगळगाव बायपास रोडवर राबवण्यात आली.

पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, बार्शी परिसरात आयशर टेम्पो आणि स्विफ्ट कारद्वारे गांजाची तस्करी होत आहे. या माहितीच्या आधारे एपीआय दिलीप ढेरे यांनी आपल्या पथकासह बायपास रोडवरील आगळगाव मार्गावर सापळा रचला. रात्रीच्या सुमारास संशयास्पद आयशर टेम्पो आणि स्विफ्ट कार थांबलेली आढळली. पोलिसांनी तात्काळ दोन्ही वाहनांची तपासणी केली असता, आयशर टेम्पोमध्ये ३० ते ४० बॅग्जमध्ये गांजा आढळून आला. या गांजाची बाजारातील किंमत लाखो रुपयांत आहे. या कारवाई दरम्यान आयशर टेम्पोमधील एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले, तर इतर काही आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले. तसेच, स्विफ्ट कारमधील एका व्यक्तीलाही ताब्यात घेण्यात आले.

जप्त केलेला गांजा आणि ताब्यात घेतलेल्या संशयितांना बार्शी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एपीआय दिलीप ढेरे यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. या कारवाईत बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे आणि त्यांच्या पथकानेही महत्त्वपूर्ण सहकार्य केले. डीवायएसपी अशोक सायकर यांनी सांगितले की, अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध पोलिसांचा कठोर कारवाईचा इशारा आहे. याप्रकरणी फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली असून, लवकरच त्यांना ताब्यात घेतले जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. या कारवाईमुळे बार्शी परिसरातील अंमली पदार्थांच्या तस्करीला मोठा आळा बसण्याची शक्यता आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या या यशस्वी कारवाईचे कौतुक केले असून, अशा कारवाया भविष्यातही सुरू राहाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# माचणूर येथे भिमा नदी वाहतेय धोकादायक पातळीत

**मंगळवेढा दि. २१ ऑगस्ट-**

उजनी व वीर धरणातून अतिरिक्त झालेले पाणी भिमा नदीच्या पात्रात १ लाख ८७ हजार ८५० क्युसेक सोडल्याने माचणूर येथे भिमा नदी धोक्याच्या पातळीत वाहत असून उचेठाण,बठाण, माचणूर,अरळी,वडापूर,सिध्दापूर आदी को.प. बंधारे पाण्याखाली गेले असून तिर्थक्षेत्र सिध्देश्वर मंदिरातील श्री जटाशंकर मंदिरही पाण्याखाली गेल्याचे चित्र आहे. दरम्यान सध्या पुर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांनी पाण्याच्या प्रवाहात जावू नये असे आवाहन भिमा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी श्रीशैल हालकुडे यांनी आवाहन केले आहे.

मागील आठवड्यापासून पुणे परिसर व नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस पडत असल्याने या परिसरातील पाणी उजनी धरणात व भिमा नदीत आल्याने भिमा नदीत १ लाख ८७ हजार ८५० क्युसेक्सने गुरुवारी वाहत असल्याचे पाटबंधारे विभागाचे माचणूर येथील शाखा अभियंता तेजस चव्हाण यांनी सांगितले. उचेठाण - आंबेचिंचोली या दोन गावांना जोडणारा को.प.बंधारा येथे असून को.प.बंधारा पाण्याखाली जावूनही धोकादायक स्थितीमध्ये नागरिकांची मोटर सायकलवरुन ये जा सुरुच होती. शासनाचा कुठलाही जबाबदार अधिकारी येथे उपस्थित नसल्यामुळे सदरची वाहतूक सुरु असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले. या धोकादायक स्थितीत वाहने ये जा करत असल्याचा व्हिडीओ अनेकांनी सोशल मिडीयावर प्रसारीत करुन वस्तूस्थिती दाखवून दिली. यंदा दोन वेळा भिमा नदी पुर सदृश्य परिस्थितीत वाहिली. मे च्या शेवटच्या आठवड्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्यामुळे भिमा नदी धोक्याच्या पातळीत वाहत होती. बेगमपूरचा आठवडी बाजारा आज असल्याने भिमा नदीवरील पुलावर बाजारकरुंनी थांबून नदीला आलेला महापूर पाहून डोळ्याचे पारणे फेडले. मध्यंतरी आलेल्या पाण्यामुळे वडापूर -सिध्दापूर को.प. बंधार्याचा भरावा वाहून गेला होता. नागरिकांच्या मागणीनंतर हा भरावा पुन्हा टाकण्यात आला. मात्र सध्या आलेल्या पाण्यामुळे पुन्हा वाहून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# मुलांचे हक्क जपण्यापासून ते सर्व स्तरापर्यंत विधी सेवा प्राधिकरण काम पाहते : ॲड. राऊत



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२१ ऑगस्ट-**

बालविवाह रोखण्यासाठी आणि बालविवाहाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी जागरूकता, कायदेशीर मदत आणि समुपदेशन सेवा पुरवण्यावर सर्वाधिक भर व बालविवाह रोखण्यासाठी आणि मुलांचे हक्क जपण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण विविध स्तरांवर काम करित असल्यांचे प्रतिपादन सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मुख्य लोकअभिरक्षक ॲड. स्नेहल राऊत यांनी केले. विधी सेवा प्राधिकरण जिल्हा सोलापूर येथे पात्र विधी स्वयंसेवकांना जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा व विधी सेवा प्राधिकरणाचे सोलापूर जिल्हा सचिव तथा न्यायाधीश मल्हार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ओळखपत्र वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी ॲड. राऊत बोलत होते. याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक शमशोद्दीन नदाफ, ॲड. एम. बी. सोलनकर, ॲड. झुरळे, ॲड. रेवण पाटील, ॲड. गुरुराज नवले, वरीष्ठ लिपिक विजय माळवदकर, रेश्मा शेख, नम्रता लेली, विमला गुळेद, हुसेनबी खैरादी, शाहना शेख , रामलिंग महामुनी, नंदकुमार देशपांडे, सुनिल यरगटीकर, राजन घाडगे आदिसह विधी स्वयंसेवक उपस्थित होते.

# द्राक्ष व बेदाणा निर्यातीच्या अडचणी सोडवाव्या

### द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

द्राक्ष आणि बेदाणा निर्यातीसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विविध अडचणी येत असून, यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वरिष्ठ पातळीवर आमच्या भावना कळवून या अडचणी सोडविण्यासाठी मदत करावी, अशी मागणी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने सोलापूर सीडस् पेस्टीसाईडस् ॲन्ड फर्टिलायझर्स डिलर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.



सोलापूर जिल्ह्याला द्राक्ष पंढरी म्हणून ओळखले जाते. सोलापूर जिल्ह्यातील मधील द्राक्ष बागेखालील क्षेत्र हे जवळपास ९० हजार एकर सरासरी द्राक्ष उत्पादन दहा लाख मे. टन आहे. जिल्ह्यामधील द्राक्ष ही मार्केटिंग एक्सपोर्ट तसेच बेदाणा निर्मिती या तिन्ही साठी उत्पादित केली जातात. २०२४-२५ मध्ये एकूण द्राक्ष उत्पादनापैकी ९३४५ मॅट्रिक टन निर्यात झाली आहे व १.२० मॅट्रिक टन बेदाणा निर्मिती केली आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये मार्केटिंग करता सोनाका, सुपर सोनाका, एसएससी, माणिक चमन, नानासाहेब पर्पल, सरिता किंगबेरी लांब व आकाराने मोठे असणारे द्राक्ष उत्पादित केली जातात व एक्सपोर्ट करिता थॉमसन, सीडलेस, अनुष्का तसेच गणेश फिल्म शेडलेस गोल मनी आकार असणाऱ्या द्राक्ष जाती तसेच बेदानासाठी थॉमसन, सीडलेस, माणिक चमन, साधी सोनाका, सुपर सोनाका, शरद सिडलेस व कलर द्राक्ष जातीमध्ये उत्पादन घेतले जाते. जिल्ह्यात बेदाण्यास जीआय मानांकन मिळाले आहे. आपला जिल्हा डोमेस्टिक मार्केट व आंतरराष्ट्रीय मार्केट लागणारे सर्व प्रकारच्या द्राक्ष जाती उत्पादित करीत आहे. द्राक्षामध्ये नवनवीन संशोधन व प्रयोगशील शेतकरी आपले कसोटी पणाला लावत आहेत. हे सर्व करीत असताना परकीयांचे आक्रमण जसे होते तसे या व्यवसायामध्ये परकीय बेदाणा आता भारतामध्ये येऊ घातला आहे. त्या उत्पादनात आम्हास येणाऱ्या अडचणी आपण आमच्या सोडवाव्यात ही आमची अपेक्षा.

द्राक्ष निर्याती करता रेसिडेंऊ टेस्टिंग केले जाते त्याचा खर्च केंद्र शासनाने करावा व टेस्टिंग रिपोर्टची प्रत शेतकऱ्यास मिळावी, द्राक्ष व बेदाणा निर्मितीपासून परकीय चलन मिळत असल्याने सोलापूर जिल्ह्यात आयसीडी व्हावा जेणेकरून निर्यात चालना मिळेल, निर्यात करणाऱ्या कंपन्यांना पॅकिंग मटेरियलसाठीचे पूर्वीचे अनुदान दिले जाते होते ते परत सुरु करावे, अपेडासारखी संस्थांनी त्यांच्या पोर्टलवर लाईव्ह कंटेनर अपडेट उपलब्ध करून द्यावेत. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याकडून द्राक्ष शेतीमाल घेऊन जे द्राक्ष व्यापारी निर्यातदार पैसे अडवतात त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने मोखासारखे कडक कायदे यासह इतर मागण्या काही मागण्या करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर सोलापूर सीडस् पेस्टीसाईडस् ॲन्ड फर्टिलायझर्स डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष गुंडोप्पा पंचे, उपाध्यक्ष दयानंद झुरळे, खजिनदार संजय कट्टे, सचिव बालाजी चागुले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डीजेमुक्त उत्सव साजरा करण्याची हमी






### गणेशोत्सवानिमित्त शांतता कमिटीच्या बैठकीतील निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

शहरात डॉल्बी मुक्त उत्सव, जयंती साजऱ्या झाल्या पाहीजे यासाठी चळवळ उभी राहिली आहे. तरी येणाऱ्या गणेशोत्सव मिरवणुकीमध्ये डीजे, लेझर शोवर बंदी घातली पाहीजे, ध्वनी प्रदुषण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा, अशी मागणी ज्येष्ठांनी केली. त्यावर एकमत होवून सर्व मध्यवर्तीच्या पदाधिकाऱ्यांनी डीजेमुक्त उत्सव साजरा करण्याची हमी दिली. मात्र पोलिस आयुक्त एम. राजकुमार व जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी डीजे पुरता बंद करण्यासाठी विचार विनिमय करून निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

शहरात २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरच्या दरम्यान गणेशोत्सव साजरा होणार आहे. तरी पोलिस आयुक्तालयात गुरुवारी गणेशोत्सव च्या अनुषंगाने शांतता कमिटी सदस्य, गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्याची बैठक पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत डीजे बंदी झाली पाहीजे यासाठी ज्येष्ठ नागरिक संघटनांचे सदस्यही सहभागी झाले होते. या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचीही प्रमुख उपस्थिती होती. बैठकीचे प्रास्ताविक उपायुक्त अश्विनी पाटील यांनी केले. बैठकीत मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते अडीअडचणी प्रशासनासमोर मांडल्या. या बैठकीत ॲड. धनंजय माने, सुनिल रसाळे, हेमा चिंचोळकर, ॲड. यु.एन. बेरीया, माजी महापौर आरिफ शेख आदी उपस्थित होते. बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम राजकुमार, सोलापूर महानगर पालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे ,वाहतूक शाखा विभागाचे पोलिस उपायुक्त हसन गौहर, धर्मादाय आयुक्त, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त राजन माने,सोलापूर महानगर पालिकेचे अधिकारी सारिका आकुलवार

सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिरडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त पोमण,सर्व सातही पोलिस ठाण्याचे अधिकारी - कर्मचारी , महावितरण विभागाचे कर्मचारी माजी उपमहापौर पद्माकर नाना काळे, दास शेळके श्रीकांत घाडगे, सुनील रसाळे, अमोल बापू शिंदे, दत्ता भोसले,लताताई फुटाणे, हेमा चिंचोळकर, अनिता पवार, वैभव गंगणे, सुभाष कलशेट्टी, शिवानंद येरटे, प्रवीण जाधव, आरिफ शेख, हेमंत पिंगळे, श्यामराव गांगर्डे, बापू चराटे, लहू गायकवाड अरुण देवकर, भैय्या जगताप, शहरातील मध्यवर्ती महामंडळ चे सल्लागार उत्सव अध्यक्ष प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित.

पोलिस आयुक्त एम राजकुमार म्हणाले, डीजेच्या बाबत सुरुवातीला सर्व उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलून प्रथम दोन बेस दोन टॉपला परवानगी दिली. त्यानंतर एक बेस एक टॉप दिली आहे. त्याची अंमलबजावणी झाली. मात्र, आता डीजे पूर्णता बंदी करण्यासाठी सर्व स्टेक होल्डर यांच्याशी विचार विनिमय करून डीजे मुक्तचा निर्णय घेणार आहे, मात्र जो निर्णय घेवू तोच भविष्यात कायम राहील.

- ❊ शहरात डॉल्बी बंदीवर शिक्कामोर्तब करण्याचा विचार अनेकांनी व्यक्त केला
- ❊ शहरातील धोकादायक इमारती पाडण्यात येणार
- ❊ धर्मादाय आयुक्त विभागाकडे मंडळांनी नाव नोंदणी करावी
- ❊ शहरातील मूलभूत सुविधा उत्सवापूर्वी मार्गी लावणार असल्याचे पालिका कडून जाहीर
- ❊ अंधश्रद्धा निर्मूलन यांना विसर्जन दिवशी मूर्ती संकलनाची परवानगी देऊ नये अशी मागणी करण्यात आली
- ❊ महावितरण विभाग उत्सवासाठी सज्ज कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही
- ❊ पारंपरिक वाद्य व मर्दानी खेळांना परवानगी
- ❊ शहरातील मिरवणुकीच्या मार्गावर पताका लावण्याला बंदी
- ❊ सर्वांनी कायद्याचे पालन करावे. कायदा हातात घेऊन गुन्हे दाखल करून घेऊ नये. वेळेच्या आत मिरवणूक संपविण्यात याव्यात. डॉल्बी बंदी बद्दल सर्व मंडळांचे आभार : पोलिस आयुक्त
- ❊ ५ फुटावरील गणपती विसर्जनसाठी सोलापूर महानगर पालिकेकडून सालाबाद प्रमाणे याही वर्षी क्रेनची विशेष व्यवस्था : अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे
- ❊ उत्सव काळात कोणतीही आक्षेपार्ह पोस्ट टाकू नये : पोलिस प्रशासनाकडून आवाहन

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# रामराज्य आणि राजकारण!

आदर्श समाजव्यवस्था म्हणून ज्या संकल्पनेचा प्रभाव भारतीय जनमानसावर पुराणकाळापासून आहे, त्या रामराज्याच्या संकल्पनेत, पारदर्शक प्रशासन, संवेदनशील शासन आणि कृतिशील यंत्रणा या तीन बाबींचा समावेश होतो. रामायण ही पुराणकथा की वास्तव यावर कितीही वाद असले, तरी रामराज्य ही संकल्पना म्हणजे आपला सांस्कृतिक वारसा आहे, ही बाब अमान्य केली जात नाही. महात्मा गांधींनी ज्यासाठी ब्रिटिशांविरोधातील स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले, त्यामागे त्यांनादेखील स्वातंत्र्यानंतरच्या रामराज्याच्या संकल्पनेतील राज्यव्यवस्थाच अपेक्षित होती. सत्य आणि सद्भावना यांचा प्रभाव असलेली आणि लोकांची, लोकहितासाठी राबणारी व्यवस्था म्हणजे रामराज्य ही त्यांची संकल्पना होती. अर्थात, असे रामराज्य कधी अस्तित्वात येईल का, याविषयी त्यांच्या मनात शंकादेखील होती. स्वातंत्र्याच्या जेमतेम दोन महिने आधी 'हरिजन' या नियतकालिकातील एका लेखात गांधीजींनी व्यक्त केलेली ही शंका कालातीतपणे आजही देशासमोर तेच प्रश्नचिन्ह होऊन उभीच आहे. रामराज्य हे राजकुमार आणि गरीब, सामान्य माणूस या दोघांनाही समान हक्क प्रदान करते, पण सध्याच्या अन्याय्य असमानतेच्या स्थितीत रामराज्य असूच शकत नाही, अशीही त्यांची खंत होती. म्हणूनच स्वातंत्र्याची शतक महोत्सवी वाटचाल करणाऱ्या आजच्या अमृतकाळात पाऊणशे वर्षांपूर्वीच्या गांधीजींच्या कल्पनेतील रामराज्याचा आज कोठे सुगावा लागतो का, हे पाहणे गरजेचे आहे.

भारताच्या लोकशाहीमध्ये विधिमंडळे व संसद हे जनहिताची कामे करवून घेण्याचे हक्काचे सर्वोच्च स्थान असल्याने या सभागृहांकडे जनतेच्या साऱ्या अपेक्षा एकवटलेल्या असतात. ज्यांना आपल्या हिताचे विश्वस्त या जबाबदारीनिशी सभागृहात पाठविलेले असते, त्यांनी या सभागृहांचा वापर संयतपणे, समंजसपणे आणि पूर्णतः जनहिताच्या मुद्द्यांशी निगडित विषयांच्या चर्चेसाठी करावा अशी सामान्यतः अपेक्षा असताना, अशा सभागृहांत अधिवेशनांसारख्या महत्त्वाच्या काळात जे काही पाहावे लागते, ते पाहता, अपेक्षाभंगाच्या भावनेव्यतिरिक्त अन्य काही वाट्यास येण्याची शक्यताच नाही, याची खात्री पटते. संसदेची आणि विधिमंडळाची सभागृहे हा राजकारणाचा आखाडा बनला आहे, अशी सर्वसामान्यांची समजूत होण्यासाठी पोषक असे वातावरणच दिसत असेल, तर या खात्रीला अन्य पुराव्याची गरज नसते. म्हणूनच रामराज्याच्या संकल्पनेस हातभार लावणाऱ्या, पारदर्शक कारभाराच्या आणि संवैधानिक जबाबदाऱ्यांचे भान देणाऱ्या कोणत्याही निर्णयामागे पक्षभेद विसरून ठामपणे उभे राहिल्यास अशा कुरघोडीच्या राजकारणास विराम द्यावा लागेल आणि रामराज्याच्या त्या संकल्पनेची पायाभरणी करण्यात हातभार लावता येईल, अशा जाणिवा जाग्या करण्याचे मोठे आव्हान अजूनही कायम आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दोन दिवसांपूर्वी, २० ऑगस्टला, जे काही सभागृहात घडले, ते पाहून रामराज्याच्या अपेक्षेने लोकप्रतिनिधींकडे पाहणाऱ्यांचा विरसच झाला असेल. राज्यकर्ते केवळ सूडबुद्धीचेच राजकारण करतात आणि विरोधकांना नामोहरम करण्याचा कट रचला जातो, अशा भावनेने ग्रासलेल्या विरोधकांनी बुधवारी संविधानातील काही दुरुस्त्यांबाबत गृहमंत्र्यांनी दाखल केलेल्या व साधकबाधक चर्चेसाठी पारदर्शीपणे खुल्या ठेवलेल्या प्रस्तावादरम्यान सभागृहात सुधारणा प्रस्तावाची कागदपत्रे फाडून फेकाफेक करणे, कागदाचे बोळे करून भिरकावणे आणि चर्चेच्या सभ्य मार्गाने सहभागी न होता केवळ गदारोळ करून कामकाजात सातत्याने व्यत्यय आणणे हा प्रकार बुधवारी देशाने अनुभवला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी लोकसभेत १३० व्या घटनादुरुस्तीसह तीन महत्त्वाचे प्रस्ताव सादर केले. भ्रष्टाचार किंवा गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारी कृत्याच्या आरोपाखाली ३० दिवसांपर्यंत कोठडीत असलेल्या कोणा मुख्यमंत्री किंवा मंत्र्यास आणि पंतप्रधानपदासारख्या पदावरील व्यक्तीसही, ३० दिवसांनंतर पदावरून हटविण्यात यावे, अशा दुरुस्तीच्या या प्रस्तावावर खरे पाहता, योग्य त्या वैधानिक माध्यमातून आणि साधकबाधक दुरुस्त्या सुचवून सभागृहाने जबाबदारीपूर्वक चर्चा घडवावी आणि राजकीय भेदांच्या पलीकडे जाऊन पारदर्शक कारभारास पोषक ठरविणारे पाऊल अधिक ठामपणे कसे पुढे टाकता येईल, याबाबत सहमतीचे राजकारण करावे, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात तसे घडले नाही. या दुरुस्त्यांना विरोधकांनी आक्रमक विरोध केला. सत्ताधारी पक्षास धारेवर धरणे आणि विरोध करणे ही विरोधकांची भूमिकाच असते हे खरेच आहे. पण पारदर्शक आणि जबाबदारीच्या जाणिवांना बळ देणाऱ्या कोणत्याही मुद्द्यावर केवळ विरोध करून असे प्रयत्न हाणून पाडण्याचे राजकारण मात्र अनाकलनीय ठरते. मुख्यमंत्री किंवा मंत्रिपदावरील कोणाही व्यक्तीस भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगवास भोगावा लागत असेल, तर रामराज्याच्या संकल्पनेस अपेक्षित असलेल्या पारदर्शकपणाला तडा जातो, हे स्पष्ट आहे. अशा व्यक्तीने आपल्या पदाचा वापर करून तुरुंगातूनही सत्तास्थान बळकावून बसणे हे कायदेशीरदृष्ट्या कदाचित अयोग्य नसेलही; पण रामराज्याची संकल्पना केवळ कायद्याच्या बडग्याने राबविता येत नाही. त्यासाठी नैतिकतेचे पाठबळही लागते. म्हणूनच अमित शाह यांनी दाखल केलेल्या प्रस्तावास आक्रस्ताळेपणाने विरोध करणे योग्य ठरत नाही. हे खरे आहे की, या विधेयकात नमूद केलेल्या कालावधीत या देशातील कोणत्याही व्यवस्थेकडून न्याय मिळणे सहसा सामान्य माणसासही शक्य नसते. देशाच्या सर्वोच्च न्यायालयापासून न्यायव्यवस्थेच्या अखेरच्या स्तरावरील न्यायालयापर्यंत सर्वत्र कोट्यवधी खटले वर्षानुवर्षांपासून प्रलंबित आहेत आणि ज्या वैधानिक पदांवरील व्यक्तींच्या विरोधात न्यायालयात दाखल होणाऱ्या खटल्यांशी संबंधित न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यात अशा यंत्रणांकडूनही दिरंगाईही होत असते. या देशात कोणत्याही कृत्याबाबत केवळ शिक्षा देणे एवढाच न्यायव्यवस्थेचा हेतू नसतो. त्यामुळेच दंड संहितेचे रूप बदलून न्यायसंहिता असा नवा चेहरा न्यायव्यवस्थेस दिला गेला. जोवर एखादी व्यक्ती गुन्हेगार असल्याचे अंतिमतः सिद्ध होत नाही, तोवर त्या व्यक्तीस गुन्हेगार मानले जात नाही. त्यामुळे केवळ ३० दिवस तुरुंगात राहिल्याने त्याचे पद रद्द होण्याची तरतूद असलेल्या या दुरुस्तीवर या अनुषंगाने साधकबाधक चर्चा होऊ शकते. संसदेमध्ये किंवा विधिमंडळांमध्ये अशा चर्चा घडविण्याची वैधानिक आयुधे उपलब्ध असतात आणि त्यांचा योग्य मार्गाने वापर करण्याचा संपूर्ण हक्क लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात दाखल होणाऱ्या व्यक्तीस असतो. त्यामुळे मुदत संपताच भ्रष्टाचार किंवा गंभीर गुन्हेगारी स्वरूपाच्या कारवायांचा आरोप असलेल्या व्यक्तीच्या कोठडीचा ३० दिवसांचा काळ संपताच त्याचे पद रद्द करण्याच्या या प्रस्तावाबाबत खुलेपणाने चर्चा होणे अपेक्षित आहे. केंद्र सरकारने याबाबत सकारात्मकता दाखविली आहे, त्यामुळेच हा प्रस्ताव आता संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आला आहे. या समितीकडून त्याची छाननी होईल आणि त्यानंतर पुन्हा त्यावर वैधानिक मार्गाने चर्चा होऊनच त्याचे भवितव्य ठरेल हे स्पष्ट असताना, अशा प्रकारे केवळ गदारोळ करणे, कागदपत्रे फाडणे, कागदाच्या बोळ्यांची फेकाफेक करणे अशा अशोभनीय कृतीमधून जनतेच्या अपेक्षाभंगाचे धनी होण्याचा ठपका माथ्यावर मारून घेण्यापेक्षा, विधायक आणि पारदर्शक राज्यव्यवस्थेच्या प्रयत्नांत सहभागी होणे केव्हाही चांगलेच ठरते.

गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत हे प्रस्ताव दाखल करताना, स्वातंत्र्यानंतरच्या आणि तेव्हापासून अगदी अलिकडच्या काळातील पदाच्या गैरवापराचे दाखले दिले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणिबाणीच्या कालखंडात केलेल्या ३९ व्या घटनादुरुस्तीमुळे या पदावरील व्यक्ती कायदेशीर कारवाईपासून मुक्त राहील, अशी तरतूद केली गेली. घोटाळ्याच्या आरोपावरून तुरुंगात असतानाही दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पदावरील पकड कायम ठेवून तुरुंगातून मुख्यमंत्रिपदाचा कारभार राबवत सरकार चालविले. ठाकरे सरकारमधील एक मंत्री अशाच काही गंभीर स्वरूपाच्या आरोपावरून तुरुंगात असतानाही, त्यांच्या खात्याबाबत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांच्या प्रसिद्धीसोबत त्यांची छायाचित्रे झळकत होती. कोणत्याही व्यवस्थेच्या किंवा यंत्रणेच्या ढिलाईमुळे दीर्घकाळ कोठडीची हवा खावी लागलेल्यास पदमुक्त व्हावे लागणार असेल, तर दंड संहितेचे नामांतर करून त्यास न्यायसंहिता असा मुखवटा चढविल्याने रामराज्याची संकल्पना साकारणार नाही.

## प्रासंगिक

**श्रीराम मोतीराम पुंडे**

# लोककल्याणकारी माता

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी १३ ऑगस्ट या इंग्रजी तारखेप्रमाणे व श्रावण वद्य चतुर्दशी या मराठी तिथीप्रमाणे दरवर्षी साजरी होत असते अहिल्यानगर जिल्ह्यातील चौढी या लहानशा गावी त्यांचा जन्म झाला. वडील माणकोजी शिंदे व आई सुशीला बाई शिंदे हे भाग्यवान दाम्पत्य. सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव व अहिल्यादेवींचा विवाह पुण्यातील शनिवार वाड्यामध्ये स्वतः पेशव्यांनी लावून दिला. त्यानंतर त्या सासरी इंदोर येथे गेल्या. सुसंस्कारित अहिल्यादेवींनी सर्वांना आपलेसे करून घेतले. संधी मिळताच त्याचे सोने कसे करावे हे त्यांनी आत्मसात केले होते. त्याचप्रमाणे त्यांनी सर्वांची मने सुद्धा जिंकली होती. इंग्रजी तत्त्ववेत्ता सर जॉन माल्कम यांनी असे म्हटले आहे की, अहिल्यादेवींचे चरित्र हे अलौकिक आहे. ती स्त्री असून तिच्यात मुळीच अहंमन्यता नव्हती. तिला धर्माचे विलक्षण वेड होते. पण असे असूनही तिच्या ठायी परधर्म सहिष्णुता तितकीच होती. त्यांचे धार्मिक कार्य हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पान आहे. भारत माता ही आपली सर्वांची आई असून तिची योग्य ती सेवा आपापल्या परीने सर्वांनीच करावी हा उदात्त विचार त्याकाळी त्यांच्या मनामध्ये आला व तो त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा प्रयत्न करून भारताचा भूभाग जुळवून देशाची एकात्मता साधण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आपल्या देशामध्ये त्याकाळी ४८० च्या वर संस्थाने होती. प्रत्येक जण आपापल्या संस्थांमध्ये गुंग होता. देशाच्या एकात्मतेचा विचार करणाऱ्या फक्त अहिल्यादेवी या एकमेव होत्या. त्या कट्टर हिंदुत्ववादी होत्या. परकीयांनी आक्रमणे करून देशातील मंदिरे उद्ध्वस्त केली होती. अहिल्यादेवींनी संपूर्ण देशातील मंदिरांचा जीर्णोद्धार केलाच त्याचबरोबर बौद्ध विहारे आणि मशिदी सुद्धा बांधून दिल्या. त्यामुळे त्यांच्याबद्दल देशवासीयांच्या मनामध्ये एक नवीन विश्वास निर्माण झाला होता. आसेतुहिमाचल पसरलेला हा देश माझा आहे ही भावना जागृत करण्याचे काम अहिल्यादेवींनी केले. आमच्या चालीरीती, भाषा, वेष जरी भिन्न असले तरी या भारतभूमीची आम्ही सर्व लेकरे आहोत ही भावना त्यांनी त्याकाळी लोकांमध्ये जागृत केली. त्यांनी आपल्या कार्याच्या बळावर संपूर्ण देश जोडण्याचा प्रयत्न केला. त्यातही त्या यशस्वी देखील झाल्या. चारही धाम त्यांनी रस्त्याने जोडले. रस्त्याच्या बाजूला झाडे लावली. पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले.



पाय विहिरी देखील तयार केल्या. अनेक नद्यांवर घाट बांधून लोकांची योग्य ती सोय केली. अन्नक्षेत्रे उघडली. प्रजेला योग्य तो न्याय दिला. परिणामतः जनताही त्यांच्यावर खुश होती.

आज आपल्या देशात रस्त्याचे महत्त्व समजले आहे. मात्र त्याकाळी अहिल्यादेवींनी राज्याच्या प्रगतीकरिता व समृद्धीकरिता रस्त्याचे महत्त्व ओळखले होते. रस्ते म्हणजे राज्याच्या रक्तवाहिन्याच. रस्ते वाहत राहतील तरच राज्याची प्रगती होईल असे त्यांना वाटत असे. त्यांनी आपल्या राज्यातील रस्ते तर बांधलेच परंतु राज्याबाहेरील अनेक रस्ते व पूल बांधले. कलकत्ता ते काशी हा रस्ता त्यांनी बांधल्याचा पुरावा आजही उपलब्ध आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावून, विहिरी खोदून त्यांनी लोकांची सोय केली होती. अहिल्यादेवींची परराष्ट्र नीती सुद्धा वाखाणण्याजोगी होती. शेजारी राज्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्याचा आततायीपणा त्यांनी कधीच केला नाही. त्याकाळी अनेक राजांना आपण अहिल्यादेवींचे मित्र आहोत याचा सार्थ अभिमान वाटत असे. त्या काळातील परिस्थितीचा विचार करता तत्कालीन राज्यकर्ते हे आपल्या प्रजेकडून पैसा वसूल करत असत आणि थोडासा पैसा लोककल्याणाकरिता खर्च करून जास्त पैसा वैयक्तिक विकासाकरिता खर्च करीत असत. अहिल्यादेवींना स्वतःचे खाजगी उत्पन्न होते. त्यांनी त्यातून स्वतःसाठी, चैनीसाठी खर्च केला असता तरी त्यांना कोणी नावे ठेवली नसती. परंतु त्यांनी तसे न करता आपले संपूर्ण खाजगी जहागिरीचे उत्पन्न लोककल्याणासाठी खर्च केले. त्याकाळच्या राज्यकर्त्यांच्या तुलनेत त्या अतिशय साधे जीवन जगत होत्या.

ही भारत भूमी एक असून आमची संस्कृती ही एकच आहे आणि येथील धार्मिक सत्ता ही सार्वभौम आहे ही भावना त्यांनी लोकांमध्ये जागविली म्हणूनच पुण्यश्लोक अहिल्यादेवींना नमन करणे म्हणजे भारतीय संस्कृतीला नमन करणे होय. प्रबळ इच्छाशक्ती, बुद्धिमत्ता, चातुर्य, दूरदृष्टी, पराक्रम, अफाट कर्तृत्व, त्याग, चरित्र, धार्मिक निष्ठा आदी अलौकिक गुण अहिल्यादेवींच्या अंगी होते म्हणूनच पंडित मोरोपंत म्हणतात- देवी अहिल्या झालीस तू जगत्रयात धन्या। न न्याय धर्मनिरता अन्या कली माजी एकली कन्या । हे देवी, तू या तिन्ही लोकांमध्ये धन्य आहेस, न्याय आणि धर्माचे पालन करणारी तू कलियुगामध्ये एकटीच आहे. तुला या जगामध्ये तोड नाही. दौलत सांभाळण्यासाठी प्रसंगी कुणापुढेही लाचार व्हावे, गोरगरिबांची लुटालूट करावी व ती संपत्ती स्वतःच्या भूगोलाकरिता वापरावी यातच रममान असलेल्या तत्कालीन राजकारण्याच्या काळ्याकुट्ट रात्रीमध्ये देवघरातील समईच्या ज्योतीप्रमाणे सतत तेवत राहून अहिल्यादेवींचे जीवन मनाला मोठा सात्त्विक आधार देणारे व धर्म प्रेरणा उजाळून टाकणारे असेच आहे. ''परोपकाराय फलनीवृक्ष परोपकारायच वहन्नती नद्या '' या उक्तीप्रमाणे त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसेवेकरता समर्पित केले होते. हरिभक्त परायण धुंडा महाराज देगलूरकर यांनी असे म्हटले आहे की, भारताच्या या पुण्यभूमीवर अनेक थोर व्यक्ती, महात्मे अवतरले पण या भूमीचे पुण्य कुणामुळे टिकून राहिले असेल तर ते फक्त आणि फक्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यामुळेच. आज त्या माउलींची २३० वी पुण्यतिथी. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

८२७५०६३६९८

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# पहलगाम, सिंदूर आणि क्रिकेट

येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या क्रिकेट मालिकेत भारत आणि पाकिस्तान संघांदरम्यान १४ सप्टेंबरला सामना खेळला जाणार आहे. सोबतच दोन्ही संघादरम्यान आणखी दोन सामने खेळले जाण्याचीही शक्यता आहे. क्रिकेट ही राष्ट्रभावना समजल्या जाणाऱ्या आपल्या देशात, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने हा सामना खेळण्यास नकार द्यावा, असा मतप्रवाह आहे. मात्र, 'पैसा बोलता है' या न्यायाने बीसीसीआयने या सामन्याला नकार देता येणार नाही, असं उत्तर दिलं आहे.

याच पाकिस्तानच्या हॉकी संघाने, भारत सुरक्षित नसल्याचे कारण सांगून आशिया चषक खेळण्यास नकार दिला होता, हे आपल्या गजनी स्मरणशक्तीला कोण सांगणार? सी-व्होटरच्या ताज्या सर्वेक्षणानुसार, ५१ टक्के भारतीयांनी भारत-पाकिस्तान सामना खेळण्यास विरोध केला आहे तर ४५ टक्के नागरिकांच्या मते, हा सामना खेळला जायला हवा. दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या पाकिस्तानसोबत क्रिकेटचे संबंध ठेवणे हा आपल्या जवानांच्या बलिदानाचा अपमान आहे, असं मानणाऱ्या भारतीयांची संख्या ७५ टक्के आहे.




१९८४ मध्ये सुरू झालेल्या आशिया चषकाच्या दुसऱ्याच सिझनमध्ये श्रीलंकेकडे यजमानपद असताना, भारतीय संघानं खेळण्यास नकार दिला. १९९०-९१ मध्ये राजकीय संबंध बिघडल्याचे कारण सांगून पाकिस्तानने भारतात येऊन खेळण्यास नकार दिला. हरभजन सिंग, शिखर धवन, युवराज सिंग, सुरेश रैना, इरफान पठाण आणि युसूफ पठाण यांच्यासारख्या क्रिकेटपटूंनी देश सबसे पहले अशी भूमिका सोशल मीडियावर स्पष्ट केली आहे. एकीकडे भारतीय क्रिकेटपटू ठाम मत मांडत असताना, पाकिस्तानी क्रिकेटपटूंनी मात्र पुन्हा विकृत मानसिकतेचं प्रदर्शन मांडलं. तसे तर पाकिस्तानी इनफ्लुएन्सर्सचे इन्स्टाग्राम खाते भारतात बंद आहेत. पण, पाकचा क्रिकेटपटू राणा फहीम अश्रफ याची चिथावणीखोर पोस्ट व्हायरल झाली आहे. त्यात पाकिस्तानी आर्मीच्या गणवेशातील व्यक्ती तिरंग्याची साडी नेसलेल्या स्त्रीचा हात पकडून, तिच्या भांगात सिंदूर भरतो आहे. मागे एक बॅनर लागले असून त्यावर 'न्यू चॅप्टर बिगिन्स' असे लिहिले आहे. पाकिस्तानला कोणते नवीन चॅप्टर सुरू करायचे आहे? ऑनलाईन पोस्टच्या या लढाईत पाकिस्तानने नेहमीप्रमाणे पातळी सोडली आहे. हा अश्रफ आशिया चषकात खेळणार आहे.

भक्कम रेव्हेन्यूचा चष्मा लावलेल्या बीसीसीआयने राष्ट्रसन्मान कधीचाच विकला आहे. नागरिकांचा विरोध सहन करू, दुबईचा न्युट्रल व्हेन्यू निवडू आणि पाकड्यांचे भारतमातेवरील घाणेरडे कॉमेंट्सही सहन करू; पण पैसा कमविण्याची संधी सोडणार नाही, अशी लोभी भूमिका घेतलेली बीसीसीआय हा सामना खेळविण्यासाठीच उतावीळ आहे. एकीकडे ऑपरेशन सिंदूर अजून सुरू आहे. त्यावरून राजकारणही रंगलेलं आहे. पहलगाम हत्याकांडातून दुर्दैवी कुटुंबं सावरलेली नाहीत, सिंधूचं पाणी थांबलेलं आहे आणि दुसरीकडे भारतीयांच्या गळ्यातील ताईत असलेला भारतीय संघ दहशतवादी देशासोबत सामना खेळण्यास धडपडतो आहे. पाकिस्तानवर भारतीय परराष्ट्र धोरणामुळे निर्माण झालेला दबाव आणखी वाढविण्याची हीच संधी होती.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ जगातील सर्वाधिक शक्तिशाली आणि आर्थिकदृष्ट्या प्रभावी क्रिकेट मंडळ आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डही त्यांच्या अर्थव्यवस्थेप्रमाणेच दिवाळखोर आहे. अशात भारत-पाकिस्तानचा सामना होणं म्हणजे पाकिस्तानला आर्थिक उभारी मिळण्यासारखं आहे. जगभरात एक अब्ज लोक हा सामना बघतील, असा अंदाज आहे. त्यातून प्रसारक, प्रायोजक आणि क्रिकेट मंडळांना सामान्यांच्या कल्पनेपलीकडे फायदा होतो. ही एक मॅच न खेळून होणारं नुकसान, बीसीसीआय आणि करोडपती खेळाडू सहज उचलू शकतात. आपल्या नियम, अटी, शर्ती लावून अनेक वेळा बीसीसीआयने टूर्नामेंट्समध्ये भाग घेतला आहे. आता राष्ट्राचे धोरण आणि समाजाची धारणा लक्षात ठेवून निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

९८५०३३९२४०

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# शरद पवार किती खरं बोलतात?

'काँग्रेसला सावरायचे असेल तर शरदलाच मुख्यमंत्री करायला पाहिजे' असे कोण बोललं असेल? कल्पना करा. लक्षात येत नाही ना. येणारच नाही. कसा येईल? ज्येष्ठ नेते शरद पवारांचा तसा रेकॉर्डच नाही. मात्र, पवारांनी तसा रेकॉर्ड काढला आहे. पुण्यातल्या एका कार्यक्रमात पवारांनी तसा दावा केला. 'काँग्रेसला सावरायचे तर शरदलाच मुख्यमंत्री करायला पाहिजे' असे दुसरे तिसरे कोणी नाही तर खुद्द वसंतदादा पाटील म्हणाल्याचा संदर्भ पवारांनी दिला तेव्हा श्रोते हादरले असणार. 'ज्याचं सरकार मी पाडलं त्या वसंतदादांनी १० वर्षांनंतर काँग्रेसच्या बैठकीत माझं नाव मुख्यमंत्रिपदासाठी सुचवले' असे सांगत पवारांनी दादांची महानता सांगितली. शरद पवार खोटं बोलतात असं मी म्हणणार नाही; पण पवार किती खरं बोलतात? हा प्रश्न वेळोवेळी उठत आला आहे. पवार जे बोलतात त्याच्या उलट करतात, ही पवारांची ख्याती त्यांचे कार्यकर्तेही सांगतील. ते ठीक आहे. इथे मुद्दा वसंतदादांचा आहे. दादा असं बोलले असतील? कारण 'त्याने खंजीर खुपसला' हे शब्द दादांचे आहेत. खंजिराच्या जखमा दादा त्या १० वर्षांत विसरले असतील? ज्या काळाचा संदर्भ पवार देतात त्या काळात दादांच्या हातात काहीही उरले नव्हते. मग पवार असं का बोलले असावे? बोलले, तर पवारांनी काँग्रेसला किती सावरलं? पवार नेहमीच सत्तेच्या सोबत राहत आले. आपली ही दुखरी नस लपवण्यासाठी त्यांनी लोकांपुढे सतत स्वतःला संभ्रमावस्थेत ठेवले. काहीतरी मोघम बोलायचे आणि त्याचा अर्थ शोधताना कार्यकर्त्यांची होणारी पळापळ एन्जॉय करायची, हा पवारांचा खाक्या राहिला आहे. मीडियातले त्यांचे भक्त याला 'पवारांची गुगली' संबोधतात. मग वसंतदादांबद्दलचे त्यांचे वक्तव्य हेदेखील गुगली समजायचे? पवार काँग्रेसला सावरायच्या भानगडीत कधीही पडले नाहीत, असेच इतिहास सांगतो. सत्तेच्या शिड्या चढण्यासाठी त्यांनी वेळप्रसंगी काँग्रेसला वापरून घेतले. चढायचे नाही तेव्हा फेकून दिले. आजच्या राजकारणाबद्दल खूप वाईट बोलले जाते. 'आताचे राजकारण खूप गढूळ झाले आहे. राजकारणाचा पोत बिघडला आहे' असे खूप काही बोलले जाते. त्याची सुरुवात पवारांनी केली का? वसंतदादा यांच्याविरोधात बंड करून पवार राज्याचे सर्वात तरुण मुख्यमंत्री झाले. 'खंजीर' हा शब्द पवारांमुळे राजकारणात चर्चेत आला. राजकारणात सत्ता हवी असेल तर सोबत खंजीर बाळगावा लागतो आणि संधी मिळताच तो खुपसावाही लागतो, हे शरद पवारांनी दाखवून दिले. पुढे त्यांनी ही दीक्षा उद्धव ठाकरे यांनाही दिली. मुख्यमंत्री होण्यासाठी भाजपा-शिवसेना युती मोडून ठाकरे शरद पवारांच्या मांडीवर जाऊन बसले. नियती मोठी क्रूर असते. या जन्माचा हिशोब याच जन्मात चुकता करावा लागतो. पुतण्याने



काकाचे आमदारच नव्हे तर पक्षच पळवून हिशोब चुकता केला.

राक्षसाची ताकद त्याच्या बेंबीत असते असे म्हणतात. पवारांची ताकद कशात होती, की त्यांनी तब्बल ५० वर्षे महाराष्ट्राला आपल्या गुगलीवर खेळवले, झुलवले? मुळात ताकद होती कुठे? सत्तेच्या सोबतीत राहून पवारांनी पत्ते पिसले. १९८५ च्या निवडणुकीत पवार काँग्रेससोबत नव्हते. त्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला १८५ जागा मिळाल्या होत्या. त्या नंतरच्या सलग पाच निवडणुकीत कधीही काँग्रेसला एवढी श्रीमंती अनुभवता आली नाही. या काळात पवार काँग्रेससोबत होते किंवा काँग्रेसमध्ये तरी होते. इंदिराविरोधी राजकारण पवार खेळले. कसेही करून सत्तेत राहायचे हा पवारांचा मूलमंत्र राहिला. कधी राजीव गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसमध्ये प्रवेश घेऊन त्यांनी मुख्यमंत्रिपद मिळविले तर १९९९ मध्ये सोनिया गांधी विदेशी आहेत, असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस नावाचा स्वतःचा पक्ष काढला. नंतर सोनियासोबत जाऊन केंद्रात तब्बल १० वर्षे मंत्रिपद मिळवलं. १९९९ मध्ये पवारांनी स्वतःचा राष्ट्रवादी पक्ष काढला तेव्हा बंगालच्या ममता बॅनर्जी राजकारणात आल्या नव्हत्या किंवा चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम पक्षही स्थापन झाला नव्हता, शिवसेनाही मुंबईपुरती होती. आज ममता कुठे आहेत आणि पवार कुठे आहेत? तुम्हीच तपासून पहा. ममता किंवा जगन मोहन रेड्डी यांनी जितका मुरब्बीपणा दाखवला, तितकेच पवार उतावळे राहिले. त्यांनी कधी सत्तेशी संघर्ष केला नाही. 'जुगाड टेक्नॉलॉजी'च चालवली. जिल्ह्यातले कारखानदार, धनाढ्य माणसांची मोळी म्हणजे पवारांचा पक्ष. आमदार कसे खेचता येतील, यातच पवारांनी धन्यता मानली. नुसत्या कोलांटउड्या मारण्यात या तथाकथित 'जाणत्या राजा'ने ५० वर्षे वाया घालवली. आज त्यांच्या पावसात भिजण्याचं ज्यांना कौतुक वाटते त्यांच्या बुद्धीची कीव कराविशी वाटते. पवार वसंतदादांचे झाले नाहीत तसे राजीव गांधी यांचेसुद्धा झाले नाहीत. सदा उंटाच्या चालीसारखे तिरकस चालले. इंदिराजींच्या मृत्यूनंतर राजीव गांधींना प्रचंड प्रतिसाद मिळालेला पाहून पवारांनी १९८७ मध्ये औरंगाबादेत आपला पक्षच काँग्रेसमध्ये विलीन केला. मात्र, राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनिया गांधी आपल्याला पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून घोषित करतील, अशा भ्रमात पवार होते. तसे झाले नाही तेव्हा पवारांनी सोनिया गांधींच्या विरोधात वेगळी काँग्रेस काढली. पण पुढे केंद्रीय मंत्रिमंडळात घुसले. पवार सत्तेशिवाय राहूच शकत नाहीत. देशाचे कृषिमंत्री तब्बल १० वर्षे होते. मंत्री म्हणून काय दिवे लावले? आज दररोज सात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात, असे सांगितले जाते. कुठलीही विशेष कर्तबगारी नसताना पवार महिमामंडन सुरू आहे का?

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त १० जागा मिळाल्या. १९८५ मध्ये पवारांनी लढवलेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाला ५२ जागा मिळाल्या होत्या. पाच वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ मध्ये पवारांनी काँग्रेससोबत हातमिळवणी करून निवडणुका लढवल्या तेव्हा त्यांना मिळालेल्या जागा होत्या ५४. आणि आज २०२५ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पवारांच्या राष्ट्रवादीला मिळालेल्या जागा आहेत फक्त आणि फक्त आठ आणि विधानसभेत त्यांनी जिंकलेल्या जागा आहेत अवघ्या १०. त्यामुळे पवारांची ताकद आज विचाराल तर ती फक्त १० आमदार निवडून आणण्याइतकी आहे. अशा हवेतही पवार तलवारबाजी करत आहेत. त्यांना हवे आहे तरी काय? राजकारणात रिटायरमेंटचे वय नसते. पण वयाच्या ८० व्या वर्षीही पवार थांबायला तयार नव्हते तेव्हा पुतण्याने पक्ष पळवला. पवारांनी कोणावर कधी विश्वास दाखवला नाही. पुतण्यावरही दाखवला नाही. त्यातूनच अजित पवार यांनी भाजपाशी जवळीक साधली आणि सध्या राज्याचे अर्थमंत्री म्हणून मजेत आहेत. मात्र आपल्या मुलीचे म्हणजे सुप्रियाचे करीअर आपण सेट करून देऊ शकलो नाही, याचे दुःख बाप या नात्याने पवारांना कुरतडत असणार. बाप आहे म्हणून सुप्रिया बारामतीतून गेल्या चार निवडणुका निवडून येत आहेत. पण पुढे? कारण सुप्रियाचं नेतृत्व अनेकांना भावालाच मान्य नव्हते म्हणूनच राष्ट्रवादी फुटली. पवारांना ही चिंता छळत असणार. 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेत पंतप्रधान मोदींनी जगभर पाठविलेल्या प्रतिनिधिमंडळांमध्ये सुप्रिया सुळेही गेल्या होत्या. पवारसाहेब, जागे व्हा. पुतण्या हातातून गेला. आता उद्या मुलगीही विचार करू शकते. तिलाही तिचे करीअर आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### संसदेत सादर विधेयक स्वागतार्ह

बुधवार, २० ऑगस्ट रोजी देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी एक विधेयक सादर केले. देशातील मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान यापैकी कोणालाही, कोणताही गुन्हा केल्याबाबत पोलिसांनी अटक केल्यास व त्या व्यक्तीला ३० दिवसांत जामीन न मिळाल्यास ती व्यक्ती संवैधानिक पदावरून आपोआप बरखास्त होईल. अर्थात त्या व्यक्तीचे संवैधानिक पद जाईल. हे विधेयक जनतेच्या मनातील आहे. अटक झाल्यास सगळेच राजकीय नेते नैतिकता म्हणून राजीनामा देत नाहीत. काही दिवसांपूर्वी दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य परवाने वाटप घोटाळ्यात अटक झाली होती. तेव्हा त्यांनी राजीनामा देण्याची नैतिकता न दाखवता तुरुंगातून राज्य कारभार चालविण्याचा प्रयत्न केला. गुन्हा सिद्ध झाल्यानंतर एखादा नेता संवैधानिक पदावर कसा राहतो, असा प्रश्न जनतेला पडतोच. परंतु संसदेत उपरोक्त विधेयक सादर झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय खासदारांनी विधेयकाला विरोध करण्यासाठी नेहमीप्रमाणे गोंधळ घातला. विरोध करण्यापूर्वी काय चांगले आहे व काय चुकीचे आहे, याचा विचार न करता सरकारला व मोदींना केवळ विरोध करण्याचा एककलमी कार्यक्रम विरोधी पक्षांचा सुरू आहे. त्यामुळे विरोधी पक्ष जनतेच्या मनातील उरली सुरली सहानुभूतीसुद्धा गमावून बसणार आहे. चांगल्या गोष्टींचे समर्थन केले व वाईट, चुकीच्या गोष्टींना विरोध केला तरच विरोधी सत्ता प्राप्तीचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकेल.

**श्रीराम ढोले**/अमरावती

### गोंधळलेला विरोधी पक्ष आणि बेजबाबदार वर्तन

सद्यस्थितीत विरोधी पक्ष जनतेचे प्रश्न मांडणे सोडून आपापल्या राजकीय भविष्याचा विचार करण्यात मग्न आहे, पण तरीही सत्तेची भ्रांत काही संपत नाही. गेल्या ११ वर्षांत विरोधी पक्ष हा विरोधी पक्ष होण्यासही पात्र नाही असे वाटते. काही लोकप्रतिनिधींकडून परंपरागत एका ठरावीक घराण्याचे गुलाम होण्यातच धन्यता मानली जात आहे. त्यांना जनतेच्या मतरूपी सदिच्छाही कायम ठेवता येत नाहीत आणि नसतील. काहींना लोकांनी घरी बसवले आहे आणि पुढेही तेच होईल अशी सगळी चिन्हे दिसत आहेत. अगदी गुन्हेगारांची बाजू मांडण्यासाठी दिवसरात्र मेहनत घ्यायला मागेपुढे पाहत नाहीत. वारंवार निरुपयोगी असणाऱ्याचे प्रक्षेपण-पुनर्प्रक्षेपण करूनही काही फायदा होताना दिसत नाही. मग आता व्यवस्थांवर दोषारोप करणे. लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल अविश्वास, नकारात्मकता आणि संभ्रम निर्माण करणे. हे सगळे फक्त जनतेने ११ वर्षे सत्तेबाहेर हाकलून दिल्यामुळे जर त्यांना सामोरे जावे लागत असेल तर जेव्हा सत्तेत होते तेव्हा जनतेला तुमच्या विषयी किती चीड आणि राग असेल याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. राजकीय यश अपयश मिळणे ही वेगळी गोष्ट आहे पण एकदा गेलेली विश्वसनीयता जनतेत परत मिळवणे फार कठीण असते आणि आहे. जे विरोधी विचारांचे आहेत त्यांचा विरोध असणे हे ठीक आहे, पण त्यामधील काही लोक सरसकट विरोधी पक्षाच्या मूर्खतापूर्ण वाटचालीला साथ देत असतील तर मग अवघड आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून जनतेत विश्वासार्हता अनुभवास मिळत आहे आणि त्यातून दुसऱ्या बाजूला मात्र निष्प्रभ अपात्र विरोधी पक्ष धुमाकूळ गोंधळ करण्यातच दंग आहे. असे सर्व चालू असेल तर मग जनता तुमच्यावर कसा विश्वास ठेवणार?

**गणेश शेवते**/९०९६१५२९४९

### तंत्रज्ञानाचा वापर साधन म्हणून...

आजच्या काळात तंत्रज्ञानाशिवाय जगणे अशक्य झाले आहे. आज कोणत्याही स्तरातील किंवा वयोगटातील व्यक्तीसाठी कुठे ना कुठे तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक झाला आहे. अगदी शेतकऱ्यापासून ते व्यावसायिक, विद्यार्थी, कलाकार यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो. आजच्या युगात तंत्रज्ञानाशिवाय जीवनाची कल्पनाच करता येत नाही. शिक्षण, व्यवसाय, संवाद, आरोग्य, मनोरंजन अशा प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाने क्रांती घडवली आहे. मोबाईल, इंटरनेट, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा अनेक साधनांमुळे मानवी जीवन सोपे झाले आहे. आजकाल सर्व कामे ऑनलाईन होतात, यात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. पण याच तंत्रज्ञानाचा अतिरेक झाल्यावर त्याचे नकारात्मक परिणामही दिसून येतात. विशेषतः युवक आणि विद्यार्थी वर्गावर तंत्रज्ञानाचे दुष्परिणाम अधिक गंभीर आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत एक मोठा प्रश्न उभा राहिला आहे. तो म्हणजे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करायचा की त्याचे व्यसन अंगीकारायचे? साधन म्हणून तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला तर तंत्रज्ञान हे एक अमूल्य साधन आहे. शिक्षणात ऑनलाईन कोर्सेस, ई-बुक्स, व्हिडीओ लेक्चर्स हे ज्ञानाची दारे खुली करतात. व्यवसायासात ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, स्टार्टअप्स या सर्वांत तंत्रज्ञानामुळे युवकांना नव्या संधी मिळतात. आरोग्यविषयक ॲप्स, स्मार्ट डिव्हाइसेस वेळ व श्रम वाचतात. आजकाल तंत्रज्ञानाचा वापर व्यसनासारखा व्हायला लागला आहे. दुर्दैवाने अनेक युवक तंत्रज्ञानाला साधन न मानता व्यसन बनवतात. यावर उपाय म्हणजे, मनावर ताबा ठेवणे. तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर करणे. मोबाईल आणि सोशल मीडियासाठी वेळेची मर्यादा ठरवता आली पाहिजे. तंत्रज्ञानाचा उद्देशपूर्ण वापर झाला पाहिजे. तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवले तर ते यशाच्या वाटेवर नेईल. त्याचे व्यसन अंगीकारले तर ते आयुष्याची वाट चुकवेल.

**सुमेघ वानर**/९१३००२१३८७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विमुक्त जाती व भटक्या जमातीतील कर्मचाऱ्यांची आरक्षणाप्रमाणे भरती झाली पाहिजे : सुहास कांदे

- जिल्ह्यातील आश्रमशाळेत २२ हजार विद्यार्थी
- विद्यार्थ्यांना व शिक्षकांना हजेरीसाठी बायोमेट्रिक प्रणाली लागू करण्याची मागणी
- विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा तीन दिवशीय दौरा संपन्न
- तपासणी करण्यासाठी सहा महिन्यांनी समिती पुन्हा येणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र विधानमंडळाची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती या प्रवर्गाअंतर्गत येणाऱ्या २२३ जातीमधील नागरिकांना न्याय देण्याचे काम करत आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या अंतर्गत होणारी पदभरती, आरक्षण, जात पडताळणी याबाबत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही याबाबत दक्ष राहून शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणाची १००% पदभरती झाली पाहिजे यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश समितीचे प्रमुख सुहास कांदे यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित सर्व जिल्हास्तरीय यंत्रणांचा विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या पदभरती आरक्षण जात पडताळणी अनुषंगाने आयोजित आढावा प्रसंगी आमदार कांदे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार अमोल मिटकरी, आमदार प्रवीण स्वामी, आमदार उमेश यावलकर, आमदार अनिल मांगरूळकर, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय चे कक्ष अधिकारी विनोद राठोड, महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांच्या सह सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. आमदार कांदे पुढे म्हणाले की सोलापूर जिल्ह्यात ९७ आश्रम शाळा आहेत. या शाळांमध्ये जवळपास २२ हजार विद्यार्थी व शिक्षक वर्ग कार्यरत आहे. तरी या सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे दैनंदिन हजेरीसाठी बायोमेट्रिक प्रणाली लागू करावी. तसेच जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या आश्रम शाळा पैकी प्रत्येकी किमान दोन आश्रम शाळांना भेट देऊन संस्था चालकाकडून विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या शैक्षणिक सोयीसुविधा, शालेय पोषण आहार, वस्तीगृह याची पडताळणी करावी तसेच त्यात कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करावी, असेही त्यांनी सुचित केले आहे.

दि. १९ ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत या समितीने जिल्ह्यातील अनेक आश्रम शाळांना भेटी दिल्या. तसेच विभाग प्रमुख, अधिकारी यांच्याशी संवाद साधला. शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ह्या अनुषंगाने समितीने दिलेल्या सूचनांचे पालन पुढील तीन महिन्यात करावे. या दिलेल्या सूचनांची अंमबजावणी करून त्यात सुधारणा झाली आहे की नाही हे पाहण्यासाठी पुढील सहा महिन्यांनी समिती पुन्हा जिल्ह्यात तपासणीसाठी येईल, अशी माहिती आमदार श्री. कांदे यांनी दिली. विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी शासनाकडून विशेष नीधीची मागणी करण्याबाबतचा प्रस्ताव समितीला सादर करावा. तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत रस्त्याची कामे आवश्यक त्या ठिकाणी प्रस्तावित करून जास्तीत जास्त व्यायामशाळा व वाचनालय निर्माण करण्यासाठी प्राधान्य द्यावे, असे आवाहन ही त्यांनी केले.

यावेळी समिती प्रमुख आमदार कांदे व सर्व समिती सदस्यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पुढाकार घेऊन जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील वंचित नागरिकांसाठी २५ शिबिरे आयोजित करून १६०९ मतदान कार्ड, १४२१ जात प्रमाणपत्र, ५१७ आधार कार्ड, १९ दिव्यांग प्रमाणपत्र , ९१४ आयुष्यमान कार्ड तसेच या जातीतील ६२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आल्याबद्दल अभिनंदन व विशेष कौतुक करण्यात आले. तसेच या केलेल्या कामाचा एक सविस्तर प्रस्ताव करून समितीला सादर करावा व हा उपक्रम संपूर्ण राज्यात पथदर्शक प्रकल्प म्हणून राबवण्यात येईल असेही समितीने सांगितले.

यावेळी आमदार अमोल मिटकरी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार प्रवीण स्वामी, आमदार उमेश यावलकर, आमदार अनिल मांगरळकर यांनी सर्व शासकीय यंत्रणा कडून विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांसाठी असलेल्या अपेक्षांची माहिती दिली. तसेच शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे या समाजातील नागरिकांना आरक्षण, पद भरती, जात पडताळणी, स्थानिक स्वराज्य संस्थांचा पाच टक्के निधी अंतर्गतच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत अत्यंत काटेकोरपणे नियोजन करण्याचे निर्देश दिले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभाग, जिल्हा प्रशासन नगरपालिका विभाग, महापालिका, कृषी विभाग, समाज कल्याण विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, जात पडताळणी समिती, पोलीस विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, स्थानिक निधी विभाग, जिल्हा पशुसंवर्धन कार्यालय, या सर्व विभागाच्या प्रमुखांनी त्यांच्याकडील माहितीचे सादरीकरण समिती समोर केले.

## महत्वाचे...



### सोशल कॉलेजमध्ये इंग्लिश लिटररी असोसिएशनचा सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

एस.एस.ए. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, सोलापूर येथे इंग्लिश लिटररी असोसिएशनचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात कुरआनमधील सुरा फातिहा पठणाने झाली. मिस तर्कश आणि मिस वड्डो यांनी त्याचे इंग्रजीत सुंदर भाषांतर सादर केले. कार्यक्रमाचे सुरवात महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अस्मा खान यांनी केले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. पानफरोश यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. अस्मिता बालगावकर उपस्थित होत्या आणि त्यांचा प्राचार्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉ. बालगावकर यांनी भावनांचे व्यवस्थापन या विषयावर प्रेरणादायी आणि सखोल मार्गदर्शन केले. जीवनात ताणतणाव कमी करण्यासाठी दररोज शारीरिक व्यायाम व श्वासोच्छवासाच्या तंत्रांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी परीक्षेत गैरप्रकार टाळणे, मत्सरावर नियंत्रण ठेवणे आणि मानसिक आरोग्य जपण्याविषयी मोलाचे सल्ले दिले. कार्यक्रमादरम्यान ऑनलाइन चाचणी मालिकेतील विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. तसेच, महाविद्यालयाचे प्रा. निखिल भालेराव यांनी नेट परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. तांबोळी यांनी इंग्लिश लिटररी असोसिएशनच्या कार्याचे आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाचे मनःपूर्वक कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आफताब मुल्ला यांनी केले. प्रा. निखिल भालेराव यांनी

### सोलापूर महापालिकेने सुरू केला व्हाट्सअप चॅटबॉट

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

**नागरिकांना व्हाट्सअप नंबरवर मिळणार विविध सेवा, माहिती**

महापालिकेने आता व्हाट्सअप चॅटबॉट (Whatspp Chatbot) सुरू केला आहे. नागरिकांनी आपल्या मोबाईल नंबरवर ९११२२ २१९०१ हा नंबर सेव्ह करून महापालिकेच्या विविध सेवा, कामे आणि माहिती यावर मिळवता येणार आहे, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार महापालिकेच्या विविध सेवा सुविधा ऑनलाईन करण्यात येत आहेत. या अंतर्गतच आता महापालिकेने व्हाट्सअप चॅटबॉट सुरू केला आहे. हा नंबर सेव्ह करून नंबरवर hi असा मेसेज पाठवा. पुढे जाण्यासाठी इंग्लिश/मराठी भाषा निवडावी लागेल. त्यानंतर नमूद खालील सेवा निवडा. यामध्ये नागरी सेवा, ऑनलाइन पेमेंट, बुकिंग, तक्रार, घंटागाडी जीपीएस, प्रश्न उत्तर, योजना, माय सोलापूर, सोशल मीडिया असे पर्याय आहेत. त्यावर क्लिक करून आवश्यक ती माहिती आणि नोंदणी करता येईल. नागरी सेवांमध्ये जन्म मृत्यू नोंदी, विवाह नोंदणी, मालमत्ता कर संबंधित, घनकचरा विभाग, विविध व्यवसाय परवाना, नगर रचना विभाग संबंधी असे पर्याय आहेत. आवश्यकते पर्याय निवडून आपली सेवा उपलब्ध करून घेता येणार आहे. हा स्वयंचलित डिजिटल संगणक प्रोग्राम आहे. याद्वारे महापालिकेच्या विविध डिजिटल सेवा पाहता येणार आहेत. स्वयंचलितपणे संवाद साधणारा हा बॉट वापरकर्त्यांच्या संदेशांना उत्तर देतो, माहिती पुरवतो किंवा ठरावीक सेवा उपलब्ध करून देतो. Whatspp Chatbot चे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे स्वयंचलित उत्तर देतो एखादा ग्राहक hi असा मेसेज पाठवला तर बॉट लगेच उत्तर देतो. या सेवेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

## प्रा. डॉ. व्हटकर यांच्या 'चलबट' आत्मचरित्र ग्रंथाचे रविवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. अर्जुन व्हटकर यांच्या 'चलबट' या आत्मचरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा रविवारी २४ ऑगस्ट रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.



सायंकाळी ५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणाऱ्या या सोहळयाला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे, ज्येष्ठ समीक्षक रणधीर शिंदे उपस्थित राहणार आहेत. यावेळी सी.पी. सी.एल,भारत सरकार चेन्नई या पेट्रोलियम कंपनीचे सीनियर मॅनेजर अजय कावळे, प्रा. बाळासाहेब




बोरसे व कांचन व्हटकर यांची उपस्थिती राहणार आहेत. 'चलबट' या आत्मचरित्र ग्रंथाचे प्रकाशक ग्रंथाली प्रकाशन मुंबई हे आहेत. विश्वस्त सुदेशी हिंगलासपूरकर व संयोजिका धनश्री धारप यांनी उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

प्रा. डॉ. व्हटकर हे वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयातून सेवानिवृत्त होऊन दहा वर्षे होताहेत. २००६ साली त्यांचा 'तुंबण' हा कथासंग्रह साहित्य विश्वात दाखल झाला. त्यांच्या तुंबण या साहिकृतीला महाराष्ट्र शासनाचा कै. ग. ल. ठोकळ पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच त्यांच्या मुक्या जंगलाची गर्जना या पुस्तकालाही महाराष्ट्र शासनाचा कै. पंजाबराव देशमुख पर्यावरण पुरस्कार प्राप्त झाला आहे. मध्यप्रदेश शासनाचा भोपाळ साहित्य अकादमीचा कविवर्य भा. रा. तांबे पुरस्कारासह त्यांना महाराष्ट्रातील अनेक नामवंत संस्थांचे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.

मराठी साहित्य परिषदेच्या सोलापूर मुख्य शाखेचे ते कार्यकारिणी सद्स्यही आहेत. अनेक साहित्य संमेलनात, शाळा, महाविद्यालयात त्यांच्या कथाकथनाचे कार्यक्रम झालेले आहेत. तसेच त्यांच्या मुक्या जंगलाची गर्जना या पुस्तकाचा अलीकडेच अनुवादही झाला आहे.



## शेतकऱ्यांच्या पिकाचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी

**खा. प्रणिती शिंदे यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे अतिवृष्टीमुळे व भीमा नदीला आलेल्या पुरामुळे नुकसान झाल्याने तालुका पंचनामे होऊन नुकसान भरपाईच्या मागणीसाठी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने मंगळवेढ्याच्या नायब तहसीलदार एस. एस. कन्हेरे यांना निवेदन देण्यात आले.

खासदार शिंदे यांनी अशी मागणी केली की, सोलापूर जिल्ह्यामधील मंगळवेढा तालुक्यातील अनेक गावामध्ये शेतीपिकांचे अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी साचल्याने सोयाबीन, तुर व अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच नदीकाठावरील शेतकऱ्यांचे भीमा नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे पाण्याखाली जाऊन नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे त्वरीत करण्यात यावेत व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याने त्यांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी. यावेळी माजी जि. प. सदस्य अर्जुन पाटील, दामाजी कारखाना संचालक राजेंद्र पाटील, रविकिरण कोळेकर, सिद्धू कोकरे, मनोज यलगुलवार, समाधान हाके, पद्मिनी शेट्टीयार, पंडित पाटील, सत्तार इनामदार, सचिन पाटील आदी उपस्थित होते.




### वाहतुकीची कोंडी

**सोलापूर :** शहरातील बागेवाडीकर रुग्णालय ते टिळक चौक या रस्त्यावर सणासुदीच्या काळात वाहतुकीची कोंडी होत आहे. पोलिस व महापालिका प्रशासन याकडे लक्ष देणार का?



### राजराजेश्वरी शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**सोलापूर :** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळा व माध्यमिक प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. माजी विद्यार्थी चंद्रकांत सनके, शिल्पा सनके, गंगाधर सनके, कन्याकुमारी सनके, पालक शिक्षक संघाचे सदस्य शिवहार गाढवे, सचिन पवार, भाग्यश्री चिंताकिंदी, शारदा गीनानी आदी मान्यवरांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले.

Classifieds

**पाहिजेत**
शेती कामगार बिऱ्हाड पाहिजे. अकलूज येथे नर्सरीत काम करणारे जोडपे पाहिजेत. ९८९०१४३४३२ (गिरमे)

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**वार्षिक देखभाल कराराचे काम**
मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/28R4. कामाचे नाव: सोलापूर विभागाच्या छतावरील आरोहित डिझाइनच्या एलएचबी प्रकारच्या एसी कोचवर बसवलेल्या विविध मेकच्या एसी पॅकेज युनिटचा दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक देखभाल करार. (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत: रु. 2,17,65,593.59. बोली सुरक्षा: रु. 2,58,800. पूर्णत्वाचा कालावधी: २४ महिने. ऑफरची वैधता: 90 दिवसांची निविदा वेबसाइटवर बंद होण्याची तारीख आणि वेळ: 12/09/2025 15.00 वाजता. www.ireps.gov.in या वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे बोली सुरक्षा खर्चाचा भरणा केला जाईल.
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सहाय्यक) मध्य रेल्वे, सोलापूर
APEX-66
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
**ई-निविदा सूचना क्र. ००६/२०२५-२६**
महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदारांकडून कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| टि-40/ 2025-26 | संवसू विभाग कराड ता. कराड जि. सातारा अंतर्गत 33/11 के. व्ही. कराड शहर उपकेंद्र येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |
| टि-41/ 2025-26 | संवसू विभाग कराड ता. कराड जि. सातारा अंतर्गत 33/11 के. व्ही. कोळेवाडी उपकेंद्र येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |
| टि-42/ 2025-26 | संवसू विभाग फलटण ता. फलटण जि. सातारा येथील लक्ष्मीनगर परीसरातील संरक्षण भिंतीची दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |
| टि-43/ 2025-26 | संवसू विभाग फलटण ता. फलटण जि. सातारा येथील लोणंद उपविभागामधील चाचणी कक्षाची दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |
| टि-44/ 2025-26 | स्थापत्य उपविभाग बारामती जि. पुणे स्थित कर्मचारी वसाहत वर्ग 1, वर्ग 2, वर्ग 3, वर्ग - 4 येथील दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |
| टि-45/ 2025-26 | संवसू विभाग बार्शी ता. माढा जि. सोलापूर येथील 33/11 केव्ही टाकळी (टेंभूर्णी) उपकेंद्र येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.5.40 लाख |
| टि-46/ 2025-26 | संवसू विभाग बार्शी ता. माढा जि. सोलापूर येथील 33/11 के. व्ही. पडसाळी उपकेंद्र येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.7.30 लाख |
| टि-47/ 2025-26 | संवसू विभाग बार्शी जि सोलापूर येथील 220/110/33/11 के. व्ही. बार्शी उपकेंद्र येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.5.35 लाख |
| टि-48/ 2025-26 | संवसू विभाग बार्शी जि. सोलापूर येथील 33/11 के. व्ही तांदुळवाडी उपकेंद्र येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |
| टि-49/ 2025-26 | संवसू विभाग सोलापूर ग्रामीण जि. सोलापूर येथील दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. | रू.9.99 लाख |

ई- निविदा विक्रीचा कालावधी **दि. 22.8.2025 ते दि. 28.08.2025. रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत** असून ई- निविदा सादर करण्याची अंतिम तारीख **दि. 28.08.2025 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत** आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क अति.कार्यकारी अभियंता (स्था), बारामती **मो. 7875898589.** निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीदारांनी राखुन ठेवलेले आहेत.
PRO/BMTZ/088/2025-26 — **कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य विभाग, बारामती**

**जाहीर समन्स**
**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि.सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ४१३००१
**दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. परळी (वै.) शाखा सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६९/ २०२५-२६ | रु. ७९,६०१/- | १ | **संदीप शिवशरणप्पा ढंगे** रा. १०/४, भवानी पेठ, सोलापूर |
| | | | २ | **विश्वनाथ सतीश कारीमुंगी** रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर |
| | | | ३ | **लता संदीप ढंगे** रा. १०/४, भवानी पेठ, सोलापूर |
| | | | ४ | **प्रभाकर पांडुरंग गाडेकर** रा. मनिष नगर, शेळगी, सोलापूर |
| २ | ७०/ २०२५-२६ | रु. ६८,५८४/- | १ | **लता संदीप ढंगे** रा. १०/४, भवानी पेठ, सोलापूर |
| | | | २ | **विश्वनाथ सतीश कारीमुंगी** रा. राघवेंद्र कॉम्प्लेक्स, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर |
| | | | ३ | **प्रभाकर पांडुरंग गाडेकर** रा. मनिष नगर, शेळगी, सोलापूर |
| | | | ४ | **संदीप शिवशरणप्पा ढंगे** रा. १०/४, भवानी पेठ, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.
**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार गुरुवार, दि. ०४/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**
या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
आज दि. २१/०८/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.
शिक्का
**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### अमेरिकन ओपन मानांकनात स्वियातेक दुसऱ्या क्रमांकावर

**न्यू यॉर्क** : पोलंडची २४ वर्षीय टेनिसपटू इगा स्वियातेकला अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या मानांकनात दुसरे स्थान मिळाले आहे. मी निश्चितच आपल्या सर्वोत्तम स्थितीत परतली आहे. मी पुन्हा एकदा आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर व सर्व महिला टेनिसवर वर्चस्व गाजवण्यास सज्ज झाली आहेस, असे इहगा स्वियातेकने गत महिन्यात म्हटले होते. स्वियातेक आता रविवारपासून न्यू यॉर्कमध्ये सुरू होणाऱ्या यूएस ओपनमध्ये खेळणार असून तिच्या खेळाकडे टेनिसप्रेमींचे लक्ष लागलेले असेल. इगा स्वियातेककडे आधीच सहा ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद आहेत आणि तिला कारकिर्दीतील ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण करण्यासाठी केवळ ऑस्ट्रेलियन ओपन ट्रॉफीची आवश्यकता आहे. मानांकनात ती केवळ बेलारूसच्या आर्यना सबालेन्काच्या मागे आणि कोको गॉफच्या पुढे दुसऱ्या क्रमांकावर परतली आहे.

### स्वीडनच्या महिला गोल्फमध्ये प्रणवी, त्वेससह सात भारतीय

**गोथेनबर्ग** : येथे होणाऱ्या युरो ३००,००० हिल्स ओपन गोल्फ स्पर्धेत प्रणवी उर्स, त्वेसा मलिक आणि वाणी कपूर हे त्रिकूट एकूण सात गोल्फरचा समवेश असलेल्या भारतीय संघ सहभागी झाला आहे. यात नवोदित अवनी प्रशांत, अमनदीप ड्रॉल, स्नेहा सिंग आणि हिताशी बक्षी यांचा समावेश आहे. भारताची अव्वल स्टार दीक्षा डागरने हिरो महिला इंडियन ओपनसह व्यस्त दुसऱ्या सत्रापूर्वी आठवडा भर विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला आहे. दीक्षा अनेक अव्वल १० मध्ये स्थान मिळवत असताना इतर भारतीय खेळाडू या हंगामाच्या मध्यात गती शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मनगटाच्या दुखापतीतून पुनरागमन करत असताना, अवनी पहिल्या हंगामात तिचे स्थान मजबूत करत आहे आणि वाणी कपूर आणि अमनदीप एलईटी (लेडीज युरोपियन टूर) वर नियमित स्थान मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्नेहा आणि हिताशी त्यांच्या होम टूर, महिला प्रो- गोल्फ टूरमध्ये आव्हान उभे करणार आहे.

### अ.भा. टेनिस रँकिंग स्पर्धेत हर्षा देशपांडेला विजेतेपद

**जयपूर** : अदानी स्पोर्ट्सलाइन अकादमीची उदयोन्मुख टेनिस प्रतिभा हर्षा देशपांडेने गत आठवड्यात येथे झालेल्या अखिल भारतीय रँकिंग चॅम्पियनशिप सिरीज टेनिस स्पर्धेत आपले पहिले १४ वर्षांखालील मुलींच्या गटाचे एकेरी जेतेपद पटकावले. १२ वर्षीय हर्षाने संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय सातत्य दाखवले. पहिल्या फेरीत बाय मिळाल्यानंतर, हर्षाने उप-उपांत्यपूर्व सामन्यात राजस्थानच्या तेजस्वी यादव (६-२, ६-१) आणि उपांत्यपूर्व सामन्यात गुजरातच्या झिया ठक्करला (६-२, ६-३) पराभूत केले. त्यानंतर तिने राजस्थानच्या खुशवी पडियार (६-०, ४-६, ७-५) विरुद्धच्या एका रोमांचक उपांत्य फेरीत झुंज दिली आणि अंतिम फेरीत गुजरातच्या नैसा सोलंकीवर ६-२, ६-१ असा विजय मिळवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. इयत्ता सातवीत शिकणारी हर्षा २०२४ पासून अदानी स्पोर्ट्सलाइन टेनिस अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. या महिन्याच्या सुरुवातीला, तिने अहमदाबादमधील एसजीएफआय जिल्हा टेनिस स्पर्धेत तिसरे स्थान मिळवले आणि आगामी एसजीएफआय राज्य अकादमीसाठी गुजरात राज्य संघात निवड झाली. या वर्षाच्या सुरुवातीला अहमदाबादमध्ये झालेल्या ऑल इंडिया रँकिंग चॅम्पियनशिप सिरीज (७) मध्ये तिने मुलींच्या अंडर-१४ दुहेरीत सुवर्णपदकही जिंकले. जयपूरमधील हर्षाचा पहिला एकेरीचा विजय भारतीय टेनिसमधील तिचे आशादायक भविष्य आणि क्रीडा चॅम्पियन्सच्या पुढील पिढीचे संगोपन करण्याची अदानी स्पोर्ट्सलाइन अकादमीची वचनबद्धता दोन्ही अधोरेखित करतो.

# आगरकर यांचा कार्यकाळ वाढला

### जून २०२६ पर्यंत राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष

◆ **नवी दिल्ली, २१ ऑगस्ट**

राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांचा करार जून २०२६ पर्यंत आणखी एका वर्षासाठी वाढवण्यात आला आहे. टीम इंडियाच्या यशस्वी कामगिरीमुळे आयपीएल २०२५ पूर्वी आगरकर यांचा मुख्य निवडकर्ता म्हणून करार नूतनीकरण करण्यात आला.

आगरकर यांच्या कार्यकाळात भारतीय संघाने जेतेपद जिंकले व कसोटी आणि टी-२० क्रिकेट संक्रमण देखील पाहिले. बीसीसीआयने त्यांचा करार जून २०२६ पर्यंत वाढवला होता आणि काही महिन्यांपूर्वी त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला होता, असे बीसीसीआयच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले.



जून २०२३ मध्ये मुख्य निवडकर्ता म्हणून पदभार स्वीकारणाऱ्या आगरकरने भारतीय क्रिकेटसाठी एक कठीण संक्रमणकालीन काळ अनुभवला ज्यामध्ये महान विराट कोहली, रोहित शर्मा व रविचंद्रन अश्विन यांच्या कसोटी निवृत्तीचा समावेश होता. आणखी एका मोठ्या निर्णयात, शुभमन गिलने कसोटी कर्णधारपदाची सूत्रे स्वीकारली, तर सूर्यकुमार यादवला टी-२० कर्णधारपद देण्यात आले.

भारताने या वर्षाच्या सुरुवातीला २०२४ चा टी-२० विश्वचषक आणि आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली, तर त्यांच्या कार्यकाळात २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीतही स्थान मिळवले.

सप्टेंबरमध्ये होणाऱ्या बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर एस.एस. दास, सुब्रतो बॅनर्जी, अजय रात्रा आणि एस. शरथ यांचा समावेश असलेल्या निवड समितीमध्ये बदल होऊ शकतात. सप्टेंबर २०२१ पासून ज्युनियर निवड अध्यक्ष म्हणून काम केल्यानंतर जानेवारी २०२३ मध्ये वरिष्ठ समितीत सामील झालेले शरथ, सप्टेंबरमध्ये त्यांचा चार वर्षांचा कार्यकाळ संपत असल्याने त्यांची जागा घेतली जाऊ शकते. ◂(वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंद, कारुआनाला संयुक्त आघाडी

### सिन्कफिल्ड चषक बुद्धिबळ; बहुतांश लढती बरोबरीत

**सेंट लुईस, २१ ऑगस्ट**

येथे सुरू असलेल्या सिन्कफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत तिसऱ्या फेरीत विश्वविजेता भारताचा डी. गुकेश व अमेरिकेच्या सॅम्युअल सेव्हियन यांच्यादरम्यानची, तसेच ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंद व उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह यांच्यादरम्यानची लढत बरोबरीत सुटली व समान गुण वाटून घेतले. अमेरिकेच्या फॅबियानो कारुआना व फ्रान्सच्या अलिरेझा फिरोझा यांच्यादरम्यानची लढतही बरोबरीत राहिली. ३,७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या बक्षीस रकमेच्या या स्पर्धेत अजून सहा फेऱ्या शिल्लक असून प्रज्ञानंद व कारुआनाने प्रत्येकी २ गुणांसह संयुक्त आघाडी मिळविली.



डी. गुकेश, अलिरेझासह , वेस्ली सो (अमेरिका), मॅक्सिम वाचियर-लॅग्राव्ह (फ्रान्स) व कालचा आघाडीवर लेव्हॉन ॲरोनियन (अमेरिका) प्रत्येकी १.५ गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहे.

कारुआनाने फ्रान्सच्या अलिरेझा फिरोजाला स्पर्धेत पहिला पराभव दिला. आरोनियनला फ्रान्सच्या मॅक्सिम वाचियर-लाग्राव्हने बरोबरी साधली, तर अमेरिकेच्या वेस्ली सोने पोलंडच्या डुडा जान-क्रिज्स्टोफसह गुण विभागले. दुदा एका गुणासह दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर अब्दुसत्तोरोव्हने येथे त्याच्या पहिल्या तीन सामन्यांमधून अर्धा गुण मिळवला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### मोहसीन अलीला सुवर्ण

**श्रीनगर** : दाल सरोवरात शिकारावर नौका चालवण्यापासून ते राष्ट्रीय गौरवापर्यंत प्रवास करणारा मोहसीन अली याने गुरुवारी खूप मोठा पल्ला गाठला आहे. गुरुवारी खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव २०२५ मध्ये पहिले सुवर्णपदक जिंकून मोहसीनने जम्मू आणि काश्मीरची मान उंचावली. १७ वर्षीय मोहसीनने १००० मीटर पुरुषांच्या कायाकिंग स्पर्धेत ४:१२:७१७ वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले.

# भारतीय संघाचा 'सुवर्ण'भेद



लक्ष्य साधताना अर्जुन बबुता व रुद्रांक्ष पाटील

◆ **श्यामकेंट (कझाकस्तान), २१ ऑगस्ट**

कझाकस्तानमधील श्यामकेंट येथे सुरु असलेल्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत गुरुवारी अर्जुन बबुता, रुद्रांक्ष पाटील आणि किरण जाधव यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात सांघिक सुवर्णपदक जिंकले.

या तिन्ही नेमबाजांनी एकूण १८९२.५ गुण मिळवले, चीनच्या १८८९.२ गुणांना मागे टाकले. ली शियानहाओ, लू डिंगके आणि वांग होंगहाओ या तिघांनी चीनसाठी हे गुण मिळवले. दक्षिण कोरियाच्या पार्क हा-जून, ली जुन-ह्वान आणि सेओ जुन-वोन यांनी एकत्रितपणे १८८५.७ गुण मिळवून कांस्यपदक जिंकले.

**मानसी रघुवंशीला सुवर्ण, यशस्वी राठोडला कांस्य**

दरम्यान, मानसी रघुवंशीने सुवर्णपदक जिंकले, तर भारताच्याच यशस्वी राठोडने महिला ज्युनियर स्कीट स्पर्धेत १-२ गुण मिळवत कांस्यपदक जिंकले.

मानसीने अंतिम फेरीत ५३ गुण मिळवत विजेता ठरली, तर यशस्वीने ५२ गुण मिळवत कझाकस्तानच्या लिडिया बाशारोवा (४०) पेक्षा पुढे दुसरे स्थान मिळवले.

कनिष्ठ पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत अभिनव शॉने अव्वल पारितोषिक जिंकले, त्याने २५०.४ गुणांसह दक्षिण कोरियाच्या ली ह्युन-सेओ (२५०.३) ला मागे टाकले. चीनच्या मा सिहानने २२९.२ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

कनिष्ठ पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत अभिनव, हिमांशू तलान आणि नारायण सुरेश या त्रिकुटाने सांघिक सुवर्णपदक जिंकल्याने भारतीय संघासाठी आनंदाची बाब अधिक होती. भारतीय नेमबाजांनी चीनच्या मा सिहान, हान यिनान आणि लिऊ जुनहाओ (१८८५.१) आणि दक्षिण कोरियाचे ली ह्युन-सेओ, किम ताई-ओंग आणि ली जोंग-ह्युक यांना मागे टाकत १८९०.१ गुणांसह जागतिक आणि आशियाई ज्युनियर विक्रम मोडले.


कनिष्ठ पुरुषांच्या स्कीटमध्ये, हरमेहर सिंग लाली आणि ज्योतिरादित्य सिंग सिसोदिया यांनी अंतिम फेरीत अनुक्रमे ५२ आणि ४३ गुणांसह वैयक्तिक रौप्य आणि कांस्यपदक जिंकले. ◂(वृत्तसंस्था)

# डायमंड हार्बर ड्युरंड चषकाच्या अंतिम फेरीत

◆ **कोलकाता, २१ ऑगस्ट**

मायकेल इडियाकेझ आणि जॉबी जस्टिनने उत्तरार्धात नोंदविलेल्या गोलच्या बळावर नवोदित संघ- डायमंड हार्बर एफसीने ईस्ट बंगालवर २-१ असा विजय मिळवला आणि १३४ व्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. आता २३ ऑगस्ट रोजी सॉल्ट लेक स्टेडियममध्ये विजेतेपदासाठी डायमंड हार्बरला नॉर्थईस्ट युनायटेड एफसीविरुद्ध निर्णायक झुंज द्यावी लागणार आहे.

इडियाकेझच्या शानदार बॅक-व्हॉलीमुळे डायमंड्सना आघाडी मिळाल्यानंतर रेड ॲण्ड गोल्ड्सच्या काही क्षणांसाठी अन्वर अलीने बरोबरी साधली होती.



विजयाचा आनंद साजरा करताना डायमंड हार्बर

पूर्वार्धात डायमंड्सने गोलच्या दिशेने पहिला शॉट मारला होता, परंतु २० मिनिटांच्या जवळपास, जॉबीने जवळून गोलवर पहिला शॉट मारला परंतु ईस्ट बंगालच्या गोलमध्ये प्रभसुकन गिलने तो सहजपणे रोखला. त्यानंतर २२ व्या मिनिटाला अन्वरने गोलवर पहिला स्ट्राईक मारला, परंतु तो हुकला.

दुसऱ्या सत्रात, रेड अँड गोल्ड्सने दबाव कायम ठेवला आणि बिपिनने जवळून मारा केला, ज्यामुळे विकुनाला नारझारी, सैरुअतिकमा यांच्या जागी गिरिक खोसला, मेलरॉय असिसी आणि अंगौसाना या नवीन आणि अनुभवी खेळाडूंना संधी मिळाली.

खेळ सुरू असताना, डायमंडच्या इडियाकेझने एक अद्भूत गोल केला. पॉलने डावीकडून फ्री-किक घेतला, परंतु अन्वरने त्याच्या डोक्याने गोल करण्याचा प्रयत्न केला. चेंडू गोलच्या पलीकडे गेला आणि इडियाकेझने गोलच्या दिशेने पाठ फिरवून परिपूर्ण बॅक-व्हॉली मारली. त्यामुळे स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या डायमंड संघाला सामन्यात पहिल्यांदाच आघाडी मिळाली व तीच विजयी आघाडी ठरली. ◂(वृत्तसंस्था)

# रणजी हंगामापूर्वी अजिंक्य रहाणेचा मुंबई कर्णधारपदाचा राजीनामा

◆ **मुंबई, २१ ऑगस्ट**

भारताचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेने गुरुवारी आगामी रणजी करंडक हंगामापूर्वी मुंबई संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला. नवीन कर्णधार तयार करण्याची ही योग्य वेळ आहे, असे तो म्हणाला.

२०१ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये १४००० धावा करणारा ३७ वर्षीय खेळाडू मात्र संघात फलंदाज म्हणून खेळत राहील. १५ ऑक्टोबरपासून रणजी हंगाम सुरू होत आहे व मुंबईचा पहिला सामना जम्मू-काश्मीरविरुद्ध होईल.



मुंबई संघासोबत कर्णधारपद व विजेतेपद जिंकणे हा एक पूर्ण सन्मान आहे. मी एक खेळाडू म्हणून माझे सर्वोत्तम देण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे, असे रहाणेने म्हटले आहे.

रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईने २०२३-२४ च्या हंगामात रणजी करंडकाचे विजेतेपद पटकावले व अंतिम सामन्यात विदर्भावर विजय मिळवला. त्याने २०२४-२५ च्या इराणी चषकामध्ये शेष भारत संघाला पराभूत करून संघाला विजय मिळवून दिला. ◂(वृत्तसंस्था)

# महिला विश्वचषकासाठी इंग्लंडचा १५ सदस्यीय संघ जाहीर

### हीथर नाईटचे पुनरागमन

◆ **लंडन, २१ ऑगस्ट**

माजी कर्णधार हीथर नाईटची गुरुवारी आगामी आयसीसी महिला विश्वचषकासाठी १५ सदस्यीय इंग्लंड संघात निवड झाली आणि भारताविरुद्धच्या अलिकडच्या मालिकेत खेळू न शकलेल्या सारा ग्लेन आणि डॅनी वायट-हॉज या जोडीनेही संघात पुनरागमन केले.

उजव्या पायाच्या स्नायूच्या दुखापतीमुळे गत काही महिन्यांपासून संघाच्या बाहेर असलेल्या नाईटचे संघात पुनरागमन झाले आहे.

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, हीथर नाईट दुखापतीतून बरी होत असून ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या स्पर्धेसाठी वेळेवर तंदुरुस्त होण्याची आशा असल्याने तिला संघात स्थान देण्यात आले आहे.

ग्लेन ही संघातील चार तज्ज्ञ फिरकीपटूंपैकी एक आहे व त्यांच्या पहिल्या एकदिवसीय विश्वचषकात सहभागी होणाऱ्या सहा खेळाडूंपैकी एक आहे, जो आयसीसी स्पर्धेत नॅट सायव्हर-ब्रंटची कर्णधार म्हणून पहिलाच सामना असेल.

जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेल्या वन-डे फलंदाज सायव्हर-ब्रण्टची एप्रिलमध्ये ऑल फॉरमॅट कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली. व्याट-हॉज देखील परतली आहे, परंतु केट क्रॉस, माया बाउचियर आणि ॲलिस डेव्हिडसन-रिचर्ड्सला वगळण्यात आले आहे.

नवीन कर्णधार सायव्हर-ब्रंट आणि मुख्य प्रशिक्षक चार्लोट एडवर्ड्स यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा देशाचा पहिला विश्वचषक आहे. २०२२ च्या अंतिम सामन्यात इंग्लंडला हरवल्यानंतर ऑस्ट्रेलिया गतविजेत्या म्हणून परतला आहे.

इंग्लंड महिला क्रिकेट संघ : नॅट सायव्हर-ब्रण्ट (कर्णधार), एम आर्लोट, टॅमी ब्यूमोंट, लॉरेन बेल, ॲलिस कॅप्सी, चार्ली डीन, सोफिया डंकले, सोफी एक्लेस्टोन, लॉरेन फाइलर, सारा ग्लेन, एमी जोन्स, हीथर नाईट, एम्मा लॅम्ब, लिन्से स्मिथ, डॅनी व्याट-हॉज. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय अ महिला संघाची घसरगुंडी

◆ **ब्रिस्बेन, २१ ऑगस्ट**

ॲलन बॉर्डर मैदानावर गुरुवारपासून प्रारंभ झालेल्या पहिल्या अनधिकृत चार दिवसीय महिला कसोटी क्रिकेट सामन्यात पावसाने व्यत्यय आणला, परंतु खेळ थांबेस्तोवर भारत अ महिला संघाची ५ बाद ९३ धावा अशी घसरगुंडी उडाली. ऑस्ट्रेलियाची वेगवान गोलंदाज जॉर्जिया प्रेस्टविजने वेगवान परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेत तीन बळी टिपलेत व भारतीय संघाची आघाडीची फळी उद्ध्वस्त केली.



नंदिनी कश्यप आणि धारा गुर्जरला सलग चेंडूंवर बाद केले व कर्णधार ताहलिया विल्सनचा निर्णय

दिवसाच्या दुसऱ्या षटकात जॉर्जियाने नंदिनी कश्यप आणि धारा गुर्जरला सलग चेंडूंवर बाद केले व कर्णधार ताहलिया विल्सनचा निर्णय योग्य असल्याचे सिद्ध केले.

भारताच्या वन-डे विश्वचषक संघात स्थान न मिळालेल्या शेफाली वर्माने तेजल हसबनीससोबत पाहुण्या संघाचा आधार तयार केला. परंतु सियाना जिंजरने अे ३८ धावांवर तेजलला नऊ धावांवर बाद करत तिसऱ्या गड्यासाठीची भागीदारी मोडली.

जॉर्जियाने पुढच्याच षटकात भारत अ संघाच्या पुनरागमनाच्या आशांना आणखी धक्का दिला, शेफालीला ३५ धावांवर बाद केले. ◂(वृत्तसंस्था)

# भारत स्पोर्ट्स अकादमीच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय ॲथ्लेटिक्स स्पर्धेसाठी निवड

◆ **आरमोरी, २१ ऑगस्ट**

महाराष्ट्र ॲथ्लेटिक्स संघटना व गडचिरोली जिल्हा ॲथ्लेटिक्स संघटनेच्या मान्यतेने १७ ऑगस्ट रोजी सीआरपीएफ कॅम्प एमआयडीसी गडचिरोली येथे राज्यस्तरीय ज्युनिअर ॲथ्लेटिक्स स्पर्धेसाठी जिल्हा संघाची निवड चाचणी घेण्यात आली. यात भारत स्पोर्ट्स अकादमी आरमोरीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी स्थान निश्चित केले.



स्पर्धेसाठी निवड झालेले भारत स्पोर्ट अकॅडमीचे विद्यार्थी

यात १८ वर्षांतील मुलींच्या गटात श्रेया दिलीप शेबे हिने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत व गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर नूतन सचिन चौके हिने १०० मीटर व २०० मीटर स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच १४ वर्षांच्या आतील मुलींच्या गटात साची संजय टिचकुले हिने ट्रायथ्लॉन सी (६० मीटर स्प्रिंटींग रनिंग, लांब उडी, गोळाफेक) या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षांवरील मुलींच्या गटात आराध्या राजू चौके हिने ट्रायथ्लॉन सी (६० मीटर स्प्रिंटींग रनिंग, लांब उडी, गोळाफेक) स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. मुलांच्या गटात सोहम सचिन चौके याने ट्रायथ्लॉन सी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.

या सर्व विजेत्या खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय पालक तथा भारत स्पोर्ट्स अकादमीचे संचालक महेंद्र मने यांना दिले आहे. स्पर्धेत यश मिळवून आरमोरी शहराचे नावलौकिक केल्याबद्दल या विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# खुल्या गटात अमित मुदगुंडी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

कांताबाई प्रभाकर बटगेरी स्मृती चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या अमित मुदगुंडी याने प्रथम क्रमांक पटकाविला. अन्य गटात सागर पवार, वरद लिमकर, साईराज घोडके, सार्थक उंबरे, जय तुम्मा, समरजित देशमुख, विहान कोंगारी, विराज धोंगडे व नयन कंदीकटला यांनी अजिंक्यपद पटकाविले.

श्री रमा जगदीश बहुद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे झालेल्या या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण प्रीतम यावलकर, दंत चिकित्सक व आहार तज्ञ डॉ.अंबिका यावलकर, माजी शिक्षण विस्तार अधिकारी प्रभाकर बटगेरी, वैशाली गोसावी, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, सुशील कुमार शिंदे भावी प्रशाला अध्यक्ष संतोष पैकेकरी, संतोष बुंदाले,सचिन चव्हाण व हेमराज जमादार यांचे प्रमुख उपस्थितीत झाले.

**कांताबाई प्रभाकर बटगेरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा**



**गुणानुक्रमे अंतिम निकाल**

**खुला गट** : अमित मुद्गुंडी, प्रज्वल कोरे, श्रीधर शिंदे, श्रेयस कुदळे, अमर शिंदे, गांधी सागर, चंद्रशेखर बसर्गिकर, पवार प्रेरणा, अदिराज म्हेत्रे, स्वप्निल हदगल, मंदार आपटे, नाविन्या वडशेरला, सुभाष भोसले, श्रीकांत अंकुशराव, निखिल केजकर

**१९ वर्षाखालील** : सागर पवार, श्रावणी देवणपल्ली, गणेश पवार, वैष्णवी येलदी, श्रेया संदूपटला, आभा कुलकर्णी

**१७ वर्षाखालील** : वरद लिमकर, विठ्ठल येलदी, भार्गव भास्करे, सानिध्य जमादार, तन्मय कदम, प्रणव बावी.

**१४ वर्षाखालील** : साईराज घोडके, आरुष कंदले, जय अणेराव, मल्हार वाघे, अथर्व बसर्गीकर, अशीष नरवणे, वैभव भडकुंबे, अवधूत जाधव, अश्वदीप भडकुंबे,

**१३ वर्षांखालील** : सार्थक उंबरे, अधिराज कोनापुरे, आयुष उपाडे, स्वराज् हिरेमठ, तेजल चिलगुंडे, अक्षरा येमुल, विराज गायकवाड, वेदांत कोल्हापूरे

**१२ वर्षाखालील** : जय तुम्मा, विहानराज पत्की, अभिषेक उदिकेरी, विदित कबरा, गौरी भोसले, आदिती इनानी, ओम विजापूरे, आलोक देवसेना, शिवतेज मोटे, श्रवण सरसंबी

**११ वर्षाखालील** : समरजीत देशमुख, आदित्य कसबे, गोवर्धनी मिठ्ठा, शौर्य चंदनशिवे, आयुष्य जानगवळी, प्रतीक्षा चाबुकस्वार, देवांश मर्दा, रामकृष्ण बडवणे, आरोही दलाल, देवांश बत्तीन.

**१० वर्षाखालील** : कोंगारी विहान, वेदांत पांडेकर, प्रतीक हलमल्ली, प्रज्ञेश महाडकर, श्लोक चौधरी, शशांक जमादार, सम्यक सावंत, श्लोक सदाफुले, श्रुती क्षीरसागर.

**९ वर्षाखालील** : विराज धोंगडे, प्रथम मुदगी, नैतिक होटकर, हिमांशू व्हनगावडे, मयूर स्वामी, पृथा ठोंबरे, सिद्धार्थ शेळके, रुतीश बत्तीन, आदित्य जानगवळी, शिवराज जाधव.

**८ वर्षाखालील** : नयन कंदीकटला, नमन रंगरेज, रत्नेश घाणेगावकर, सिद्धार्थ शेळके, राजवर्धन देशमुख, प्रज्ञेश काबरा, अर्णव चव्हाण, आयुष बडवणे, ऋषभ पमनानी, हर्ष क्षिरसागर.

**उत्तेजनार्थ** : रूषांक कंदी, अद्वैत ठोंबरे, आरुष लामकाने, खडतकर स्वानिक, श्रेया पैकेकरी, आदित्य कोकरे, सार्थक डोंगरे, रुद्र निर्गुंटला, श्रेयस इंगळे, अरुष चव्हाण, स्मित धायगुडे, रुद्र माने, अर्चित कोनापुरे.

# टेनिसपटू संध्याराणी बंडगर यांचा गौरव

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून सन २०२४-२५ या वर्षात अति उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्य लेखापाल संध्याराणी बंडगर यांना गौरविण्यात आले.

राज्यातील सामाजिक वनीकरण विभागात कार्यरत असलेल्या टेनिसपटू संध्याराणी बंडगर, मुख्य लेखापाल यांचे सन २०२४-२५ मधील कामाचे एकूण १० बाबींच्या मूल्यांकनाच्या अनुषंगाने त्यांना विभाग स्तरावर तसेच वृत्त स्तरावर पात्र ठरवून अति उत्कृष्ट मुख्य लेखापाल म्हणून निवड करून गौरविण्यात आले. हे प्रशस्ती पत्र १५ ऑगस्ट २०२५ रोजी विभागीय वन अधिकारी शुभांगी जावळे यांच्या हस्ते देण्यात आले. क्रीडा क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातील व कार्यालयीन जबाबदारीत त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरी बद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### भिमा नदीला आलेल्या पुराने शेती पिकाचे मोठे नुकसान

**श्रीपूर, दि. २१ ऑगस्ट-**

उजनी व वीर धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने या धरणातून भीमा नदीत मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक वाढल्याने भिमा नदीचे पात्र दुथडी भरून वाहत आहे . नदी पात्रात असणारे सर्व बंधारे व नरसिंहपर, उंबरे, नेवरे येथिल मोठे पुल पाण्याखाली गेल्याने माळशिरस व पंढरपूर तालुक्याचा या भागातील संपर्क तुटला आहे. या पुरामुळे नदी काठची पिके विशेषतः ऊस पिक व जनावरांचा चारा पूर्णपणे पाण्यात गेली आहेत. साखर कारखान्यांचे गाळप हंगाम साधारण दोन ते अडिच महिन्यात चालु होतील अशा वेळी हाता तोंडला आलेल्या ऊस पिकात पाणी शिरल्याने शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान झाले आहे. भिमा नदीला या वेळी दोनदा पुर आला यात कधी नव्हे तो मे महिन्यात पडलेल्या मुसळसधार पावसाने नदीला पुर येवून असेच पात्रातून पाणी बाहेर आले होते . हे संकट तर मोठे होते कारण अचानक पुर आल्याने अनेक शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी , स्टार्टर व केबल या पुरात वाहून गेल्या या बरोबरच भुईमुग पिकांचेही अपरिमित नुकसान झाले. या दुहेरी संकटाने शेतकरी कोलमोडून गेला आहे.

#### नुकसान भरपाई मिळणे गरजेचे

भिमा नदीस मे महिन्यात आलेल्या अचानक पुराने व आत्ताच्या पुराने नदी काठच्या शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे .मे महिन्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे नाहीत तसे आता व्हायला नको दोन दोन संकटे शेतकरी वर्ग कसा सोसू शकणार आहे . शासनाने परिस्थिती सुधारल्यावर तातडीने नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी तसेच नदीच्या पाण्यासाठी जी पाणी पट्टी आकारली जाते ती आकारू नये म्हणजे थोडा फार दिलासा मिळेल.

**राहूल कुंडलिक रेडे-पाटील,**
**नगरसेवक महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**



### वळसंग पोलीस ठाण्यात गणेश मंडळाची शांतता बैठक संपन्न

**वळसंग,दि. २१ ऑगस्ट-**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे पोलीस ठाण्यात शांतता समिती, पोलीस पाटील तसेच गावातील गणेश मंडळ प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. बैठकीत प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी येणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे मार्गदर्शन केले. त्यामध्ये प्रामुख्याने एक गाव - एक गणपती, पर्यावरणपुरक गणपती, सांस्कृतीक गणपती, पारंपारीक उत्सव असे विविध उपक्रम राबविण्यासाठी आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करून त्यामध्ये लेझीम, पारंपारीक वाद्यांचा वापर करण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे. गणेशोत्सव मंडळाचे मंडप सुसज्ज व लोकांना रस्त्यावर त्रास न होईल अशा प्रकारे उभारणे. त्यामध्ये २४ तास पहारेकरी नेमणे, सीसीटीव्ही बसविणे असे मंडळाचे अध्यक्षांची कर्तव्ये नेमण्यात आली आहेत. यंदा शांतता व शिस्तबद्धतेने गणेशोत्सव पार पाडण्यासाठी सर्व नागरिक, गणेश मंडळे व ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. उत्कृष्ठ गणेशोत्सव करणारे मंडळांना विशेष गौरविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर बैठकीस उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावर, पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील व रवीराज कांबळे उपस्थित होते.




### प्रभाव भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे उद्घाटन

**सोलापूर,दि.२१ ऑगस्ट-**

प्रभाव भ्रष्टाचार निर्मूलन समिती महासंघ सोलापूर शाखेचे उदघाटन आज दि. २० ऑगस्ट रोजी समीतीचे जेष्ठ सभासद संजय राऊत यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहूणे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत सूत्रावे होते. यावेळी समीतीचे अध्यक्ष अनिल उपरे, सभासद सूरेश माताडे, विकास कदम, संजय राऊत, सतीश जगदने, ॲड. मंजूश्री देशमुख, वजीर मूजावर, सूमित उपरे, सचिन वेणेगूरकर व अन्य उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### गुरुनाथ करपे



**सोलापूर दि.२१ ऑगस्ट-**

एसटी कॉलनी सुंदरम नगर येथील सेवानिवृत्त पाटबंधारे अधिकारी गुरुनाथ महादेव करपे (वय ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्यात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

# मोहोळ नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रभाग रचना जाहीर

## आता १७ ऐवजी २० सदस्य असणार


**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २१ ऑगस्ट -**

जवळपास ३ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीचे बिगुल पुन्हा वाजले असून १८ ऑगस्ट रोजी नगरपरिषदेची प्रभाग रचना जाहीर झाली. त्यामुळे इच्छुक नगरसेवकांची धावपळ सुरू झाली आहे. २०११ च्या लोकसंख्येच्या निकषानुसार मोहोळ नगर परिषदेच्या १० प्रभागांमध्ये २० सदस्य संख्या होणार असून आता इच्छुक उमेदवारांचे आरक्षणाकडे लक्ष लागले आहे.

कोरोना व ओबीसी मुळे आणि आरक्षणाच्या रखडलेल्या प्रश्नांमुळे निवडणूक प्रक्रिया लांबणीवर पडली होती. शासनाच्या नविन आदेशानुसार मोहोळ शहरात बहुसदस्यीय प्रभाग पद्धती अवलंबण्यात येणार असून मोहोळ नगरपरिषद ही क वर्गात येत असल्यामुळे नगरपरिषदेमध्ये २० सदस्य संख्या राहणार आहे. तसेच यापूर्वी नगर परिषदेसाठी काढण्यात आलेले आरक्षण, प्रभाग रचना सर्वच बदलण्यात आली आहे. यापूर्वी १७ सदस्य होते,त्यामध्ये वाढ होऊन ती सदस्य संख्या २० झाली आहे.यामध्ये एक स्त्री एक पुरुष असे होण्याची दाट शक्यता असल्यामुळे आगामी निवडणुकात आपल्या पत्नीलाही तयारी करावी लागणार असलेली शक्यता काही नगरसेवकांनी बोलून दाखवली. तर १७ प्रभाग होते ते कमी होवून त्याची संख्या १० झाली आहे. यापूर्वी झालेल्या आरक्षण सोडतीनंतर अनेक इच्छुक नगरसेवकांनी आपल्या आपल्या प्रभागांमध्ये जनसंपर्क वाढवत पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू केला होता. परंतु अचानक झालेल्या आरक्षण सोडत व प्रभाग रचनेतील बदलामुळे मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सुरू असलेले अनेक




तर्कवितर्क बदलले असून एका प्रभागात दोन नगरसेवक येत असल्यामुळे इच्छुकांमध्ये मात्र मोठी स्पर्धा निर्माण होणार आहे. अनेक इच्छुक उमेदवार प्रभाग आरक्षणाचा अंदाज घेत आहेत. या प्रभाग रचनेवर हरकती व सूचना घेण्यासाठी ३० ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे.माजी नगरसेवकांनी यापूर्वी पडलेल्या आरक्षणाचा अंदाज बांधत त्या प्रभागांमध्ये जरी निवडणुकीची तयारी केली असली तरी येणाऱ्या काळात मात्र ती तयारी कुठपर्यंत त्यांच्या पत्त्यावर पडेल हे आरक्षणानंतर समोर येईल.



सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या बाबतचा निकष लावण्यात आला असून त्यामध्ये मोहोळ ची लोकसंख्या २७ हजार ८३३ आहे. २५ हजार लोकसंख्या असलेल्या शहराला २० सदस्य राहणार आहेत. तर त्या पुढील ३ हजार लोकसंख्येसाठी १ सदस्य वाढणार आहे.केवळ १६७ लोकसंख्या कमी पडल्यामुळे मोहोळ नगरपरिषदेमध्ये २१ सदस्य संख्या होवू शकत नाही.

### प्रभाग क्रमांक - १
**लोकसंख्या २४२६**
समाविष्ट परिसर - गायकवाड वस्ती, भोसले वस्ती, शिंपळकर वस्ती, जुना बिटले रोड, गायकवाड वस्ती, पंढरपूर रोड, काळे वस्ती, फडतरे वस्ती, मांडवे वस्ती

### प्रभाग क्रमांक -२
**लोकसंख्या -२७०८**
समाविष्ट परिसर- नवाजनाचा मळा, कुर्डे गल्ली, भांगे वस्ती, गावडे वस्ती, नागनाथ मंदिर, नागनाथ मंगवडा, बाजार मांगवडा, गायकवाड वस्ती, सोनवणे प्लॉटिंग, स्टेशन रोड

### प्रभाग क्रमांक - ३
**लोकसंख्या -२७१७**
समाविष्ट परिसर- नागनाथ तालीम, नागनाथ मंदिर परिसर, नागनाथ गल्ली, उर्दू शाळा, धनगर गल्ली, रोहिदास नगर, चाटे गल्ली, गुमते घाट, ज्योतिबा मंदिर, साळी -माळी गल्ली

### प्रभाग क्रमांक - ४
**लोकसंख्या -३०२६**
समाविष्ट परिसर- स्वामी विवेकानंद शाळा परिसर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मस्जिद, उजनी कॉलनी परिसर, सिमोलंघन पांद रस्ता परिसर

### प्रभाग क्रमांक - ५
**लोकसंख्या ३१३४**
समाविष्ट परिसर- भुसार पेठ, वाणी गल्ली, सराफ पेठ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, सिमोलंघन पांद रोड, सॉ मिल सोलापूर रोड, बुद्धनगर, कन्या प्रशाला शाळा, सिद्धार्थनगर, मच्छी मार्केट परिसर

### प्रभाग क्रमांक - ६
**लोकसंख्या -२५१५**
समाविष्ट परिसर- ब्राह्मण गल्ली, देशमुख गल्ली, आदर्श चौक, कुंभार गल्ली, बागवान चौक, वडार गल्ली, मेहबूबनगर, आदर्श चौक परिसर, महात्मा फुले भाजी मंडई परिसर, चौमुखी मारुती मंदिर परिसर

### प्रभाग क्रमांक - ७
**लोकसंख्या -२६११**
समाविष्ट परिसर- कुरेशी गल्ली, बुधवार पेठ, मार्केट यार्ड, मेन रोड, शिवाजी चौक परिसर, संभाजी चौक परिसर, देशपांडे गल्ली

### प्रभाग क्रमांक - ८
**लोकसंख्या २६५५**
समाविष्ट परिसर- कळसे नगर, दत्तनगर, इंदिरानगर, गुलशन नगर, सोमराय नगर, यशवंत नगर, यमाई नगर, संभाजीनगर

### प्रभाग क्रमांक - ९
**लोकसंख्या -३०८३**
समाविष्ट परिसर-क्रांतीनगर, समर्थ नगर, नाईकवाडी नगर, पटेल नगर, फाटे नगर, गुलमोहर पार्क, साकेत नगर, रचना नगर, वायचळ वस्ती, डोके वस्ती, फडतरे वस्ती

### प्रभाग क्रमांक - १०
**लोकसंख्या -२९५८**
समाविष्ट परिसर- सुभाष नगर, नागनाथ बरे नगर, विद्यानगर, अहिल्यानगर, बागवान नगर, कुंभारखाणी, बालाजी नगर, घरकुल माने वस्ती, गाढवे वस्ती, माने वस्ती, खरात वस्ती, मायक्का मंदिर, कोकणे वस्ती, चंद्रमोळी एमआयडीसी

# सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये दहीहंडी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ ऑगस्ट -**

दहीहंडी भगवान श्रीकृष्णाच्या बालपणीच्या खोडकर आणि गोड आठवणींशी निगडित आहे. लहानपणी कान्हाने मित्रांसोबत केलेल्या खेळाची आठवण, माखन-दही मिळवण्यासाठी मानवी मनोरे रचने, त्याच आठवणी आजच्या दहीहंडी सोहळ्यात जिवंत होतात. अशी हि दही हंडी स्पर्धा सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे जल्लोषात संपन्न झाली.



या स्पर्धेचे उदघाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते व सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत झाले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थिनींमधून तृतीय वर्ष बी.फार्मसी यांनी कमी वेळेत सलामी देऊन दही हंडी फोडण्याचा मान मिळवला तसेच विद्यार्थ्यांमधून द्वितीय वर्ष डी.फार्मसी विद्यार्थ्यांनी दही हंडी फोडण्याचा मान मिळवला. यावेळी ढोल-ताशांच्या गजराने, रंगीबेरंगी वेशभूषा आणि गोविंदा आला रे आला च्या जयघोषाने सह्याद्री परिसर दुमदुमून गेला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी समूह नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेचे सुत्रसंचलन प्रा.पी.एन.बंडगर यांनी केले. हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कॉलेज सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. एन.ए.तांबोळी, प्रा.ए.आर.पवार, विद्यार्थी यांचे योगदान लाभले.

# आ. आवताडे यांनी केली पूरस्थितीची पाहणी

## स्थलांतरीतांना सुविधा द्या; प्रशासनाला सज्ज राहण्याचे आमदार आवताडेंचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ ऑगस्ट -**

उजनी आणि वीर धरणातून भीमा नदीला सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे पंढरपुरात चंद्रभागेला महापूर आला आहे. पावणे दोन लाख क्युसेक वेगाने विसर्ग सुरू असल्याने गुरुवारी पंढरपूर परिसरातील नदीकाठच्या सखल भागात पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारी चंद्रभागा नदीला निर्माण झालेल्या पूर परिस्थितीची पाहणी आमदार समाधान आवताडे यांनी केली.




यावेळी त्यांनी नदीकाठच्या असलेल्या व्यास नारायण आणि अंबिका नगर झोपडपट्टीतील महापुरामुळे उपजिल्हा रुग्णालया समोरील भक्ती निवास येथे स्थलांतरित करण्यात आलेल्या ३०० हून अधिक कुटुंबातील नागरिकांची भेट घेतली.

स्थलांतरित कुटुंबांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊन पूर परिस्थितीचे नियंत्रण करण्यासाठी प्रशासनाला सज्ज राहण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तहसीलदार सचिन लंगुटे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# खुनेश्वर येथे संत ज्ञानेश्वर माऊलींचा जन्मोत्सव उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२१ ऑगस्ट-**

श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त मौजे खूनश्वर (ता.मोहोळ) येथे गावातून माऊलींची पालखीची टाळ -मृदूंग वीणा हाती घेऊन भजन करत गावातून फेरी काढण्यात आली. आणि मंदिरामध्ये भजन करण्यात आले.

मौजे खुनेश्वर (प्रति आळंदी) तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर येथे श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी आहे. आळंदी नंतर संत ज्ञानेश्वर माऊली यांची संजीवन समाधी खुनेश्वर (ता. मोहोळ जि. सोलापूर) येथे आहे असे मानले जाते.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांचे संजीवन समाधी ही सोळाव्या शतकातील आहे त्याची पार्श्वभूमी खूप फार मोठी आहे या माऊली मंदिरामध्ये शेजारील सर्व खेड्यातील पालखी वारकरी एकादशीला दर्शनासाठी येतात.त्या प्रमाणे श्री संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पालखीच्या दर्शनासाठी गावातील सर्व ग्रामस्थ आणि वारकरी संप्रदाय उपस्थित होते. श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या सातशे पन्नासाव्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य सरकारने प्रत्येक गावामध्ये श्री संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या जन्मोत्सव साजरा करावा असे परिपत्रक काढण्यात आलेले होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक गावामध्ये श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करावा असे आवाहन केले होते. श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी प्रति आळंदी खुनेश्वर येथे आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी वारकरी संप्रदाय यांनी दर्शनासाठी यावे असे आवाहन वारकरी संप्रदायाच्या वतीने करण्यात आले.

# सिंहगडमध्ये रेव्हीट फॉर इंजिनीअर्स विषयावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ ऑगस्ट-**

कोर्टी (पंढरपूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात स्थापत्यच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी रेव्हीट फॉर इंजिनीअर्स-टर्निंग आयडियाज इनटु इंटेलिजेंट मॉडेल्स या विषयावर कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी माहिती दिली. कार्यशाळेत कॅडडेस्क पुणेचे संचालक व माजी विद्यार्थी पराग देशमुख यांनी मार्गदर्शन केले. बांधकाम क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक Revit सॉफ्टवेअरची ओळख करून देणे व प्रत्यक्ष कामगिरीसाठी त्यांना सिद्ध करणे हा उद्देश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जागरूकता निर्माण झाली. भविष्यातील करिअरसाठी आवश्यक डिजिटल कौशल्यांची पायाभरणी झाली असल्याचे विभागप्रमुख डॉ. श्रीगणेश कदम यांनी सांगितले. कार्यशाळेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळा प्राचार्य डॉ.करांडे यांच्या प्रकल्पाधारित शिक्षण या संकल्पनेतून विभागप्रमुख डॉ. कदम व अधिष्ठाता डॉ.चेतन पिसे तसेच उपप्राचार्य डॉ.स्वानंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. समन्वयकाचे काम प्रा. गणेश लकडे यांनी केले. प्रा. अमोल कांबळे, प्रा.मिलिंद तोंडसे, प्रा. शेखर पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# साधन केंद्राची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.२१ ऑगस्ट -**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ग्रामीण जीवनोन्नती अभियान व नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत माळशिरस तालुका अभियान कक्षाच्या सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र यशवंतनगर या संस्थेची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बचत गट सभासदांच्या उपस्थितीत खेळीमेळीत संपन्न झाली.

यावेळी प्रमुख उपस्थिती पोलीस सहाय्यक निरीक्षक विक्रम साळुंके, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक मन्सूरअली पटेल, सहाय्यक जिल्हा समन्वयक दिपक टेकाळे, राजकुमार पवार, बँक ऑफ इंडिया शाखा अकलूजचे शाखा व्यवस्थापक सोमगौनी बाला चंद्रुडू, डॉ.अंजली कदम, बँक ऑफ महाराष्ट्र शाखा व्यवस्थापक महेश गव्हाणे, ओमशांती विश्व विद्यालयाच्या ब्रह्मकुमारी अनिता करवा बहेनजी (बार्शी), शिवरात्री बहेनजी (अकलूज), प्रीती बहेनजी, विदर्भ कोकण बँकेच्या दिपाली घाडगे, पोलीस सहायक पांडुरंग जाधव, शाखा व्यवस्थापक उपजीविका विकास सल्लागार उमेश जाधव, हिंदुस्तान फीड्सचे डॉ.दर्शल गावडे,



बालाजी सूर्यवंशी, जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष शारदा चव्हाण, साधन केंद्राच्या अध्यक्ष जयश्री एकतपुरे, सचिव राजश्री जाधव उपस्थित होते.

सभेची सुरुवात दिप प्रज्वलनाने झाली. प्रस्तावीक तसेच सीएमआरसी व्यवस्थापिका तनुजा पाटील-मोहिते यांनी केले. सविता क्षीरसागर, आकाश लोंढे यांनी अहवाल वाचन केले. नवतेजस्विनी महत्त्वकांक्षी प्रकल्पातून केळी रायपनिंग व प्रोसेसिंग युनिट, दूध संकलन केंद्र, मदर पोल्ट्री व परसबागातील कुक्कुटपालन त्याचबरोबर मका प्रोसेसिंग युनिट हे मंजूर असून सदर प्रोजेक्ट अंतिम टप्प्यात उभारण्याचे काम चालू आहे.असे अहवाल वाचनातून संस्थेच्या कामाची माहिती देण्यात आली. सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी टेकाळे यांनी जेंडर ट्रान्स फॉर्मेटिव्ह मेकॅनिझम या प्रोजेक्ट अंतर्गत ग्रासरूट कॅम्पेनिंग फॉर एसीजी वुमन यामध्ये योजनांचा लाभ घेऊ या व प्रगतीचा वेग देऊ याबाबत प्रोजेक्टरवर विविध शासकीय योजनांची माहिती दिली. डॉ.अंजली कदम यांनी महिलांनी घ्यावयाचे आरोग्याची काळजी तसेच दवाखान्यातील शासकीय योजनांच्या सुविधांबद्दल मार्गदर्शन केले. बचत गटातील महिलांना तपासणी ही मोफत असेल असे सांगितले. ब्रह्मकुमारी अनिता करवा बहेनजी यांनी सुखी और स्वस्थ परिवार मे महिलाओं की भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. बँक ऑफ महाराष्ट्राचे महेश गव्हाणे यांनी बचत गटांना सहा कोटी एवढे कर्ज देऊन.त्याची परतफेड १००टक्के असल्याचे सांगितले. जिल्हा समन्वयक अधिकारी पटेल यांनी ३५ टक्के सबसिडीबाबत माहिती सांगितली. पोलीस सहाय्यक निरीक्षक साळुंखे यांनी ही मार्गदर्शन केले.यावेळी महिलांनी लेझीम व मंगळागौरी गाण्यावर नृत्य, टिपरी नृत्य, प्रबोधनपर भारूड, स्वच्छता व आरोग्याचे महत्त्व प्रबोधनपर गीत नृत्यातून सादर केले. जास्त काम केलेल्या सीआरपी करिता कौतुक सोहळा व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये मोना नवगिरे तांबवे, सोनाली जाधव माळेवाडी, आसमा मुजावर, ईश्वर नगर, अश्विनी गिरमे, चौंडेश्वरवाडी, वैशाली माळीनगर बळवंतकर, गौरी माने देशमुख ईश्वर नगर, हिना अल्ताफ पठाण चौंडेश्वर.माळीनगरच्या अध्यक्षा श्रीमती रजनी इनामके यांचा सन्मान करण्यात आला. सर्व कार्यकारी मंडळ,सीआरपी, क्षेत्र समन्वयक वैशाली कांबळे,रिजवाना शेख, मनीषा गवळी,उपजीविका सल्लागार आकाश लोंढे, सीएमआरसी लेखापाल सविता क्षीरसागर, ग्रामसंघ लेखापाल महेश मदने, रुकसाना शेख यांचे सहकार्य लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### सहस्त्रार्जुन बालक मंदिरमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धेत चिमुकल्यांची रंगतदार झलक

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सहस्त्रार्जुन बालक मंदिर या प्री-प्रायमरी शाळेत स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून फॅन्सी ड्रेस स्पर्धा रंगतदारपणे पार पडली. या स्पर्धेत छोट्या चिमुकल्यांनी वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेत कोणी डॉक्टर तर कोणी शूर सैनिक, कोणी स्वच्छतादूत तर कोणी शेतकरी म्हणून सजले होते. पर्यावरण संवर्धन, स्वच्छ भारत अभियान, देशभक्ती तसेच सामाजिक विषयांवरील संदेश देणारे पोशाख परिधान केलेल्या बालकांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. चिमुकल्यांच्या निरागस अभिनयाला पालक व शिक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. या स्पर्धेचे उद्घाटन सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, स्पर्धेचे परीक्षक वंदना आळंगे, सुवर्णा केत आदी उपस्थित होते.सचिव गजानन गोयल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लहान मुलांमध्ये सृजनशीलता, आत्मविश्वास आणि स्वतःला व्यक्त करण्याची क्षमता वाढावी यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अपार आहे. खेळ-गाणी, नाट्य आणि अशा स्पर्धांमुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो.काही पालकांनीही आपले अभिप्राय व्यक्त केले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. छोट्या मुलांच्या सहभागामुळे संपूर्ण शाळा प्रांगणात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.



### पूर्व विभाग दत्त मंदिर येथे दत्त महाराजांची महापूजा

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री तसेच सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते पावर स्टार पवन कल्याण यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त शहरातील पूर्व विभाग दत्त मंदिर येथे दत्त महाराजांची महापूजा संपन्न झाली. ही पूजा माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्या हस्ते पार पडली. गेल्या काही महिन्यांपासून पवन कल्याण फॅन्स असोसिएशन तर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, वाढदिवसाचे औचित्य साधून विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. दत्त महाराजांच्या महाआरती संपन्न झाली. यानंतर पवन कल्याण फॅन्स असोसिएशन तर्फे माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांचा सत्कार करण्यात आला. शेवटी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.त्यानंतर माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांनी अतुल्य सेवा प्रतिष्ठान आणि पवन कल्याण फॅन्स असोसिएशन चे संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. धार्मिक वातावरणात वाढदिवस साजरा करताना भक्तीभाव आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन या सोहळ्यात घडले. यावेळी नरेंद्र बल्ला, रघु शासम, आनंद अवधूत, श्रीनिवास कनकी, पवन गुंडेटी, अनिल कोंडा, रोहन श्रीराम, प्रवीण पोगुल, श्रीनिवास मंतेन, सोमनाथ गोयल, नागराज कटकम, अंबादास गड्डम, श्रीनिवास गरदास श्रीनिवास यन्नम (कामटे ) व इतर पवन कल्याण सर फॅन्सचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आत्महत्या करून तिघांनी संपवले जीवन

## नान्नजला विवाहितेची, जुळे सोलापुरात १७ वर्षांच्या तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

### नरखेडला गोचिड मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

शहर व जिल्ह्यात आत्महत्येचा प्रयत्न करण्याच्या तीन घटना घटना घडल्या आहेत. नान्नज येथील घटनने विवाहितने आत्महत्या केली आहे. दुसऱ्या घटनेत जुळे सोलापूर येथे १७ वर्षांच्या मुलाने गळफास घेऊन आत्म हत्या केली आहे. तिसऱ्या घटनेत गोचिड मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे.



नान्नज येथील घटनेत अज्ञात कारणावरून एका २५ वर्षीय विवाहितेने घरातील पत्र्याच्या छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे बुधवारी (दि. २०) दुपारी चार वाजता उघडकीस आली. सुरेखा सागर साखरे (वय २५) असे त्या मयत विवाहितेचे नाव आहे. बुधवारी दुपारी तिने राहत्या घरात दाराला आतून कडी लावुन स्वतः ला गळफास लावून घेतला. घरात मुलगा रडू लागल्याने घरच्यांनी तिला बाहेरून आवाज दिला. मात्र, दार न उघडल्याने शेवटी घरच्यांनी पत्रावर चढून आत पाहिले तेव्हा गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यानंतर ही बाब सोलापुर तालुका पोलिसांना माहीत करून घरच्यांनी सदरचा मृतदेह नातेवाईकांच्या मदतीने खाली उतरून बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात रात्री सव्वा आठ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मयताच्या पश्चात पती सासू-सासरे व तीन वर्षाचा मुलगा असल्याची माहिती नातेवाईकानी दिली.

जुळे सोलापुरातील एका नगरात राहणा-या १७ वर्षाच्या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपवले. हा प्रकार गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास उघडकीस आला. आदित्य मनोहर काटकर (वय १७, रा. जुळे सोलापूर) असे मुलाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास आदित्य हा त्याच्या राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. हवालदार कांगणे यांनी नातेवाईकांच्या मदतीने त्याला गळफासातून सोडवले. त्यास दुपारी २.२५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

मोहोळ तालुक्यातील नरखेड येथे अज्ञात कारणातून राहत्या घरात गोचिड मारण्याचे औषध प्राशन करून एकाने आत्महत्या केली. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील नरखेड येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडला.धोडिंबा दरेप्पा लोणारी (वय ४३, रा. नरखेड ता मोहोळ) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास धोडिंबा यांनी त्यांच्या नरखेड येथील राहत्या घरी असताना, अज्ञात कारणातून गोचिड मारण्याचे औषध प्राशन केले. यात त्यांना त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून पुतण्या महादेव लोणारे यांनी दुपारी २.५० वाजता शासकीय रुग्णालयात डॉक्टरांच्या सल्ल्याने दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत नोंद झाली आहे.

# अवैध हातभट्ट्या, मद्य विक्री-वाहतुकीवर कारवाई; २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

### राज्य उत्पादन शुल्क विभागाचे १२५ गुन्हे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

शहर-जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाकाच्या मोहिमेत २० लाख ७९ हजार ५२९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १ ते १९ ऑगस्ट २५ या कालावधीतील या मोहिमेत १२५ गुन्हे नोंदवून १०९ जणांवर ॲक्शन घेण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या आदेशानुसार अधीक्षक भाग्यश्री जाधव, प्र. उपअधीक्षक जे. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबवून अवैध दारूविरोधात मोठी कारवाई केली. या मोहिमेत ४२,८४० लिटर गुळमिश्रीत रसायन, २८१२ लिटर हातभट्टी दारू, १४६ बॉटल देशी दारू, ३३ बॉटल विदेशी मद्य, ४७ बॉटल बिअर व ८१७ लिटर ताडी असा एकूण २० लाख ७९ हजार ५२९ रुपयांच्या मुद्देमालाचा समावेश आहे. ही कारवाई निरीक्षक जे. एन. पाटील, ओ. व्ही. घाटगे, दुय्यम निरीक्षक एस. डी. कांबळे, आर. एम. कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, अंजली सरवदे, गडदे, तसेच सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण आणि जवानांच्या संयुक्त पथकाने केली.

#### हॉटेल व धाब्यांवरही धडक कारवाई

एप्रिल ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत हॉटेल व धाब्यांवरही धडक कारवाईत ३५ गुन्हे नोंद झाले असून १३३ जणांवर कारवाई केली. तसेच ५.३६ लाखांचा दंड न्यायालयाकडून वसूल करण्यात आला.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची १०७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या प्रधान कार्यालयाकडील लोकनेते बाबुराव पाटील सभागृहामध्ये बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

सुरवातीस मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शिंदे, यांनी प्रास्ताविक केले. अहवाल सालात मयत झालेले सभासद, सहकार/सामाजिक क्षेत्रातील थोर व्यक्ति, पदाधिकारी व शहीद जवान यांना श्रध्दांजली अर्पण करणेत आली. सभेपुढील सर्व विषय एकमताने मंजूर झाले. याप्रसंगी सभासदांनी सभेपुढे आयत्यावेळचे विषय घेवून ते मंजूर करण्याची मागणी केली. यामध्ये शेती व बिगरशेती थकीत कर्जाच्या परतफेडीसाठी एक रक्कमी परतफेड (ओ.टी.एस.) योजनेस दि.३१.०३.२०२६ पर्यंत मुदतवाढ देणे, प्रशासक कालावधी दोन वर्षाकरिता वाढविणेबाबत शासनास कळविणेबाबत, कलम ८८ अंतर्गत जबाबदारी निश्चित केलेल्या संबंधित संचालकाविरुध्द वसुलीची पुढील कार्यवाही करणेबाबत इत्यादी विषयावर चर्चा होवून ते सर्वानुमते मंजूर करणेत आले.

तसेच सभेप्रसंगी विविध संस्थांच्यावतीने उपस्थित प्रतिनिधीनी विचारलेल्या प्रश्नाला बँकेच्यावतीने बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांनी समर्पक उत्तरे देवून, बँकेने राबविलेल्या विविध उपक्रम, योजना तसेच बँकेच्या सांपत्तिक स्थितीमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा सादर केला. बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त केले. हणमंत भोसले, प्रतिनिधी सरकोली वि.का.से. सह.संस्था लि. सरकोली यांनी संस्थेची थकबाकी वसुल होणेसाठी १०१ ची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी बँकेने सहकार्य करावे. असे म्हणणे मांडले. कमलाकर सोनकांबळे, यांनी शाखा कार्यालयाना रंगरंगोटी करुन शाखेचे व बँकेचे बोर्ड व्यवस्थित करणेबाबत सूचना केली. तसेच त्यांनी बँकेच्या ग्राहकासाठी बैठकीची, पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था करावी. अशी सूचना केली. पंडित भोसले, प्रतिनिधी ओझेवाडी वि.का.से.संस्था यांनी ओझेवाडी, ता. पंढरपूर येथे बँकेची शाखा सुरु करण्याची मागणी केली. त्यानंतर बँकेच्या प्रशासन विभागाचे ज्युनिअर ऑफिसर आबासाहेब भडंगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शेवटी राष्ट्रगीताने सभेचा समारोप करण्यात आला.



# मनोरमा मल्टीस्टेटची वार्षिक सर्वसाधारण सभा 'खेळीमेळीत'

### सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

मनोरमा मल्टी स्टेट को.-ऑप. क्रेडीट सोसायटीची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बेन्नूर नगर येथील मनोरमा भवनात उत्साहात पार पडली. प्रारंभी ज्येष्ठ सभासद, संचालक यांच्या हस्ते दीप्रप्रज्वलन करण्यात आले. सभेच्या सुरुवातीस डॉ. ऋचा मोरे-पाटील यांनी प्रास्ताविक करत सभेला सुरुवात केली. त्यानंतर सीईओ कविता कुलकर्णी व डेप्युटी सी.ई.ओ यांनी क्रमवार विषय वाचन केले.

यावेळी चेअरमन शोभा मोरे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारत सभासद, ठेवीदारांशी संवाद साधत ग्राहकांच्या ठेव सुरक्षेला प्राधान्य हेच मनोरमा मल्टीस्टेटचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन केले. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचे काम मनोरमा मल्टीस्टेट करत आहे. अवघ्या ७२ तासातच ५० टक्के कर्जे ही लघु उद्योगाला देण्याचे ठरवण्यात आले आहे. संस्थेच्या अहवाल सालातील आर्थिक प्रगतीचा आलेख मांडला. संस्थेचे एकूण मिश्र व्यवसाय आजपर्यंत ९८३.०५ कोटी व नफा ४.७० कोटी झाल्याचे सांगून सभासदांना १०% लाभांश देत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे चेअरमन शोभा मोरे यांनी दिली.

यावेळी मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक श्रीकांत मोरे काही यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सभासद, ठेवीदारांशी संवाद साधला. व्हा. चेअरमन शिल्पा कुलकर्णी, कार्याध्यक्षा डॉ. मिताली मोरे, संचालक डॉ.ऋचा मोरे -पाटील, डॉ. मनीषा पाटील, प्रशांत शापुरकर, कमलाकर पुजारी, मधुकर आठवले, पांडुरंग पाटील, मिलिंद भोसले, सीए मैनुद्दिन नदाफ आदी उपस्थित होते. प्रसंगी सीए मैनुद्दिन नदाफ यांचा सत्कार संचालक प्रशांत शहापूरकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संचालक मंडळासह सभासद, खातेदार, अधिकारी, कर्मचारी, मनोरमा परिवारातील सर्व सदस्य मोठ्या संखेने उपस्थित होते. आभार कार्याध्यक्ष डॉ. मिताली मोरे यांनी मानले व वार्षिक सर्वसाधारण सभा हसत खेळत, आनंदी वातावरणात संपन्न झाली.

# बोगस डॉक्टरप्रकरणी अंतरिम अटकपूर्व मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

वैद्यकीय पदवी नसताना डॉक्टर असल्याचा बनाव करून नागरिकांच्या जिवाला धोका पोहोचवल्या प्रकरणी सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात विरेंद्र भालचंद्र जाधव रा.सोलापूर यास मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश (कटारिया सो) यांनी अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

यात हकिकत अशी की, दि. १० ऑगस्ट २५ रोजी अविनाश कांबळे व संदीप वाघमारे यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने व ८ ऑगस्ट रोजी युवा भीमसेना सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या तक्रारी अर्जांवर जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचे प्राधिकृत प्रतिनिधी व जिल्हा बोगस डॉक्टर शोध पथक म्हणुन प्रशासकीय यंत्रणेसह गट विकास अधिकारी राजाराम भोंग,वैद्यकीय अधीक्षक डॉ. लांडगे, श्री. इनामदार आरोग्य सेवक उत्तर सोलापूर असे तेथील पोलीस कर्मचाऱ्यांना सकाळी १०.३० वाजता सोबत घेऊन वडळा येथील महादेव मंदिर येथे गेल्यानंतर असे निदर्शनास आले की, आरोपी विरेंद्र जाधव व कलीम शेख व त्याचे ५ ते ६ सहकारीसह जाहिरात करून शिबीर भरवून रुग्णाची तपासणी करून मेडिसिन देत असल्याचे दिसून आले तसेच काही रूग्णांना डॉक्टरांनी दिलेल्या मेडिसिन चा त्रास होत असल्याचा तक्रारी करीत होते. त्यावेळी ग्राम पंचायत सदस्य व उपसरपंच अनिल माळी यांना बोलावून घेतले. तद्नंतर आरोपी कडे वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ अंतर्गत कलम ३३ व ३३अ तसेच बॉम्बे नरसिंग होम अंतर्गत १९९९ सुधारित २०२१ तसेच महाराष्ट्र वैद्यकीय डिग्री रर्ली १९१२ अन्वये या प्रमाणपत्र बाबत विचारणा केली असता ते काही एक सांगितले नाही व कोणतेही प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत तसेच त्याच्याकडे आलेले रुग्ण हे आपण दिलेल्या मेडिसिनचा आम्हाला त्रास होत असल्याचे





सांगत होते त्यावेळी आरोपीं विरेंद्र जाधव व कलीम शेख यांनी कागदपत्रे सादर करण्यासाठी दोन दिवसाची मुदत द्या असे लेखी अर्ज दिला व त्यांच्या कडून १ नाडी प्लससाठी पावडर व उपचार पत्र वर लक्ष्मी हेल्थ केअर च्या उपचार पत्र ताब्यात घेतले अशा आशयाची फिर्याद जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल केली आहे.सदर गुन्ह्यात अटक होईल ह्या भीतीपोटी आरोपी विरेंद्र भालचंद्र जाधव यांनी अँड. संतोष न्हावकर यांच्यामार्फत मे. न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला आहे.

यात आरोपीतर्फे अँड. संतोष न्हावकर युक्तिवाद करताना आयुष मंत्रालयातर्फे आयर्वेदिक औषध वापराबाबत प्रात्साहन देण्यासाठी हेल्थकेअर प्रोग्राम अंतर्गत आरोपी हा ट्रेडिशनल कम्युनिटी हेल्थकेअर प्रोव्हायडर असल्याने त्याने विनापरवाना काम केले असे म्हणता येणार नाही. तसेच पोलिसांनी ७ वर्षांखालील शिक्षेसाठी आवश्यक असलेली नोटीस आरोपीस दिलेली नाही असा युक्तिवाद केला सदरचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायालयाने आरोपीस अंतरिम अटकपूर्व जामिनावर मुक्त करणेचा आदेश दिला. यात आरोपीतर्फे अँड. संतोष न्हावकर,अँड. राहुल रुपनर, अँड. वामशीकृष्ण गाजूल यांनी तर सरकारतर्फे अँड. प्रकाश जन्नु यांनी काम पाहिले.

# श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयात डॉ. निखिल नवले व डॉ. श्रेय अराध्ये रूजू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

येथील श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयात डॉ. निखिल नवले हे न्युरो फिजिशियन तर डॉ. श्रेय चंद्रकांत अराध्ये, एमबीबीएस एम डी (मेडिसिन) यांची फिजिशियन तज्ञ म्हणून रुजू झाले आहेत.

डॉ. नवले यांनी एम. डी. जनरल मेडिसीन अर्मेड फोर्स मेडिकल कॉलेज पुणे येथून प्राप्त केली. त्यांचे न्यूरोलॉजीचे उच्च शिक्षण हे नामांकित अशा एन. एच. इन्सुट्युशन न्युरोसायन्स, बंगलोर येथून प्राप्त केली. येथे झाले. ब्रेन स्ट्रोक, अर्धांगवायू, अपस्मार/ झटके, मेंदू ज्वर, कंपवाल, स्मृती ब्रश, म्यास्थेनिया ग्रविस आदी आजारांचे विशेष तज्ञ आहेत. मागील पाच वर्षापासून सोलापूरमधील विविध न्युरो व मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सेवा देत आहे. रुग्णालयात सोमवार ते शनिवार दररोज सायंकाळी ५ ते ६:३० या वेळेत ते उपलब्ध असतील.

डॉ. अराध्ये यांनी आपले एमबीबीएस शिक्षण डॉ. पं. देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज अमरावती येथे पूर्ण केले. ही





महाराष्ट्रातील सर्वात जुनी आणि प्रतिष्ठित वैद्यकीय संस्था आहे. त्यानंतर त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस भुवनेश्वर येथे एमडी जनरल मेडिसिन पदवी संपादन केली. ही संस्था २५०० हून अधिक खाटांची क्षमता असलेली व भारतातील सर्वोच्च एनआयआरएफ टॉप २५ वैद्यकीय संस्थांमध्ये समाविष्ट असलेली एक नामांकित शैक्षणिक रुग्णालय आहे. डॉ. अराध्ये यांना नेफ्रोलॉजी, कार्डिओलॉजी, एंडोक्राइनोलॉजी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, न्यूरोलॉजी, हेमेंटॉलॉजी-ऑन्कोलॉजी आणि रुमेटॉलॉजी या सुपरस्पेशलिटी क्षेत्रांमध्ये उत्तम अनुभव आहे. त्यांनी बाह्यरुग्ण विभागातील विविध आजारांचे निदान व उपचार करण्याबरोबरच, रुग्णांच्या भरती व्यवस्थापनापासून ते गंभीर आयसीयू उपचारापर्यंत महत्त्वपूर्ण काम केले आहे. क्लिनिकल कार्यासोबतच, डॉ. अराध्ये हे एका नामांकित वैद्यकीय महाविद्यालयातील आंतररुग्ण विभागातील सहायक प्राध्यापक म्हणून कार्यन आहेत व वैद्यकीय शिक्षणात सातत्याने योगदान देत आहेत. याशिवाय, त्यांनी फ्लोरिडा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी हॉस्पिटल, मियामी, फ्लोरिडा येथे केलेल्या कार्यकाळात अमेरिकन वैद्यकीय पद्धतींचा मौल्यवान अनुभव घेतला आहे. आंतरिक वैद्यकशास्त्र क्षेत्रातील अनेक संशोधन लेखन प्रकाशनांद्वारे त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. रुग्णालयात सोमवार ते शनिवार दररोज दुपारी १:०० ते ३:०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. गरजू रुग्णांनी दोन्ही तज्ञ डॉक्टरांच्या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालयाने केले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## लोकमंगल पतसंस्थेच्या कोर्टी शाखेचा शुभारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
माजी सहकार मंत्री तथा दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या लोकमंगल पतसंस्थेच्या ७० व्या कोर्टी तालुका करमाळा शाखेचा शुभारंभ जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक भर्तरीनाथ अभंग यांचे शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी कोर्टी गावचे सरपंच श्रीराम मेहेर, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण, वाशिंबे गावचे उपसरपंच अमोल पवार, सामाजिक कार्यकर्ते सुभाष अभंग आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी सतिश लोंढे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर मांडला. यावेळी भर्तरीनाथ अभंग, श्रीराम मेहेर यांनी पतसंस्थेच्या प्रगतीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागीय अधिकारी रमण परदेशी, शाखाधिकारी संदीप शिंदे, सतीश बोडरे, विनोद कुरणे, यशवंत लोंढे आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## महत्वाचे...



### सांगोल्यातील तळेवाडीत १५ वर्षाच्या मुलाला मारहाण


**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
सांगोला तालुक्यातील तळेवाडीत १५ वर्षाच्या मुलाला तलावाच्या कारणातून मारहाण करण्यात आली. ही मारहाण बुधवारी रात्री ७.३० च्या सुमारास झाली. यात अजित पवारसह तिघांविरूध्द तक्रार देण्यात आली आहे.ओम संदिप धायगोडे (वय १५, रा. चिकमहुद ता सांगोला) असे मारहाण झालेल्या मुलाचे नाव आहे. सांगोला तालुक्यात तळेवाडी शिवार आहे. या शिवारात असताना तलावाच्या कारणातून ओम यास अजित पवार, रावसाहेब पवार व इतर एक यांनी लोखंडी रॉड व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात त्याच्या डाव्या हाताला जखम झाल्याने सांगोला येथील सरकारी रुग्णालयात उपचार केले. तेथून सचिन खरात याने मध्यरात्री २.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### खाटावरून पडल्याने बेशुध्द होऊन एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
झोपी गेलेल्या व्यक्तीचा खाटावरून पडल्याने बेशुध्द होऊन मृत्यू झाला. हा प्रकार बुधवारी रात्री ९.३० च्या सुमारास घडला. केतन भिमाशंकर बंगरगी (वय ५७, रा. प्रसाद नगर, जुळे सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. केतन हे बुधवारी रात्री नेहमीप्रमाणे घरातील खाटेवर झोपी गेले होते. मध्यरात्रीच्या सुमारास अचानक ते खाटावरून खाली पडले. त्यात त्यांची शुध्द हरपल्याने त्यांना मुलगा मोहित याने रात्री १.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### वडिलांच्या घरात दागिने चोरणाऱ्या मुलीविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
वडिलांच्या घरी असलेल्या लोखंडी कपाटातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम सोडणाऱ्या मुलीविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत संतोष मोहन भांगे वय ४५ राहणार बल्लारी चाळ देगाव रोड सोलापूर यांच्या फिर्यादीवरून साक्षी संतोष भांगे वय १९ राहणार खूसगाव तालुका तासगाव जिल्हा सांगली हिच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष भांगे यांची साक्षी ही मुलगी असून ३१ जुलै रोजी साक्षी हिने संतोष यांच्या घरातील देवघरात अडकवलेली चावी घेऊन घरातील लोखंडी कपाट उघडले या कपाटात असलेले संतोष यांच्या पत्नीचे सात ग्रॅम चे सोन्याचे कानातील टॉप्स व रोग रक्कम असा ९० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला म्हणून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.



### रिक्षाच्या धडकेने एक जखमी

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
रिक्षा भरधाव चालवून एकाच जोरदार धडक देऊन गुडघा फ्रॅक्चर करणाऱ्या विरुद्ध एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.)याबाबत हरिनाथ पोशट्टी कटला राहणार मराठी शाळा श्रमजीवी नगर सोलापूर यांच्या फिर्यादीवरून अज्ञात रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे हरिनाथ कटला आहे सात ऑगस्ट रोजी एमआयडीसी पाणी टाकी जवळून सायकल वरून कारखान्याकडे जात होते त्यावेळी अज्ञात रिक्षाचालकाने त्याच्या ताब्यातील रिक्षा क्रमांक १३ इ एफ २२ ६१ ही निष्काळजीपणे चालवून कटला यांच्या सायकल ला पाठीमागून जोरदार धडक दिली या अपघातात कटला यांच्या उजव्या पायाच्या गुडघा फ्रॅक्चर झाला आहे त्यामुळे याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला पोलीस हवालदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.

## व्हिजेएनटी कल्याण विभागाच्या जिल्ह्यातील आश्रमशाळा बोगस अन् कागदावरच!

- विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा निष्कर्ष
- ३ महिन्यात सुधारणा नाही झाल्यास शाळांवर कारवाई
- समिती अध्यक्ष आ. सुहास कादे यांच्यासह समिती सदस्यांचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
गेल्या चार दिवसापासून सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्ह्यातील इतर मागास व्हिजे एनटी कल्याण विभागाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या सर्व आश्रम शाळेचा आढावा घेतला. या पाहणीत आणि तपासणीत समितीला अनेक गंभीर चुका आढळलेल्या असून, या सर्वच शाळा बोगस व कागदावरच्या असून गोरगरिबांच्या हक्काचा पैसा या खात्यातील अधिकारी, कर्मचारी यांच्या संगत मतांनी संस्था चालकांनी लाटला आहे. असा गंभीर आरोप करत यात सुधारणा नाही झाली तर येत्या ३ महिन्यात या सर्व आश्रम शाळांवर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा समितीचे अध्यक्ष आ. सुहास कांदे, आ. अमोल मिटकरी, आ. स्वामी यांच्यासह सर्व समितीच्या सदस्यांनी आज (दि. २१) आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिला.

दोन महिन्यापूर्वी शासनाकडून ही समिती गठित केली होती. अधिवेशन संपल्यानंतर या समितीने सर्वप्रथम सोलापूर जिल्ह्याचा दौरा आखला. पहिल्याच जिल्ह्यात त्यांच्या तपासणीत अनेक आश्रम शाळा बोगस असल्याचे दिसून आले. जिल्ह्यातील ९७ आश्रम शाळेतील २२ हजार विद्यार्थ्यांचे हे भयाण वास्तव ,भटक्या विमुक्तांच्या मुलाबद्दलची संस्था चालकाची अनास्था, शिक्षणाबद्दलची उदासीनता, मिळणारे अनुदान आणि त्यातून मुला मुलींना देण्यात येणाऱ्या सुविधा याबद्दल समितीच्या सदस्यांनी तीव्र संताप व नाराजी व्यक्त केली आहे .

या सर्व शाळेतील वास्तव पाहून अतिशय दुःख झाले असल्याची भावना आमदार सदस्यांनी यावेळी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केली. पोषण आहार, शैक्षणिक सुविधा, यात संस्था चालकांनी मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार केला आहे; असा आरोप करत या संस्थांना आम्ही सोडणार नाही. मंत्रालयात या प्रकरणात आश्रम शाळा संस्थाचालक, या खात्याचे अधिकारी, कर्मचाऱ्यांची साक्ष काढू असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यामुळे जिल्ह्यातील संस्थाचालकामध्ये एकच खळबळ उडाली आहे. जिल्ह्यातील तांडा सुधार योजनेचा निधीही इतरत्र वापरला गेला तर रस्त्याच्या कामाकरिता शिष्यवृत्तीच्या निधीचा वापर झाला असल्याचे हे वास्तव सदस्यांनी यावेळी पत्रकारांना सांगितले. याचीही चौकशी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी जात पडताळणीकडून प्रमाणपत्र काढले नाही त्यांनी काढून घ्यावे अन्यथा त्यांच्यावरही कारवाईचा बडगा उगारणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

**मुख्याध्यापक अन् काही शिक्षकांवर निलंबनाचे काढले आदेश**

समितीने गेल्या चार दिवसात अक्कलकोट, मंगळवेढा, पंढरपूर आदी तालुक्यातील आश्रमशाळा भेटी दिल्या. या ठिकाणी गंभीर बाबी आढळून आल्या. कोन्हाळी येथील मुख्याध्यापकाचे निलंबन करण्याचे आदेश दिले तर या आश्रम शाळेची मान्यता रद्द करण्याचे आदेश काढले. हीच अवस्था बालाजी नगर मंगळवेढा येथील आश्रम शाळेची सुद्धा असल्याचे सांगण्यात आले. येथील चार शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश काढले आहेत. या शाळेचा मुख्याध्यापक तर एका मोठ्या राजकीय शिक्षक संघटनेचा पदाधिकारी असल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले असल्याचेही आमदार कादे यांनी यावेळी सांगितले.

**शाळांत संस्थाचालकांचे नातेवाईकच**
आश्रम शाळा म्हणजे संस्थाचालकांना एक प्रकारे चरण्याचे कुरण आहे. या अविर्भावात संस्थाचालकांनी वर्षानुवर्ष अनुदानातून आपली घरे भरलेले आहेत. एवढेच नव्हे तर संस्थाचालकांचे नातेवाईक हेच या आश्रम शाळेत शिक्षक, क्लार्क, शिपाई म्हणून रुजू असल्याचे आढळले याबद्दल नाराजी व्यक्त करीत समितीने चौकशीचे आदेश दिले आहेत.

**ज्या शाळांत शिक्षक अडाणी; तिथे विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे होणार?**
अनेक आश्रमशाळेत बोगस शिक्षक भरती झाली आहे. शिक्षकांची गुणवत्ता पाहता संताप आला. काही शिक्षकांना संविधानाबद्दल प्रश्न विचारला असता त्यांना सांगता आला नाही जिथे शिक्षकच अडाणी आहेत तिथे विद्यार्थी कसे शिकणार? असा प्रश्न यावेळी पत्रकार परिषदेत आमदार सदस्यांनी उपस्थित केला.

**शासनाच्या निधीवर संस्थाचालकांचाच डल्ला**
वर्षाकाठी कोट्यवधीचा निधी सोलापूर जिल्ह्यातील आश्रम शाळांसाठी येतो परंतु त्याचा वापर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. निम्म्यापेक्षा अधिक निधी हा संस्थाचालक गिळंकृत करतात. त्यामुळे अशा संस्थांची चौकशी तर होणारच आहे. परंतु या प्रकरणातील अधिकारी कर्मचाऱ्यांवरही कारवाईचा बडगा निश्चित असेल. संस्थाचालकांना समिती पांघरून घालणार नाही आणि आम्ही पापाचा धनी होणार नाही असे यावेळी उपस्थित समिती सदस्यांनी पत्रकारांना सांगितले.


(छायाचित्र : केवल तिवारी)
सोलापूर : बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर बैलांची जोडी खरेदी करताना टिळक चौक परिसरात टिपलेले छायाचित्र.



## तिसऱ्या दिवशीही आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन

- मागण्या मान्य झाल्याशिवाय कामावर न येण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
जिल्हा परिषदेच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नियमित सेवेत समायोजनबाबत राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी बुधवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केला आहे. तिसऱ्या दिवशीही कर्मचार्यांचे आंदोलन सुरूच असल्याने आरोग्य विभागावर रूग्णांचा ताण पडत आहे.

राज्य शासनाने आरोग्य विभागात राष्ट्रीय ग्रामीण व शहरी आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. ही योजना सुरू केल्यापासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेत कायम करण्याबाबत १४ मार्च २०२४ निर्णय घेण्यात आला आहे. पण अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. या निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता मंगळवार दि. १९ ऑगस्टपासून राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलनाबाबत निवेदन दिला होता. त्यानुसार या कर्मचाऱ्यांनी बुधवारपासून आंदोलनाला सुरुवात केली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पदावर काम करीत आहोत. १४ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी यांना नियमित सेवेत समावेशन करणेसाठी शासननिर्णय निर्गमित झाला आहे. सव्वा वर्षे कालावधी होवूनही अंमलबजावणी होत नसलेने तसेच मानधनवाढ, बोनस, भविष्य निर्वाह निधी कपात, विमा, बदली धोरण मान्य होत नसलेने आरोग्य मंत्र्यांची भेट घेण्यात आली होती. आरोग्यमंत्र्यांनी संघटना शिष्टमंडळास समायोजन प्रक्रिया व विविध मागण्यांबाबत आश्वासन दिले होते. पण या आश्वासनाची पुर्तता न झाल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रअंतर्गत लसिकरण सत्रासह इतर सर्व कामे, विविध अहवाल तसेच ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपाची सर्व कामे बंद पडली आहेत. काम बंद आंदोलनात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी बुधवारी सकाळी जिल्हा परिषदेच्या पुनम गेटसमोर निदर्शने केली. मागण्या मान्य केल्याशिवाय कामावर न येण्याचा इशारा दिला आहे.

## कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षाला व्हिजेएनटी पथकाचा दणका

**बालाजी नगर आश्रम शाळेतील मुख्याध्यापकासह चार शिक्षकांची वेतनवाढ रोखली..!**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**
मंगळवेढा तालुक्यातील बालाजी नगर येथील प्राथमिक , माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रम शाळेत विद्यार्थ्यांच्या पोषण आहार निकृष्ट दर्जाचा आढळून आल्याने शाळेचे मुख्याध्यापक तिरूपती पवार व चार शिक्षकांच्या निलंबनाच्या कारवाईसह वेतनवाढ रोखण्याची शिफारस व्हिजेएनटी समितीच्या सदस्यांनी केली. संस्थेवर प्रशासकीय मंडळ नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली आहे, अशी माहिती दिली.

राज्य व्हिजेएनटी समिती मंगळवारपासून सोलापूर दौऱ्यावर आहे. समितीच्या सदस्यांनी मंगळवेढा तालुक्यातील बालाजी नगर येथील प्राथमिक आश्रम शाळा, माध्यमिक आश्रम शाळा आणि उच्च माध्यमिक आश्रम शाळेत विद्यार्थ्यांच्या पोषण आहार निकृष्ट दर्जाचा आढळून आल्याने शाळेचे मुख्याध्यापक यांच्यावर निलंबनाची शिफारस समितीच्या सदस्यांनी केली. या शाळेचे मुख्याध्यापक हे राज्य आश्रम शाळा कर्मचारी संघटनेचे राज्याचे अध्यक्ष आहेत. तरीही त्यांच्यावर समितीच्या सदस्यांनी कारवाईची शिफारस केल्याने समितीचे कौतुक होत आहे.

दुसऱ्या दिवशी बुधवारी विभागून जिल्ह्याचा दौरा केला. आमदार प्रवीण स्वामी आणि अमोल मिटकरी यांनी पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात आश्रम शाळेसह तांडा वस्ती सुधार योजनेतील कामांचा दर्जा सुमार असल्याचेही आढळून आल्याचे आमदार स्वामी यांनी सांगितले.

## सोलापूरचा भावी महापौर कसा असावा?

- भावी नगरसेवक कसा असावा? खुल्या निबंध, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांची माहिती





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने, शहरातील नागरिकांच्या कल्पना, अपेक्षा आणि सूचनांना दिशा देण्यासाठी खुल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या स्पर्धेमागे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांची संकल्पना आहे. निबंध स्पर्धेसाठी सोलापूरचा भावी महापौर कसा असावा?, भावी नगरसेवक कसा असावा?, महानगरपालिका कशी असावी?, महापालिकेकडून अपेक्षित सेवा-सुविधा, शहरातील परिवहन खाते व्यवस्था, शहरातील पाण्याचे नियोजन, स्मार्ट सोलापूर सिटी माझी कल्पना हे विषय आहेत. कोणत्याही एका विषयावर निबंध देता येणार आहे. खुला गट फक्त १८ वर्षावरील नागरिकांसाठी, शब्द मर्यादा ५०० ते १ हजार शब्द, स्पर्धेचा दि. २४ ऑगस्ट २०२५, सकाळी ११ ते दुपारी १ वाजता, ठिकाण: मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, डफरिन चौक, सोलापूर येथे होणार आहे. वक्तृत्व स्पर्धेसाठी भावी महापौर - सोलापूरचे स्वप्न, माझ्या कल्पनेतील आदर्श महानगरपालिका, भावी नगरसेवक लोकप्रतिनिधी की लोकसेवक?, शहरातील परिवहन खाते व्यवस्था, शहरातील पाण्याचे नियोजन, स्मार्ट सोलापूर सिटी - संकल्प ते वास्तव असे विषय आहेत. यासाठी गट खुला : फक्त १८ वर्षावरील नागरिकांसाठी, वेळेची मर्यादा : ३ ते ५ मिनिटे, स्पर्धेची तारीख : ३१ ऑगस्ट २०२५, सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजता, ठिकाण : लोकमान्य टिळक सभागृह (ॲफी थिएटर), हिराचंद नेमचंद वाचनालय, सरस्वती चौक, सोलापूर येथे होणार आहे.

या निबंध व वक्तृत्व स्पर्धेसाठी स्वतंत्र बक्षीसे आहेत. प्रथम - ११ हजार रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र, द्वितीय ७ हजार रुपये,ट्रॉफी व प्रमाणपत्र, तृतीय ५ हजार रुपये ट्रॉफी व प्रमाणपत्र तसेच प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रवेश विनामूल्य आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी सोशल मीडिया विभाग प्रमुख शक्ती कटकधोंड (मोबाईल नंबर ९८२२८ २२८५२), शहर सरचिटणीस रामप्रसाद शागालोलू (७८७५७ ४३६१७) संपर्क साधवा. 'स्मार्ट सोलापूर' ही संकल्पना केवळ कल्पनेपुरती न राहता, ती कृतीत उतरावी यासाठीच ही स्पर्धा नागरिकांसमोर ठेवली आहे. तरी जास्तीत जास्त स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घ्यावा, असे आवाहन शहराध्यक्ष खरटमल यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस चंद्रकांत पवार, नुरोद्दीन मुल्ला, निशांत सावळे, प्रविण वाडे , सुजित खरटमल,, डॉ. प्रतीक्षा चव्हाण, सूर्यकांत शेरखाने, रामप्रसाद शागालोलू आदी उपस्थित होते.



## पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास अडचण

**राष्ट्रवादीने दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील २५० ते ३०० शेतकऱ्यांचे पीक विम्याचे पैसे सन २०२४/२५ पासून अद्यापही शेतकऱ्यांच्या खातेवर जमा झाले नाहीत. तांत्रिक बिघाडामुळे हे पैसे संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर पडत नाहीत. यामुळे हा तांत्रिक बिघाड काढून शेतकऱ्यांना पैसे मिळवून द्यावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने (शरद पवार गट) जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या वेबसाईटवर काही तांत्रिक अडचण दाखवत असल्याचे निदर्शनास आले आहे. यावेळी राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बळीराम साठे, तालुकाध्यक्ष प्रल्हाद काशीद, मनोज क्षीरसागर, उपसरपंच रमेश सुतार, नागेश पवार, ग्रामपंचायत सदस्य भैरवनाथ हावळे, शेतकरी तानाजी करंडे, सुधाकर सिरसट, शुभम शिंदे, महादेव करंडे, सत्यजित भडोळे, किशोर करंडे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कर्मच सुख-दुःखाला कारण आहे हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

मानवी जीवन ही सुख-दुःखाच्या अखंड प्रवासाची कहाणी आहे. क्षणोक्षणी या द्वंद्वांचा अनुभव घ्यावा लागतो. सत्कर्मामुळे सुखाची अनुभूती मिळते तर दुष्कर्मामुळे दुःख भोगावे लागते. परंतु हे द्वंद्व कधीही थांबत नाही. सुख आलं की दुःख त्यामागोमाग येतं आणि दुःख ओसरलं की पुन्हा सुखाची चाहूल लागते. या सततच्या ओघातून मुक्ती मिळवायची असेल तर एकमेव उपाय म्हणजे आत्म ज्ञान. हेच गूढ सत्य पूजनीय श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज यांनी ''श्रीमद्भागवत कथा चिंतन'' या विषयावर निरुपण करताना श्रोत्यांसमोर स्पष्ट केले.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २७

प्रपंचातील विषयांमधून जे सुख भासतं ते क्षणभंगुर असतं. ते मिळालं की क्षणभर समाधान मिळतं, पण लगेच त्यामागे रिक्ततेची जाणीव मनाला कुरतडू लागते. म्हणूनच विषयसुख हे स्वरुपतः दुःखरुपच आहे. या उलट भगवंताचं चिंतन, नामस्मरण आणि आत्म स्वरुपाच्या अनुभवातून जो आनंद प्रकटतो, तो शाश्वत असतो. हा आनंद ब्रह्मसुख होय. जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य म्हणजेच अखंड, चिरंतन, अव्याहत असे ब्रह्मसुख. उपनिषदांत ज्याचा उल्लेख ''आनंदो ब्रह्मेति व्यजानात'' असा आढळतो, तो हाच परमानंद!

परंतु आजच्या युगातील मानव विषयसुखालाच खरे सुख समजतो. इंद्रियभोगांची क्षणिक तृप्तीच त्याला आनंदाचे स्वरुप वाटते. हीच जीवाची अज्ञानावस्था आहे आणि हे अज्ञान दूर करण्याचा मार्ग म्हणजे सत्संग, संतवाङ्मयाचे चिंतन आणि विशेषतः भागवत श्रवण होय, असे प्रतिपादन महाराज यावेळी करतात.

पुढे डॉ. जयवंत महाराज विशद करताना बोलतात की, भागवतातील विदुर व मैत्रेय यांचा गंगातीरावर झालेला संवाद हेच या तात्त्विक विषयाचे एक सुंदर उदाहरण आहे. भगवान श्रीकृष्णांनीच विदुराला हे ज्ञान देण्याची आज्ञा दिल्यामुळे मैत्रेय मुनी या गहन तत्त्वज्ञानाचे सविस्तर निरुपण करतात. त्या संवादातून पुढे सृष्टीनिर्मितीचा विचार उलगडतो. भगवान या सृष्टीची निर्मिती करतात, परंतु ती आपल्या मायाशक्तीद्वारे घडवतात.

माया ही अनिर्वचनीय आहे; ती ना पूर्ण सत्य, ना पूर्ण असत्य. ती या दोन्हींपलीकडे असलेली अद्भुत शक्ती आहे. म्हणूनच या जगाला मिथ्या असे म्हटले जाते. जग दिसते खरे, पण आहे मात्र अवास्तव; त्याचे अस्तित्व केवळ मायेच्या आच्छादनामुळे भासते. याची जाणीव करुन देण्यासाठी महाराजांनी ''रज्जू-सर्प'' या दृष्टांताचा आधार घेतला. अंधारात पडलेली दोरी सर्प भासते, पण प्रकाश पडताच तो भ्रम नाहीसा होतो; त्याचप्रमाणे आत्मज्ञानाचा प्रकाश पडताच जगाचा मिथ्यात्वभाव उलगडतो.

सत्राच्या उत्तरार्धात डॉ.जयवंत महाराज मार्मिकपणे सांगतात की, सुख-दुःखाच्या द्वंद्वातून सुटका हवी असेल, तर विषयसुखाचा त्याग करुन भगवंताच्या चिंतनाकडे वळणे अत्यावश्यक आहे. आत्मज्ञानानेच शाश्वत आनंदाचा अनुभव येतो आणि याच संदर्भाने, पुढील सत्रामध्ये सृष्टीच्या रचनेचा क्रम आणि त्यामागील दैवी रहस्य याचे सविस्तर वर्णन पुढे केले जाणार आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस, शिवरात्री, बृहस्पती पूजन, गुरुपुष्यामृत |
| दि. २२ ऑगस्ट २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८२ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसु | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - श्रावण | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. त्रयोदशी (१२.४४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वर्षा | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - पुष्य (२४.०८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - व्यतिपात (१६.१३) | |
| करण - विष्टि (२४.१६) | |

# अनुदानित रासायनिक खत विक्रीसाठी बायोमेट्रिक मशीन अनिवार्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

डीबीटी प्रकल्पांतर्गत प्रणालीवर नोंदणीकृत अनुदानित रासायनिक खत विक्रेत्यांनी नवीन एल-१ बायोमेट्रिक मशिन बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यान्वित करणे बंधनकारक असल्याचे आवाहन कृषि विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. केंद्रिय खत विभागाच्या निर्देशानुसारच्या मानकांनुसार अधिक सुरक्षित एल-१ मशिनचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

विद्यमान सुरक्षा प्रमाणपत्र असलेल्या फिंगरप्रिंट स्कॅनरच्या जागी एल-१ प्रमाणित मशिन वापरण्याचे आदेश मुख्य खत पुरवठादार व इतर कंपन्यांना देण्यात आले आहेत.वितरण व कार्यान्वयन कृषि आयुक्तालयाने जिल्हानिहाय विक्रेत्यांची यादी तयार करून उत्पादक कंपन्यांना एल-१ मशिन पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या विक्रेत्यांनी अद्याप नवीन मशिन प्राप्त केलेली नाही, त्यांनी ती तात्काळ घेऊन २० ऑगस्टपूर्वी कार्यान्वित करावी. अन्यथा, जुनी मशिन वापरणाऱ्या विक्रेत्यांना खत खरेदी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

### मशिन मोफत उपलब्ध

नवीन एल-१ मशिन खत कंपन्यांकडून मोफत दिली जाणार असून, खत विक्रीची नोंद प्रणालीमध्ये रिअल टाइममध्ये होणे आवश्यक असून, ई-पॉसवरील साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळल्यास परवाना रद्द करण्याची कारवाई होऊ शकते. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालय किंवा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोलापूर-विजयपूर महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

## टोल भरूनही खराब रस्त्यांमुळे वाहनचालकांना सहन करावे लागतोय त्रास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सोलापूर विजयपूर महामार्गावरील हत्तूर ते टाकळीपर्यंत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असून टोल व्यवस्थापनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. या महामार्गावर नांदणी गावाजवळ टोलनाका असून खराब रस्त्यांवरून प्रवास करूनही टोल द्यावे लागत असल्याने वाहनचालकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोल व्यवस्थापनावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### सुलतानी पध्दतीने टोल वसूल

महामार्ग नवीन बनविण्यात आल्याने कंपनीकडून सुलतानी पध्दतीने टोल वसूल करण्यात येत आहे. रस्ता टोल वसूली योग्य नसताना टोल घेण्यात येऊ नये. पावसाळ्यात खड्ड्यांमुळे वाहने चालविताना कसरत करावी लागत आहे. यामुळे अनेक वेळा अपघातही होत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोल कंपनीवर कारवाइ करावे .

**-राजेंद्र कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्ते, हत्तूर**



तीन वर्षापूर्वी सोलापूर-विजयपूर महामार्ग बनविण्यात आला. यावेळी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांकडून रस्त्याच्या निकृष्ट कामाबद्दल तक्रार करण्यात आली. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्याकडे दुर्लक्ष करून रस्ता बनविला. त्यामुळे निकृष्ट रस्त्याचा वाहन चालकांना वारंवार त्रास सहन करावे लागत आहे. सोलापूर विजयपूर महामार्गावरील २० किलोमीटर अंतरावरील रस्त्यावर शेकडो खड्डे पडले आहेत. पावसामुळे खड्डे दिसत नसल्याने वाहनचालकांना वाहने चालविताना कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वारांना खड्ड्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. हत्तूरपासून टाकळीपर्यंतच्या वीस किलोमीटर अंतरावर वारंवार दुरूस्ती करूनही खड्ड्यांचे प्रमाण कमी होत नसल्याने वाहनधारकांनी खराब रस्त्यासाठी टोल का द्यावा, टोल वसूल करणाऱ्या कंपनीकडून रस्ता दुरूस्ती होइपर्यंत टोल बंद करावा, अशी वाहनधारकांमधुन मागणी करण्यात येत आहे.

# एस.टी. महामंडळात शिकाऊ उमेदवारांकरीता ३२० जागांची भरती

## ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभागात सन २०२५-२०२६ करीता आय. टी. आय. उत्तीर्ण उमेदवारांसाठी एकूण ३२० जागेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.



पात्र उमेदवारांनी सदर ३२० जागेकरीता apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावे. अर्ज सादर करणेचा अंतिम दि ३१ ऑगस्ट २०२५ असा आहे. कागदपत्र तपासणीचा दि. ०१ सप्टेंबर २०२५ असा आहे. याबाबत अधिक माहितीकरीता विभागीय कार्यालय, जी. एम. चौक, बुधवार पेठ, सोलापूर ४१३३००२ येथे संपर्क साधणेबाबत अमोल चं. गोंजारी, विभाग नियंत्रक, सोलापूर यांनी कळविले आहे.



# विश्व हिंदू परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त सुधाकर महाराज इंगळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

विश्व हिंदू परिषदेच्या ६१ वर्धापन दिनानिमित्त श्रीराम जन्मभूमी येथील बाबरी ढाचा पाडताना जे कार सेवक होते त्यांचा विश्व हिंदू परिषद, सोलापूर जिल्ह्याच्या वतीने श्री.श्री.श्री.१००८ डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी श्री काशी पीठ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कारसेवक म्हणून ह.भ.प.सुधाकर महाराज इंगळे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व कारसेवक, वारकरी भाविक उपस्थित होते.

# 'ईश्वररूप आई' आईची विविध रूपं प्रकट करणारा ग्रंथ : दत्ता गायकवाड

## समता, साहित्य, नाट्य अकादमीतर्फे 'पुस्तक परिसंवाद'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सोलापूर आई हीच खरी निर्माती आहे. जगाचा पसारा आईच्या ममतेवरच सुरळीत चालू आहे. आई करुणेचा सागर, मायेचे मंदिर, त्यागाचे भांडार आहे. महापुरुषांना घडविणाऱ्या माताच होत्या आणि सामान्य मुलांनाही घडविणाऱ्या माताच आहेत. आईची विविध रूपे प्रकट करणारा हा 'ईश्वररूप आई' ग्रंथ आहे, असे प्रतिपादन दत्ता गायकवाड यांनी केले.

समता साहित्य नाट्य व कला अकादमी आयोजित रंगभवन चौक येथील समाजकल्याण सभागृहात सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी पुस्तक परिसंवादात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रा.डॉ. संजय लांडगे लिखित 'ईश्वररूप आई' या पुस्तकावर परिसंवाद झाला. यावेळी मंचावर प्रा.डॉ. भिमाशंकर बिराजदार, वंदना कुलकर्णी, डॉ. किर्तीपाल गायकवाड, प्रमोद लांडगे, डॉ. संजय लांडगे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. सुरुवातीला ज्येष्ठ कवी प्रमोद लांडगे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर लेखकाचे मनोगतात प्रा.डॉ. संजय लांडगे म्हणाले, आईने जसा महापुरुषांना जन्म दिला गौतमबुद्ध, येशूप्रभू, महावीर, महमंद पैगंबर हे युगपुरुष ठरले. तसा आईने हिटलर, ओसामा, चार्ल्स शोभराज अशा क्रूमकर्म्यांना ही जन्म दिला. ते क्रूरकर्मा झाले. अशा कितीतरी संत, महंत, समाजसुधारक क्रांतीकारी या सर्वांना जन्म देणारी आईच आहे. हे वेगळेपण या पुस्तकात दिसून येते. ही आई प्रातिनिधिक स्वरूपातून व्यक्त झाली आहे. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. भिमाशंकर बिराजदार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी केले. प्रा. विकास शिंगे यांच्या आभार मानले. यावेळी प्रा.डॉ. डी. आर. गायकवाड, यु. एफ. जानराव, अंकुश सातपुते, प्राचार्य शिरीष भोसले हे उपस्थित होते.



# 'हिंगुलांबिका'चा आयुष दीपक दंतकाळे चित्रकला स्पर्धेत प्रथम

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

साखर पेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील आयुष दीपक दंतकाळे या विद्यार्थ्याने चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविला आहे.स्वकुळ साळी समाज जिव्हेश्वर मंडळ यांच्यावतीने निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता चौथीचा विद्यार्थी आयुष दीपक दंतकाळे याने इयत्ता चौथीच्या गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. या विद्यार्थ्यास रेवती क्षीरसागर व अश्विन संगवे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्था व मुख्याध्यापकांचे वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



# बुर्ला महाविद्यालयात सदभावना दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए आर बुर्ला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सदभावना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्यावेळी प्रा. डॉ. शंकर राजे, कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना प्रा.डॉ. शिवानंद भांजे, प्रा.डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा डॉ.टी. व्ही. शिंदे, प्रा. डॉ. रंजना बनसोडे, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. डॉ. दर्याप्पा बताले, प्रा. विजयकुमार मुलगे, प्रा. महादेव गायकवाड, प्रा. मनोज वाघमारे, प्रा. उमाशंकर नादर्गी, प्रा. सुहास गायकवाड, प्रा. करुणा राऊत, प्रा. निर्मला करे, प्रा. संपदा जिंदम, प्रा. यमुना द्यावनपल्ली, प्रा. वृषाली रेड्डी, प्रा. अमिता जावळे, प्रा. अमोल गुरव व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक सहाय्य करा

## संभाजी ब्रिगेडची शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सध्या पाऊस चालू असून, सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे ते अडचणीत आले आहेत. त्यामुळे शासनाने तात्काळ शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसानीचे पंचनामे न करता सरसकट नुकसान भरपाई म्हणून मदत तात्काळ द्यावी, अशी निवेदनाद्वारे मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे



गेल्या काही दिवसांमध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. संपुर्ण जिल्ह्यात पावसाने थैमान घातलेले आहे. सोलापूर मध्ये तर पाऊस हा मागील काही आठवड्यापासून सतत चालू असल्याने नदी नाले हे ओसंडून वाहत आहेत व त्या पाण्यामुळे व आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे सततच्या पावसामुळे शेतामध्ये सतत पाणी साचून राहिल्याने हंगामी पिकासह सोयाबीन, उडीद, मूग अधिक खरीप पिकांचे त्याचबरोबर ऊस फळबागांचे हे भरपूर प्रमाणात नुकसान झालेले आहे.

आधीच राज्यांमध्ये आर्थिक अडचणीमुळे हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत; त्यातच निसर्गाचा कोप झाला आहे. यामुळे सोलापूर जिल्हा हा ओला दुष्काळी जिल्हा म्हणून जाहीर करून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान याचे लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी. त्याचबरोबर पिक विम्याचे ई पोर्टल हे बंद असल्याने शेतकऱ्यांना फोटो अपलोड करताना ही अडचणी येत आहेत त्यामुळे पीक विम्याचे ई पोर्टल लवकरात लवकर चालू व्हावे व शेतकऱ्यांना पीक विम्याचेही पैसे लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी आपण स्वतः यात लक्ष घालून शासन स्तरावर योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, जिल्हा संघटिका सुनीता कोळी, शहर उपाध्यक्ष माधुरी चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप निंबाळकर, शहर उपाध्यक्ष फिरोज शेख, शहर कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख, शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे आदी उपस्थित होते.

# शिक्षक अभियोग्यता परिषद परीक्षेत सावळा गोंधळ

## परीक्षेतील कमी गुणामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचा आक्रोश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

राज्यात तिसरी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमापन चाचणी परीक्षा पार पाडली. यावेळी ही परीक्षा घाई गडबडीत घेण्यात आली तसेच परीक्षेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरेही जावे लागले. त्यांना कमी मार्क मिळाले पण काही विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाचासुद्धा गंध नव्हता. त्यांना अपेक्षापेक्षा जास्त गुण मिळाल्यामुळे त्या उमेदवारांना स्वतःहून आश्चर्य वाटत आहे. परीक्षा परिषदेवर विद्यार्थ्यांचा विश्वास उडाला आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेचा निकाल लावण्यास विलंब झाला. १८७ विद्यार्थ्यांना ० मार्क पडल्याने विद्यार्थी आश्चर्य व्यक्त करीत आहेत. शुभदा बागूल या विद्यार्थिनीने १९९ प्रश्न सोडवले तरी शून्य मार्क मिळाले. याच विद्यार्थीनीला २०२२च्या टेट परीक्षेत १०३ मार्क मिळाले होते. आता अधिक अभ्यासपूर्ण परीक्षा देऊनही ० मार्क कसे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याबाबत पुरावे घेऊन लवकरच कोर्टात जाऊ, असा इशारा विद्यार्थी प्रतिनिधींनी दिला आहे.

### चौकशी करून अंतिम यादी जाहीर करावी

शासनाने लवकर गुणवत्ता व निवड यादी जाहीर करावी. काही उमेदवारांना मार्क कमी जास्त झाले आहेत, अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे. याची सखोल चौकशी करून अंतिम यादी जाहीर करण्यात यावी. प्रामाणिक उमेदवारांवर अन्याय होऊ नये हीच अपेक्षा आहे.

**-प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष, पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटना**

### आशा पल्लवित झाली होती

२०२२ पेक्षा या वेळी कमी मार्क कसे काय पडले? याविषयी आश्चर्य वाटत आहे. यावेळी अभ्यास करून सुद्धा मार्क जास्त मिळेल अशी अपेक्षा होती. जास्त मार्क मिळवून पवित्र पोर्टलमार्फत नोकरी मिळेल, अशी आशा पल्लवित झाली होती. प्रत्यक्ष निकाल हाती आल्यानंतर धक्काच बसला

**-अमोल किशोर कट्टी, परीक्षार्थी**

टेटचा निकाल सोमवारी जाहीर झाला. त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांना मागील परीक्षेवेळी जेवढे गुण मिळाले तेवढेच गुण यावेळीही मिळाले आहेत. काही विद्यार्थ्यांना सन २०२२ मध्ये झालेल्या परीक्षेत ४२ गुण मिळाले होते. त्या विद्यार्थ्यांस या परीक्षेत १४८ गुण मिळाले आहेत. तर काही विद्यार्थ्यांचे गुण मागील परीक्षेपेक्षाही मोठ्या संख्येने कमी झाले आहेत. त्यामुळे परीक्षेत घोळ असल्याचा आरोप भावी शिक्षकांतून होत आहे. परीक्षेचा निकाल लावण्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने तीन महिन्यांचा कालावधी लावला. त्यामुळे या काळात बराच घोळ झाल्याचा दावा भावी शिक्षकांतून होत आहे. ज्यांचा अभ्यास नाही त्यांना जास्त गुण आणि अभ्यास करणाऱ्या उमेदवारांना कमी गुण मिळाले याविषयी विद्यार्थ्यांना मध्ये संभ्रम आहे.

# सुनील कटकधोंड यांची कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती

## धाराशिव जिल्हा परिषदेत बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

जिल्हा परिषदेचे उप कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांची धाराशिव जिल्हा परिषदेत कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नतीने बदली झाली आहे.



सोलापूर जिल्हा परिषदेत ते उप कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते. उप अभियंता पदवीधर (स्थापत्य) या पदावरून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर त्यांची बदली झाली आहे. त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी अभिनंदन केले आहे.

सुनील कटकधोंड यांनी उप अभियंता या पदावर असताना ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून देखील पदभार सांभाळला आहे. तसेच कार्यकारी अभियंता बांधकाम क्र. १ , कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान या पदावर दिर्घकाळ पदभार सांभाळून काम केले आहे. अनेक शाळा खोल्यांची कामे त्यांनी पुर्ण केली आहेत. दिर्घकाळ प्रशानातील अनुभवामुळे सोलापूर जिल्हा परिषदेस त्यांच्या सेवेचा उपयोग झाला आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नजचे सुपुत्र असलेले कटकधोंड यांना पदोन्नतीने कार्यकारी अभियंता या पदावर नियुक्ती झालेमुळे अभियंता संवर्गाबरोबर विविध संघटनांनी तसेच कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# यंदा 'लोकनेते' ४० टक्के ऊस हार्वेस्टरने तोडणार

## हार्वेस्टर खरेदीसाठी १४ युवकांना दिले साडेचार कोटींचे बिगरव्याजी कर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ/वाळूज, दि.२१ ऑगस्ट -**

मोहोळ तालुक्यातील अनगर येथील लोकनेते साखर कारखान्याने यंदाच्या ऊस गळीत हंगामात नऊ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. ४० टक्के ऊस यंत्राने तोडण्यात येणार आहे. यासाठी मागील हंगामातील ऊसतोडणी यंत्र १० तर नवीन १४ असे एकूण २४ हार्वेस्टरद्वारे ऊस तोडणी केली जाणार आहे. कारखान्याने गव्हाण मशिनरी अद्यावत करण्याबरोबर दोन ट्रिप्लर देखील बसवले आहेत. यंदाच्या वर्षी चाळीस टक्के ऊस यांत्रिक म्हणजे हार्वेस्टर मशीनने आणण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यास पुढच्या वर्षी तो पन्नास टक्क्यावर नेण्यात येईल. या प्रयोगाचा सर्वाधिक फायदा ऊस उत्पादकांना होणारा असून यामुळे ऊस वेळेत कारखान्यास येऊन उत्पादकांना मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी दिली.



ते म्हणाले की, ऊस तोडणी कामगारांच्या समस्येबाबत राज्यातील काही कारखान्यांना भेटी देऊन १०० टक्के हार्वेस्टरवरच चालणाऱ्या कारखान्यांच्या कार्यपद्धतीचा आम्ही अभ्यास केला. त्यामधील लातूर जिल्ह्यातील मांजरा कारखान्याचा प्रामुख्याने समावेश आहे. साखर कारखाना क्षेत्रात दिवसेंदिवस ऊस तोडणी कामगारांचा प्रश्न जटिल बनत आहे. टोळ्यांकडून होणारी फसवणूक त्याचबरोबर मुकादमांकडून ऊस वाहतूकदारांची पिळवणूक या बाबी राज्यभर निदर्शनास येत आहे.ऊस तोडताना तो चांगला असो व नसो शेतकऱ्यांना पैसे मागण्याची वृत्ती वरचेवर वाढत आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांची ऊस लागवडीची मानसिकता यावर परिणाम होत आहे.मजुरांचा तुटवडा जाणवत आहे.ऊस तोडणी कामगार अपेक्षित प्रमाणात आणि वेळेत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा ऊस पक्व होऊनही वेळेत कारखान्यास आणण्यासाठी मर्यादा पडत होत्या. त्यामुळे ऊस तोडून गाळपासाठी कारखान्याला आणणे व शेतकऱ्यांनी तो पाठवणे ही प्रक्रिया वरचेवर अवघड होत चालली आहे.

ऊस तोडणीसाठी ट्रॅक्टर, ट्रक मालकाकडून लाखो रुपयाची उचल घेणे व टोळ्या देतो,अशी आश्वासने देऊन कारखान्याची कोट्यवधींची फसवणूक होत आहे.

### १४ युवकांना हार्वेस्टरयंत्र खरेदीसाठी दिले कर्ज



मांजरा सहकारी साखर कारखान्याला मी भेट देऊन तेथील ऊसतोडणी यंत्रणेची पाहणी केली या कारखान्यात १०० टक्के ऊस यंत्राद्वारे तोडून आणतात. त्याच पार्श्वभूमीवर प्रायोगिक तत्त्वावर यावर्षी यंत्राने ऊस तोडला जाणार आहे. त्यामुळे लोकनेते कारखान्याने यंदाच्या वर्षी तालुक्यातील १४ युवकांना ऊस तोडणी यंत्र खरेदी करण्यासाठी कारखान्याने प्रत्येकी ३० लाख रुपये बेरोजगारास बिगर व्याजी देण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे १४ ऊस तोडणी मशीन खरेदीसाठी कारखान्याकडून ४ कोटी ३० लाख रुपये बिगर व्याजी वाटप करण्यात आले आहे त्यामधून ऊस तोडणी मशीन खरेदीसाठी प्रोत्साहन दिले आहे, हा एक अभिनव प्रयोग आहे हा हंगाम यशस्वी झाला तर यापेक्षाही आधुनिक तंत्रज्ञानाची यंत्रे वाढविण्यात येणार आहेत.

**- बाळराजे पाटील, चेअरमन, लोकनेते शुगर,अनगर ता. मोहोळ.**

## महत्वाचे...



### महाराष्ट्र विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा उत्साहात संपन्न

**बार्शी, दि.२१ ऑगस्ट-**

येथील महाराष्ट्र विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संदीप मोरे व रेश्मा भोसले उपस्थित होते. प्रथम छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के. डी. धावणे यांनी केले. याप्रसंगी बोलताना त्यांनी विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून पर्यवेक्षक एस.सी. महामुनी यांनी मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी संदीप मोरे व रेश्मा भोसले यांनीही विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात पालकांनी आपले प्रश्न व आपले विचार व्यक्त केले. यावर विद्यालयाकडून पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. पालकांनी संस्थेने व शाळेने सुरु केलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक केले व काही सूचनाही केल्या. आपल्या पाल्याच्या बौद्धिक व शारीरिक सर्वांगीण विकासासाठी पालकांनी जास्तीत जास्त वेळ दिला पाहिजे, तरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल, असे मत श्री. शितोळे यांनी व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापिका के. डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी.साठे, सर्व पालक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. के.जी. मदने यांनी सुत्रसंचालन केले. पर्यवेक्षिका एन.बी.साठे यांनी आभार मानले.




### जि.प. शाळा, कोन्हाळी येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**अक्कलकोट, दि. २१ ऑगस्ट-**

जि.प. शाळा, कोन्हाळी येथे ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सरपंच चिदानंद उन्नद होते. उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र कानबसे, माजी सरपंच रमेश बनसोडे, गावातील मान्यवर व पालक उपस्थित होते.गावात प्रभातफेरी काढण्यात आली. शाळेत कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांची भाषणे आणि मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. विशेष उपक्रमांतर्गत श्रीशैल बनसोडे (कृष्णा ग्रीन) चे मालक यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या बॅग दिल्या. श्रीशैल सुलगुडले व त्यांच्या मित्रांनी वही व पेन वाटप केले. सरपंच उन्नद यांनी लाडू, कुरकुरे व चॉकलेट दिले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कनबसे यांनी बिस्किटे व चॉकलेट दिले. मुख्याध्यापकांनी सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### राज्य आदर्श शिक्षक व जिल्हा उपक्रमशील शाळा पुरस्कार:प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**बार्शी, दि. २१ ऑगस्ट-**

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी ही एक शासन नोंदणीकृत संस्था असून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. संस्थेच्यावतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शिक्षक आणि उपक्रमशील शाळांचा सन्मान शिक्षक दिनानिमित्त दरवर्षी केला जातो. याही वर्षी ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि जिल्हास्तरीय आदर्श उपक्रमशील शाळा पुरस्कार देण्यात येणार आहेत. सदर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शासन मान्यता प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यातील जिल्हास्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कारासाठी शासन मान्यता प्राप्त शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव ऑफलाइन आणि ऑनलाईन पीडीएफ स्वरुपामध्ये सादर करता येणार आहेत. हे प्रस्ताव दि.२० सप्टेंबरपर्यंत सादर करावेत. हा पुरस्कार सोहळा दि. २८ सप्टेंबर रोजी माऊली लॉन्स, रेल्वे स्टेशन रोड बार्शी येथे संपन्न होणार आहे. अध्यक्ष राहुल वाणी मो.नं. ९४२३०८७०२० व सदस्य प्रा. डॉ.चंद्रकांत उलभगत मो. नं.९८५०४८७७४० शिक्षक व शाळांनी प्रस्ताव पाठवण्यासाठी वरील दोन मोबाईल नंबरवर संपर्क साधून वेळेत प्रस्ताव पाठवावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

### विजयस्तंभ बचाव समिती जिल्हा प्रभारीपदी प्रा. रजपूत

**कुर्डूवाडी, दि.२१ ऑगस्ट-**



कोरेगांव भीमा विजयस्तंभ बचाव समितीच्या जिल्हा प्रभारीपदी कुर्डूवाडी येथील प्रा. आशिष रजपूत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बचाव समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी ही नियुक्ती केली. प्रशासकीय व न्यायालयीन लढा प्रत्येक गावात, शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात व राष्ट्रीय पातळीवर जनजागृती करण्यासाठी व हा लढा समाजभिमुख व्हावा म्हणून जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. प्रा. डॉ. रजपूत हे विद्यापीठाचे इतिहास संशोधन मंडळ सदस्य आहेत. तेसेच रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य आहेत. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे कार्य मोठे आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढ्यात ते मागील अनेक दिवसांपासून सहभागी आहेत.

## जकापूर येथे बँक अधिकाऱ्यांनी केली जनजागृती

### विविध योजनांची दिली माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २१ ऑगस्ट -**

वित्तीय सेवार्थ विभागाच्या वतीने बँक ऑफ महाराष्ट्रने दत्तक घेतलेल्या जकापूर (ता.अक्कलकोट) येथे जनसुरक्षा कॅम्पअंतर्गत बँक अधिकाऱ्यांनी विविध योजनांची माहिती देत जनजागृती केली.

या वेळी उपक्षेत्रीय प्रबंधक सुजीत कुमार यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व अटल पेन्शन योजना या योजनांची माहिती देत नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या उपमहाव्यवस्थापक गीता नायर यांनी सांगितले की, आर्थिक समावेशनासाठी १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत पूर्ण व्याप्ती मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत २.७० लाख ग्रामीण व शहरी स्थानिक संस्थांमार्फत केवायसी पडताळणी, प्रधानमंत्री जनधन खाते उघडणे, PMJJBY, PMSBY PY अंतर्गत नोंदणी तसेच डिजिटल फसवणूक प्रतिबंध व दावा न केलेल्या ठेवींबाबत जनजागृती यांसारखे उपक्रम राबवले जाणार आहेत. यावेळी प्रतीकात्मक स्वरूपात बचत गट व पीककर्ज लाभार्थ्यांना मंजुरीपत्रे देण्यात आली. या कार्यक्रमाला RBI LDO अक्षय गोंडेवार, लीड डिस्ट्रिक्ट मॅनेजर राम वाखरडे, RSETI संचालक दीपक वडिवळे, अक्कलकोट शाखा व्यवस्थापक किरण कुमार, FI नोडल ऑफिसर वैभव घाडगे तसेच इतर शाखा व्यवस्थापक उपस्थित होते. या कॅम्पसाठी गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रफुल्ल बिराजदार यांनी केले. वेणूगोपाल यांनी आभार मानले.






## बैल पोळ्यावर पावसाचे सावट; व्यापारी अन् शेतकरी चिंताग्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २१ ऑगस्ट-**

शेतकऱ्यांच्या दृष्टीने श्रावण महिन्यातील महत्त्वाचा सण म्हणजे पिठोरी अमावस्येचा बैलपोळा होय. शेतीसाठी मदत करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण आहे. परंतु यंदा या बैलपोळ्यावर पावसाचे सावट असल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे.

दरवर्षी शेतकऱ्याला शेती कामांमध्ये मदत करणाऱ्या बैलाविषयी आदर भाव दाखवत बैलपोळा साजरा केला जातो. गाय, बैल, म्हैस यांची पोळ्याच्या आदल्या दिवशी खांदेमळणी केली जाते तर पोळ्याच्या दिवशी बैलांना सजवले जाते. त्यासाठी कंड्डे, गोंडे, बेगड, घंटी, झूली, शेंदूर, पिवळी यांचा साज चढवला जातो. बैलपोळा या दिवशी बैलांना श्रमापासून विश्रांती दिली जाते. बैलांना कोणतेच काम यादिवशी दिले जात नाही. ढोल, ताशाच्या गजरात गावामधून सवाद्य मिरवणुक काढली जाते. पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. गेल्या अनेक वर्षापासून कमी-अधिक असणारा पाऊस, दुष्काळ, नापीकी, रासायनिक खतांचा वाढता वापर, पिकांच्या उत्पादन खर्चात झालेली वाढ, न मिळणारा हमीभाव, अशा अनेक कारणामुळे शेती वरचेवर तोट्याची झाली असल्याने बळीराजा ही खचला आहे. त्यामुळे बैलपोळ्याच्या उत्सवावर विरजण पडते आहे. त्याचबरोबर अलीकडे आधुनिक पद्धतीने शेती केली जात असल्याने शेतामध्ये बैलांचा वापर सर्रास कमी झाला आहे. बैल आणि बैलगाडीची जागा ट्रॅक्टरने घेतल्याने बैलांचे महत्त्व कमी झाल्याचे दिसत आहे. असे जरी असले तरी प्राचीन कृषी प्रधान संस्कृती असणाऱ्या भारतामध्ये बैल पोळ्याचे महत्त्व आजही तितकेच असल्याचे दिसून येते. बैलाच्या सणावर पावसाचे संकट असल्यामुळे शेतकऱ्यांना बैलांना सजवता, नटवता येणार की नाही तसेच पावसामुळे त्यांची मिरवणूक ही काढता येते की नाही अशी शंका बळीराजाच्या मनात आहे.

यंदा चांगला पाऊस झाल्याने पिके ही जोमात आल्याने बैलांसाठी लागणारा साज कंडे, गोंडे, कलर, बेगड, घंटी, गळ्यातील माळा चांगल्या प्रकारे विक्री होईल असे वाटत असताना बैलपोळा सणातच पावसाची रिपरिप लागून राहिल्याने बैलपोळा साहित्याची म्हणावी अशी विक्री झाली नाही.

**- येडाप्पा मगर, दुकानदार**



यंदा चांगला पाऊस झाल्याने पोळा दमदार करायचा असे ठरवले होते. मात्र गेल्या १५ दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसाने पिकात व शेतात पाणी झाल्याने पुन्हा चिंता वाढली आहे.

**- तात्यासो पवार, शेतकरी, तडवळे.**

## कुर्डूवाडीत आता नो डॉल्बी नो डीजे

### उपविभागीय पोलीस अधिकारी अंजली कृष्णन यांचे सुतोवाच

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२१ ऑगस्ट-**

येथील शहरात अनेक कार्यक्रमांमध्ये डॉल्बी व डीजेच्या आवाजाचा दणदणाट ऐकायला मिळतो यामुळे अनेकांना याचा त्रास होतो यापुढे शहरांमध्ये नो डॉल्बी नो डीजे धोरण अवलंबले जाईल असे उदगार करमाळा विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी अंजली कृष्णन यांनी काढले.

कुर्डूवाडी पोलीस ठाण्या अंतर्गत गणपती उत्सव व ईद एक मिलाद सणाच्या पार्श्वभूमी वरती कुर्डूवाडी नगरपालिका येथील भिसे सभागृहा मध्ये शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली यावेळी अंजली कृष्णा व कुर्डूवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल मोहिते यांनी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना तसेच सदस्यांना मार्गदर्शन करताना



सांगितले की डीजे व डॉल्बी याला उच्च न्यायालयाने बंदी घातलेली आहे असे असताना जर कोणी डीजे व डॉल्बी शहर व परिसरात भविष्यात कुठल्याही कार्यक्रमाला लावला तरी त्यांच्यावर निश्चित कारवाई करण्यात येईल .

डीजे मुळे अनेकांना हृदयाचे आजार होतात त्यामुळे बहिरेपण येते तसेच लेझर लाईट मुळे अनेकांचे डोळे गेलेले आहेत . गणपती मंडळाने रीतसर परवानगी घेऊनच गणपती बसवावा आगमन व विसर्जन मार्ग ठरवून दिलेला आहे त्यावरूनच सर्वांनी गेले पाहिजे गणपती पुढे जातीय तेढ निर्माण करणारे देखावे सादर करू नयेत पावसाळी दिवसा मुळे गणपती छतावर चांगले आच्छादन करावे तसेच प्रत्येक मंडळाने एक तरी सीसीटीव्ही कॅमेरा बसवावा असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे अभियंता विजयसिंह परबत भाजपचे उमेश पाटील वाहेद शेख कुमार भेंडाळे श्याम पाटील अभिजीत सोलंकर आगार व्यवस्थापक रत्नाकर लाड वीज मंडळाचे सुरज गायकवाड संतोष शेंडे पालिका बांधकाम विभागाचे अक्षय खटके व चोभे पोलीस विभागाचे फौजदार स्वामीनाथ लोंढे पोलीस रविराज जाधव किशोर तळेकर शिवाजी भोसले नवनाथ बोराडे सह सर्व गावातील पोलीस पाटील तसेच गणपती मंडळाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## नशा नाही, शिक्षण हाच खरा श्रृंगार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ ऑगस्ट -**

येथील उमा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि पंढरपूर शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अमली पदार्थ विरोधी जनजागृती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भरत वाघे होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांचे सेवन करू नये. जर कोणी अंमली पदार्थांचे सेवन करताना सापडला तर त्याला सजा व आर्थिक दंड भरावा लागतो. व्यसनामुळे आरोग्य नाश पावते. कौटुंबिक जीवन उध्वस्त होते आणि व्यक्तिमत्व अधःपतनाला जाते. त्यामुळे व्यसनमुक्त समाज निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. तुम्हा तरुणांचा नशा नाही तर शिक्षण हाच खरा शृंगार आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामाबाबत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाज प्रबोधन व्हावे. व्यसनाच्या अंधकारातून समाजाला बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी नेहमी सजग व सक्रिय राहावे व स्वतः अमली पदार्थांच्या सेवनापासून दूर राहावे असे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे सेवन करू नये म्हणून शपथ देण्यात आली.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.अविनाश देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.सिंधू खिलारे यांनी केले तर आभार प्रा.समाधान भगरे यांनी मानले.

## मंद्रूपच्या नविन पाणीपुरवठा योजनेचा बार फुसकाच; नळ अद्याप कोरडेच

### १५ ऑगस्टचा मुहूर्त टळला, मंद्रूपकरांची होतेय फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट ..**



मंद्रुपकरांना १५ ऑगस्ट २०२५ पासून नवीन पाणीपुरवठा योजनेतून दररोज ७० लिटर शुद्ध पाणी मिळणार अशी घोषणा करून मंद्रूप ग्रामपंचायत प्रशासनाने व सत्ताधारी गटाने मोठा गाजावाजा केला.आता नळाला पाणी येणार असा डंका पिटला. यामुळे गावकऱ्यांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सत्ताधारी गटाने या घोषणेवरून स्वतःची पोळी भाजून घेतली. काही ग्रामपंचायत सदस्यांनी व नेत्यांनी पाण्याची टाकी भरत असल्याचे व्हिडिओ शूट करून स्वतःच्या व्हॉट्सअॅप स्टेटसवर टाकले, तर काहींनी ते ग्रुपवर शेअर करत गावकऱ्यांना पाण्याचे स्वातंत्र्य मिळणारच असा डांगोरा पिटला. पण प्रत्यक्षात १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन कार्यक्रम व ध्वजारोहण झाले, मात्र मंद्रूपच्या नळांना पाण्याचा थेंबही आला नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीचा भरलेला बार फुसकाच ठरला आहे. पाणीपुरवठा सुरू होणार ही घोषणा हवेतच विरली आहे. गावकरी मात्र सत्ताधाऱ्यांच्या आश्वासनाला पुरते फसल्याचे चित्र आहे.

### महिन्यातून एकदा पाणी

पंधरा कोटी निधी खर्च करून नवीन पाणीपुरवठा योजना अस्तित्वात आणली. त्यासाठी सात वर्षे प्रतीक्षा करावी लागली. योजना पूर्ण झाल्याचा गाजावाजा करण्यात येत असला तरी अद्याप मंद्रुपकरांना महिन्यातून एकदा नळाला पाणी मिळते. त्यामुळे पाणीटंचाईपासून मंद्रुपकरांना स्वातंत्र्य मिळालेच नाही.

**- सुरेश स्वामी, नागरीक, मंद्रुप.**

ग्रामपंचायतीने उघडपणे जनतेची दिशाभूल केली आहे. पाणीपुरवठ्यावरून तुम्ही किती दिवस केवळ राजकारण करणार? सामान्य नागरिकांची फसवणूक करून तुम्ही जनभावनेशी खेळलात. मंद्रूपची जनता तुम्हाला माफ करणार नाही. म्हणूनच तुम्ही तात्काळ ग्रामस्थांची जाहीर माफी मागावी, अन्यथा पदाचा राजीनामा द्यावा.

**- प्रा. उमाशंकर राऊत, पॅनलप्रमुख, जनक्रांती परीवर्तन गट.**

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पेट्रोल पंपांवर सीएनजी सुविधा उपलब्ध करा

### खासदार मोहिते-पाटील यांचे केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांना निवेदन

**अकलूज, दि.२१ ऑगस्ट-**

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंह पुरी यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी फलटण कृषी उत्पन्न बाजार समिती (PMC) अंतर्गत चालणाऱ्या फलटण तालुक्यातील तरडगाव, बरड, वाखरी, भाडळी येथील पेट्रोल पंपांवर(HPCL) CNG सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यासंदर्भात बीपीसीएल (BPCL) क्षेत्रीय व्यवस्थापक, सांगली यांना आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती केंद्रीय पेट्रोलियम मंत्री पुरी यांच्याकडे खासदार मोहिते-पाटील यांनी केली. यावेळी फलटण कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भगवानराव होळकर, संचालक अक्षय गायकवाड, शरद लोखंडे व सचिव शंकरराव सोनवलकर उपस्थित होते.



www.tarunbharat.org

सोलापूर तरुण भारत

# पंढरपुरात पूर स्थिती; मंदिर समितीकडून फुड पॅकेट

## मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकरांचा पुढाकार; नदीपात्रात बोट व जीवरक्षकांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२१ ऑगस्ट -**

वीर आणि उजनी धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सोडण्यात आल्याने चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. प्रशासनाकडून चंद्रभागा नदी काठच्या नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले.



स्थलांतरीत नागरिकांना श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीमार्फत फुड पॅकेट वाटप करण्यात येत आहेत. तसेच चंद्रभागा नदीपात्रात जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. सद्यस्थितीत, पंढरपूर शहर व परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. चंद्रभागा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्याने स्थानिक प्रशासनामार्फत अनेक घरे स्थलांतरित करण्यात आली आहेत. सध्या उद्भवलेली पूरजन्य परिस्थिती हटवण्यासाठी व बचाव कार्य करण्यासाठी तसेच मानवतावादी भूमिकेतून व सामाजिक उत्तरदायित्व म्हणून मंदिरे समिती मार्फत बाधित कुटुंबियांना फुड पॅकेट वाटप करण्यात आली. त्यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत व विभाग प्रमुख विनोद पाटील उपस्थित होते. याशिवाय, चंद्रभागा नदीपात्रात भाविकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने जीवरक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच स्थानिक प्रशासनामार्फत बोट उपलब्ध करून देण्यात आली असून, या बोटीस मंदिर समिती मार्फत इंधन व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात असल्याची माहिती प्रभारी कार्यकारी अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

## महत्त्वाचे




### पंढरपूर इस्कॉन मध्ये श्री कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

**सुस्ते, दि.२१ ऑगस्ट-**

श्री कृष्ण जन्माष्टमी सोहळा म्हणजे जगभर उत्साह, तसेच पंढरपूर तिर्थक्षेत्र काशीच्या नगरीत श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिर स्थापित होऊन अनेक वर्षे झाली. प्रत्येक वर्षी पंढरपूर श्री श्री राधा पंढरीनाथ (इस्कॉन) मंदिर मध्ये श्री कृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. सदर सालाबादप्रमाणे याहीवर्षी मंदिरामध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवून, सांस्कृतिक, रांगोळी, चित्रकला, स्पर्धा घेऊन मोठ्या प्रमणात उत्सव साजरा करण्यात आला. या उत्साह सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी आसपास गावातील अनेक नागरिकांनी सहभाग घेऊन आनंद लुटला. सर्व जनतेतून इतर वर्षी पेक्षा -२०२५-वर्षीची श्री कृष्ण जन्माष्टमी उत्साहाची झाली. अशी चर्चा सर्वत्र रंगताना दिसत होती. या उत्सहासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी व भक्तांनी गर्दी केली होती. लहान मुलांच्या कलागुणान प्राधान्य दिले असल्याने अनेकांची मण प्रसन्न झाले. कार्यक्रमाचे नियोजन श्री श्री राधा पंढरीनाथ (इस्कॉन) मंदिरातील सर्व प्रभुजी व भक्तांनी तसेच सर्वांच्या सहकार्याने नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य व नियोजन तसेच श्री कृष्ण जन्माष्टमी उत्साहाची गर्दी पाहून नागरिकांनी व भक्तांनी पंढरपूर इस्कॉनचे भरभरून कौतुक केले. यावेळी अध्यक्ष प्रल्हादास, उपाध्यक्ष धनुर्धर अर्जून दास, मुख्य पुजारी महाविष्णुदास यांच्या उपस्थित होते.



### अंमली पदार्थविरोधात वेळापुरात मॅरेथॉन स्पर्धा; ३०० तरुणांचा सहभाग

**वेळापूर, दि.२१ ऑगस्ट-**

अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने ५ कि.मी. अंतराची मॅरेथॉन स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. पंढरपूर-पुणे पालखी मार्गावर धावणाऱ्या या स्पर्धेत लक्ष करिअर अकॅडमीसह पोलीस स्टेशन हद्दीतील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. सकाळच्या वातावरणात धावणाऱ्या शेकडो तरुणाईने 'व्यसनमुक्त समाज' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीतून हातभार लावला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरस पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दिंडोरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधताना व्यसनाच्या विळख्यातून होणारे दुष्परिणाम स्पष्ट केले. व्यसन व अंमली पदार्थ हे केवळ शरीर नासवतात असे नाही, तर मनोधैर्य खच्ची करून समाजातील नातीसंबंधही उद्ध्वस्त करतात. तरुणाई ही देशाचे भविष्य आहे. या वयात व्यसनापासून दूर राहून शिक्षण, क्रीडा, कला व सकारात्मक कार्यात स्वतःला झोकून दिल्यास उज्ज्वल भविष्य घडते. निरोगी शरीर, स्वच्छ मन आणि कष्टशील वृत्ती हीच खरी संपत्ती आहे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. अकलुज पोलीस स्टेशनचे सपोनि चौधरी, सपोनि खारगे, वेळापूर सपोनि भाऊसाहेब गोसावी, वेळापूर पो.उपनिरीक्षक आकाश शेळके यांच्यासह स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.२५० ते ३०० विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम केवळ स्पर्धा न ठरता व्यसनमुक्तीचा सामूहिक संदेश ठरला. तरुणांच्या चेहऱ्यावरचे तेज व निर्धार पाहून उपस्थित सर्वांनी एकमुखाने व्यसनमुक्त समाज उभारण्याचा संकल्प केला.



### कुसमोडचे नुतन ग्रामविकास अधिकारी आतार यांचा युवा मंचतर्फे सत्कार

**पिलीव, दि.२१ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील ग्रामपंचायतीमध्ये नुकतेच ग्रामविकास अधिकारी म्हणुन अमर आतार हे नव्याने रुजु झाले याबद्दल धैर्यशील मोहिते पाटील युवा मंचच्या वतीने त्यांचा सत्कार ग्रामपंचायत सदस्य पोपट कचरे यांच्या हस्ते करणयात आला. यावेळी सतिश उर्फ दादा व्हनमाने, पोलीस पाटील विकास सरगर, अनिल धायगुडे, जगदीश गायकवाड, लक्ष्मण देवकते, अण्णा कचरे व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## मंगळवेढा-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर झाले पोलीस अधिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ ऑगस्ट-**

मंगळवेढा-पंढरपूर पालखी मार्गावर वारीप्रसंगी वारकऱ्यांना सावली मिळावी या उदात्त हेतूने सोलापूर जिल्ह्याचे ग्रामीण पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी नुकतेच महामार्गालगत वृक्षारोपण करुन एक चांगला संदेश दिला आहे. पंढरपूरला आषाढी व कार्तिकी या दोन मोठ्या वारी भरत असल्याने कर्नाटक व विदर्भामधून येणाऱ्या पालख्या या मंगळवेढा मार्गे पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. पालखीतील वारकऱ्यांना थकल्यानंतर विश्रांती घेण्यासाठी झाडाचा आश्रय घेता यावा यासाठी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी महामार्गावर वृक्षारोपण करण्याचा महत्वकांक्षी निर्णय यापुर्वीच घेतला असून बुधवार दि.२० रोजी मंगळवेढा-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ वर वृक्षारोपण करण्यात आले.

यापुर्वीही दि.१५ ऑगस्ट रोजी पोलीस प्रशासन व वारी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते शिवाजी पवार यांनी वृक्ष रोपे आजच्या कार्यक्रमाला पुरविण्यात आल्याचे सांगण्यात आले. या कार्यक्रमाला डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, सांगोल्याचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे, वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संभाजी यादव, दिगंबर भगरे, शिवाजी पवार, उद्योजक संजय आवताडे, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे विश्वस्त ह.भ.प.शिवाजी मोरे व अन्य उपस्थित होते.



मंगळवेढा-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर वृक्षारोपण करते प्रसंगी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, डी.वाय.एस.पी.बसवराज शिवपुजे, पो.नि. दत्तात्रय बोरीगिड्डे, पत्रकार दिगंबर भगरे व अन्य . (छाया-प्रथमेशराजे,मंगळवेढा)



## छायाचित्रकारदिनी पंढरपूर परिसरातील छायाचित्रकारांना जीवनगौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ ऑगस्ट -**

जागतिक छायाचित्रकारदिनाचे औचित्य साधून पंढरपूर फोटोग्राफर व व्हिडिओग्राफर असोसिएशनतर्फे पंढरपूर व परिसरातील ज्येष्ठ छायाचित्रकारांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

हभप चैतन्य महाराज मोरे (देहूकर) प्रमुख पाहुणे होते. यावेळी सुनील खिस्ते, दीपक रुपलग, सुहास भाळवणकर, आनंद गदगे, मिलिंद टोमके, पांडुरंग तरळगट्टी, मिलिंद गाताडे, राजेश अंबिके, गोविंद गाडे, विलास साळुंखे, शशी भोसले, प्रशांत निकते, उन्मेश चोरगे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ छायाचित्रकार बांधवांनी दिलेले योगदान, छायाचित्रण क्षेत्रातील संघर्ष व त्यांच्या मार्गदर्शनाचा गौरव करण्यासाठी हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. या वेळी पुष्पहार, पुष्पगुच्छ व मानपत्र देऊन ज्येष्ठांचा गौरव करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या मनोगतात छायाचित्रकार समाजाच्या प्रगतीसाठी संघटनेचे कार्य स्तुत्य असल्याचे नमूद केले. तसेच नवीन पिढीने ज्येष्ठ छायाचित्रकारांचा आदर्श घेऊन छायाचित्रण क्षेत्रात यशस्वी वाटचाल करावी, असे आवाहन केले.

अध्यक्ष गणेश रोकडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी राहुल देशमाने (उपाध्यक्ष), महेश टेके (सचिव), संदीप विभूते (सहसचिव), नंदकुमार कारंडे (खजिनदार), मलिक मुजावर (सहखजिनदार) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिनेश शिल्ले, श्रीराम बडवे, हेमंत भाळवणकर,उमेश ढोबळे, अमोल कवठाळकर, राहुल वाघामारे, गणेश जाधव यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ फोटोग्राफर उमेश टोमके यांनी केले.



## अकलूजमध्ये 'इको फ्रेंडली' बाप्पा साकारण्यात रमल्या विद्यार्थीनी

**लक्ष्मीबाई कन्या प्रशालेत पर्यावरण पूरक गणपती कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२१ ऑगस्ट-**



शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित यशवंतनगरच्या लक्ष्मीबाई कन्या प्रशालेत घेण्यात आलेल्या कार्यशाळेत विद्यार्थीनींनी इको फ्रेंडली बाप्पाला आकार देताना मनस्वी आनंद घेतला अन् आता दरवर्षी पर्यावरणपूरक बाप्पांचीच स्थापना करण्याचा संकल्प केला. पर्यावरण पूरक गणपती तयार करण्याची कला आत्मसात व्हावी या कारणासाठी येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. आपल्या हाताने श्री स्वामी समर्थ, बालगणेश, बाळकृष्ण यासह अनेक रुपातील पर्यावरणपूरक गणपती तयार केले. दरवर्षी घरी हाताने तयार केलेल्या गणपतीचीच प्रतिष्ठापना करणार असा संकल्प बोलून दाखवला. गणपती तयार करण्यासाठी बॉम्बे क्ले (मुंबई माती) चा वापर करण्यात आला. बॉम्बे क्ले पासून तयार केलेले गणपती पाण्यात लगेच विरघळतात, विरघळलेले मातीयुक्त पाणी घरातील झाडाला घालून गणपती मूर्तीची होणारी विटंबना थांबवणे शक्य आहे. पर्यावरणपूरक गणपती तयार करणेबाबतची कार्यशाळा प्रशालेत राबवण्यासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिका अनिता पवार यांचे मार्गदर्शन लाभले. पर्यावरण पूरक गणपती तयार करण्यासाठी विद्यार्थिनींना प्रशालेचे कलाशिक्षक विशाल लिके यांनी मार्गदर्शन केले. प्रशालेतील कार्यशाळेसाठी सहकार्य केले.

## आ. अमोल मिटकरी व आ. प्रविण स्वामी यांची विठ्ठल मंदिरास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२० ऑगस्ट -**

महाराष्ट्र विधान मंडळाच्या भटक्या जाती व विमुक्त जमाती समितीचे सदस्य आमदार अमोल मिटकरी व आमदार प्रविण स्वामी यांनी आज विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस भेट दिली.

विठ्ठल मंदिरात सुरू असलेल्या कामांची पाहणी करून त्यांनी गाभारा येथे जाऊन श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. मंदिर समितीचे सदस्य जळगावकर महाराज यांनी आमदार मिटकरी व आमदार स्वामी यांचा सन्मान केला. पंढरपूर चे विभागीय अधिकारी तथा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी सचिन इथापे, सदस्य जळगावकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी , प्रभावी व्यवस्थापक राऊत, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार, जिल्हा प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर उपस्थित होते.



### आमदारांनी केली कामांची पाहणी

विठ्ठल मंदिरातील गरूड खांबास चांदीचे लेपन करणे बाबत पुरातत्व विभागाचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेणे बाबत चर्चा करणेत आली. मंदिर समितीचे विविध कामांचा पाठपुरावा करणे साठी उपसभापती निलम गोरे यांचे समवेत बैठका घेऊन पाठपुरावा केला असल्याचे आ. अमोल मिटकरी यांनी सांगितले.

## मंद्रुपकरांचा डीजेविरोधात एल्गार; पारंपारीक वाद्यांचा करणार वापर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट ..**

संपूर्ण राज्यात डॉल्बीला विरोध होत असताना मंद्रुपकरही ध्वनीप्रदूषण व मानवी जीवनावरील परीणाम रोखण्यासाठी सरसावले आहेत. मंद्रुपच्या सर्वपक्षीय व सर्वधर्मीय नेत्यांनी डीजेमुक्तीसाठी पुढाकार घेतला आहे. तसेच गणेशोत्सवापासून पारंपारीक वाद्यांचा वापर करण्याचा निर्धार केला आहे.

मंद्रुप पोलीस ठाण्यात शांतता कमिटीच्या बैठकीत सर्वानुमते डीजेमुक्तीचा निर्णय घेण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सवात पारंपारीक वाद्य वाजवून मिरवणूक काढण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी भाजपाचे नेते हणमंत कुलकर्णी, माजी सभापती अप्पाराव कोरे, माजी उपसरपंच रमेश नवले, पिरप्पा म्हेत्रे, मोतीराम चव्हाण, रेवणसिध्द मेंडगुदले, गौरीशंकर मेंडगुदले, यासीन म





कानदार, सुरेश पाटील, अप्पासाहेब व्हनमाने, म्हाळप्पा घाले, सचिन फडतरे, सचिन साठे, बाळासाहेब देशमुख, सुनिल व्हनमाने, सिध्दाराम काळे, धानेश शेख आदी उपस्थित होते. डॉल्बीमुळे ध्वनीप्रदुषण होऊन मानवी जीवनावर विपरीत परीणाम होत आहे. अनेक ठिकाणी हृदयावर परीणाम होऊन अनेकांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय तरूण नशा करून बेधुंद व बिभत्स नृत्य करण्याचे प्रमाण वाढत आहे.

**डॉल्बीवर कारवाई करणार :** गणेशउत्सवासह सर्व उत्सवात डॉल्बी वापरणार्या मंडळावर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी उत्सव मंडळांनी डॉल्बीला फाटा देऊन पारंपारीक वाद्यांच्या सहायाने मिरवणूक काढण्यास प्राधान्य द्यावे. यामुळे नवीन कलाकार तयार होऊन पारंपारीक संस्कृतीचे जतनही होणार आहे. शांतता कमिटीच्या सदस्यांनी एकमताने डॉल्बीमुक्तीचा घेतलेला निर्णय तरूणांसाठी आदर्श ठरणारा आहे.

**- मनोज पवार, सपोनि, मंद्रुप पोलिस ठाणे**

**पारंपारीक वाद्ये वापरणाऱ्या मंडळांना पुरस्कार :** डॉल्बीमुक्त मिरवणूक होत असताना हलगी, झांज, बँजे, संभळ, टीपरी यासह इतर पारंपारीक वाद्ये वापरून सुंदर देखाव्यासह आकर्षक मिरवणूक काढणार्या गणेश मंडळांना मंद्रुप पोलीस ठाणेकडून पुरस्कार देण्यात येणार असल्याचे सपोनि मनोज पवार यांनी सांगितले.

**डॉल्बीमुक्तीसाठी एकजुटीने प्रयत्न करणार :** मंद्रुप पोलीस ठाणेच्या शांतता कमिटी बैठकीत डॉल्बीमुक्त उत्सवासाठी सर्वपक्षीय व सर्वधर्मीय नेत्यांनी प्रयत्न करण्यासाठी एकमताने निर्णय घेतला आहे. मिरवणूकीत पारंपारीक वाद्यांचा वापर करून डॉल्बीमुक्तीसाठी प्रयत्न करणार आहे. भावी पिढीसाठी डॉल्बीमुक्त संकल्पना स्वागतार्ह व कौतुकास्पद आहे. सर्वांनी सहकार्य करण्याची गरज आहे.

**- रमेश नवले, माजी उपसरपंच, मंद्रुप**